सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
लातूर | मंगळवार, २ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २७२ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



तुमचा विचार कितीही श्रेष्ठ असला तरी, जोपर्यंत त्या विचारानुसार व्यवहार करणारा समाज निर्माण होत नाही, प्रगत, निरोगी जीवनाला प्रोत्साहन देत नाही, तोपर्यंत लोक त्यावर विश्वास ठेवत नाहीत. विचार मांडणे हा केवळ बौद्धिक विलास नाही. बुद्धीद्वारे कोणताही विचार रुजवण्याने काम होणार नाही. ते प्रत्यक्ष उभे करून दाखवावे लागते.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# नेत्यांची प्रलोभनांची विधाने; अजितदादा-शिंदेंसह २० नेते अडचणीत

**• निवडणूक आयोगाकडून गंभीर दखल, जिल्हाधिकाऱ्यांकडून मागवला अहवाल**



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१ डिसेंबर-**

राज्यातील नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचली असतानाच निवडणूक आयोगाने राजकीय नेत्यांना मोठा दणका देण्याची तयारी केली आहे. प्रचाराच्या ओघात मतदारांना आर्थिक प्रलोभने दाखवणे आणि निधीची धमकी देणे, यांसारखी विधाने करणाऱ्या नेत्यांची निवडणूक आयोगाने दखल घेतली आहे.

यामध्ये खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजपा नेत्या चित्रा वाघ यांच्यासह २० बड्या नेत्यांचा समावेश असून, आयोगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ अहवाल मागवला आहे. मंगळवार, २ डिसेंबर रोजी राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतदान होत असून, बुधवारी मतमोजणी पार पडणार आहे. आज प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने सर्वच पक्षांनी ताकद पणाला लावली आहे. मात्र, शेवटच्या टप्प्यात ही कारवाईची बातमी आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आचारसंहितेचा भंग होईल अशी वक्तव्ये करणाऱ्या २० नेत्यांची यादी तयार करण्यात आली आहे.

**प्रलोभने देणारी नेत्यांची विधाने?**

आयोगाच्या रडारवर असलेल्या नेत्यांनी भरसभेत मतदारांना आकर्षित करण्यासाठी किंवा धमकावण्यासाठी विविध विधाने केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तुमच्या हातात मत आहे, तर माझ्या हातात निधी आहे. राष्ट्रवादीला मतदान न केल्यास निधीला कात्री लावणार, अशा आशयाचे विधान केले होते. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अप्रत्यक्षपणे 'तिजोरीच्या चाव्या' संदर्भातील वक्तव्य केले होते. मंत्री गुलाबराव पाटील यांनी मतदानाच्या आदल्या रात्री 'लक्ष्मी दर्शन' होणार असल्याचे विधान केले होते. तर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी खा कुणाचंही मटण, पण दाबा कमळाचं बटण, असे विधान केले होते.




### व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून अहवाल

निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अशा प्रकारची वादग्रस्त विधाने करणाऱ्या सुमारे २० नेत्यांची यादी तयार करण्यात आली आहे. आयोगाने ज्या ठिकाणी ही वक्तव्ये झाली, त्या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांना व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

### नीलेश राणेही अडचणीत?



निवडणुकीत मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व प्रकारच्या हालचालींवर आयोग आता कठोर भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. निवडणुकीच्या तोंडावर आयोगाने घेतलेल्या या भूमिकेमुळे प्रलोभणे देणारी वक्तव्य करणाऱ्या नेत्यांवर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे. यासंदर्भात निवडणूक आयोग नेमकी कोणती कारवाई करते, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे. दुसरीकडे, मालवणमध्ये भाजप कार्यकर्त्यांच्या घरी स्टिंग ऑपरेशन केल्याप्रकरणी शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांच्यावरही गुन्हा दाखल झाला आहे, असून त्यांच्या देखील अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

## महत्त्वाचे

### बाजाराची विक्रमी पातळीवरून घसरण



**मुंबई :** सोमवारी भारतीय शेअर बाजारात दिवसभर जोरदार चढ-उतार पाहायला मिळाला. सकाळच्या सत्रात मोठी तेजी दिसल्यानंतर बाजारात मोठी नफा वसुली झाली. यामुळे निर्देशांक आणि निफ्टी यांची दिवसभरातील तेजी एका क्षणात गडप झाली. या घसरणीपूर्वी निफ्टीने २६,३२५ चा तर निर्देशांकाने ८५,८५० चा नवा सर्वोच्च उच्चांक गाठला होता. ही तेजी दिवसअखेरपर्यंत टिकू शकली नाही. बाजारातील घसरण आटोक्यात ठेवण्याचे काम ऑटो क्षेत्रातील शेअर्सनी केले. या शेअर्सनी मोठी वाढ नोंदवली. टाटा मोटर्स आणि मारुतीच्या नोव्हेंबर महिन्यातील विक्रीचे आकडे अपेक्षितपणे चांगले राहिल्याने या शेअर्समध्ये मोठी वाढ झाली. यामुळे निर्देशांक घसरले तरी सूचिबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल वाढले.

### डॉलरच्या तुलनेत रुपयात घसरण



**नवी दिल्ली :** रुपया सोमवारी डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतच्या सर्वात नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. व्यवहारादरम्यान रुपया ३४ पैशांनी घसरून ८९.७९ च्या पातळीवर आला होता. याने २ आठवड्यांपूर्वीच्या सर्वकालीन नीचांकी पातळी (८९.६६) ला मागे टाकले. २१ नोव्हेंबर रोजी रुपया ९८ पैशांनी घसरला होता. देशांतर्गत शेअर बाजारातील घसरण आणि परदेशी निधीच्या सततच्या काढणीमुळे रुपयावर दबाव वाढला आहे. सकाळी रुपया प्रति डॉलर ८९.४५ च्या पातळीवर उघडला होता. तर, शुक्रवारी डॉलरच्या तुलनेत रुपया ९ पैशांच्या घसरणीसह ८९.४५ वर बंद झाला होता.

# 'डिजिटल अरेस्ट'चा तपास सीबीआयकडे

**• सर्वोच्च न्यायालयाचा आदेश • राज्यांना मान्यता देण्याचा निर्देश**

**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

'डिजिटल अरेस्ट'च्या माध्यमातून देशभरात झालेल्या फसवणुकीच्या प्रकरणांचा तपास करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात् सीबीआयला दिला. या तपासाला मान्यता द्यावी, असा निर्देश न्यायालयाने पश्चिम बंगाल, तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा या विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांना दिला.

सर्वोच्च न्यायालयाने माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित मध्यस्थांनाही निर्देश दिला. डिजिटल अरेस्टशी संबंधित सर्वच प्रकरणांतीव विवरण सीबीआयला उपलब्ध करा आणि तपासात सहकार्य करा, असे न्यायालयाने म्हटले आहे. कर आश्रयस्थाने, विदेशी ठिकाणे तसेच इतर देशांमधून होणाऱ्या सायबर गुन्ह्यांतील आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी इंटरपोलची मदत घेतली जावी, असा निर्देश न्यायालयने सीबीआयला दिला.

सायबर गुन्हेगारी आणि डिजिटल अरेस्टच्या या संवेदनशील प्रकरणात न्यायालयाने भारतीय रिझर्व्ह बँकेलाही नोटीस बजावली. सायबर फसवणूक प्रकरणात वापरण्यात आलेली खाती गोठवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा मशीन लर्निंगच्या तंत्रज्ञानाचा वापर का करण्यात आला नाही, असा सवाल न्यायालयाने रिझर्व्ह बँकेला केला.

सायबर गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी न्यायालयाच्या निर्देशाची माहिती गृह मंत्रालय, दूरसंचार विभाग, अर्थ मंत्रालयासह विविध केंद्रीय यंत्रणांना दिली जाईल. सर्वच राज्ये, केंद्रशासित प्रदेशांत या गुन्ह्यांच्या विरोधात क्षेत्रीय आणि राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र स्थापित करण्यास सांगण्यात आले, असा युक्तिवाद केंद्राने केला. (वृत्तसंस्था)

### एका ग्राहकाला कित्येक सिम विकण्यावर संताप




» एका ग्राहकाला कित्येक सिम विकण्यावरही न्यायालयाने संताप व्यक्त केला. देशातील टेलिकॉम कंपन्यांनी एका ग्राहकाला कित्येक सिम कार्ड उपलब्ध करू नये, हे सुनिश्चित करावे, असा निर्देश दूरसंचार विभागाला दिला. एकाच ग्राहकाला मोठ्या प्रमाणावर सिम कार्ड उपलब्ध केल्यास त्याचा गैरवापर सायबर गुन्ह्यांसाठी केला जाऊ शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### फसवणुकीत वापरलेली खाती गोठवणार

नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांसोबत हातमिळवणी करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांची चौकशी करा, असा निर्देश न्यायालयाने दिला. नागरिकांच्या फसवणुकीसाठी वापरण्यात आलेली बँक खाती गोठवण्यासाठी राज्य, केंद्रशासित प्रदेश, त्यांचे पोलिस दल आणि सीबीआय स्वतंत्र आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# निवडणुका पुढे ढकलण्याचा आयोगाचा निर्णय चुकीचा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टीका**

**◆ छ. संभाजीनगर, १ डिसेंबर**

काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय उमेदवारांसाठी चुकीचा आणि अन्यायकारक आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केली.

याचिका किंवा न्यायालयीन मुद्यावर शेवटच्या क्षणी निवडणुका पुढे ढकलण्याचा आयोगाने घेतलेला निर्णय हा उमेदवारी दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केलेल्यांवर अन्याय आहे, असे त्यांनी प्रचारासाठी पैठणला रवाना होण्यापूर्वी पत्रकारांसोबत संवाद साधताना सांगितले.

कुणाच्या तरी याचिका आणि न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय म्हणजे उमेदवारांवर अन्याय आहे, असे फडणवीस म्हणाले. निवडणूक आयुक्तांनी कुणासोबत सल्लामसलत केली माहीत नाही, असे त्यांनी दिलेल्या स्थगितीच्या कायदेशीर आधारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले. मला माहीत असलेल्या कायद्यानुसार, कुणी तरी न्यायालयात गेले म्हणून निवडणुका पुढे ढकलल्या जात नाहीत, असे ते म्हणाले.

काही ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलण्याबाबत आयोगाने रविवारी घेतलेल्या निर्णयानंतर मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त वक्तव्य केले आहे. नेमक्या किती ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलल्या याची घोषणा अद्याप आयोगाने केलेली नाही. या मुद्यावर देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रक्रिया झालेल्या लातूर जिल्ह्यातील निलंग्याचे उदाहरण दिले. उमेदवारी फेटाळलेला कुणी तरी न्यायालयात गेला. उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांना निवडणूक प्रक्रियेसाठी पूर्ण वेळ देण्यात आला. कुणी तरी न्यायालयात गेले म्हणून निवडणुका रद्द करणे हे पूर्णतः चुकीचे आहे, असे फडणवीस म्हणाले. (वृत्तसंस्था)

### निवडणूक आयोगाला निवेदन देणार



» निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था आहे आणि त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे. पण, निवडणुका पुढे ढकलणे चुकीचे आहे. उमेदवारांनी केलेले काम पाण्यात गेले आहे. आता आणखी १५ दिवस प्रचार करावा लागणार आहे. आम्ही याबाबत आयोगाला निवेदन देणार आहोत, असे फडणवीस यांनी सांगितले.

# शिंदेसेनेचे नेते शहाजीबापूंच्या ऑफिसवर गुन्हे शाखेचा छापा

**एलसीबी पथकासह निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची तपासणी**



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ डिसेंबर -**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक आज मंगळवार दि.२ डिसेंबर रोजी असून रविवार दि.३० नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास एलसीबी पथकासह निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगोल्यात अचानक तपासणी केली. या तपासणीमध्ये शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांचे कार्यालय तसेच त्यांचे सहकारी माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ यांचे घरी व सांगोला शहर विकास आघाडीचे कार्यालय व अन्य एका ठिकाणाचा समावेश होता.

रविवारी दुपारी भाजपचे नगराध्यक्ष पदाचे व नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छत्रपती शिवाजी महाराज चौकात सभा आयोजित करण्यात आली होती. तसेच रात्री शिवसेनेचे नगराध्यक्ष पदाचे व नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ माजी आमदार शहाजीबापू पाटील यांची सांगोला शहरातील जय भवानी चौक येथे सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभा संपल्यानंतर वरील ठिकाणी अचानक तपासणी करण्यात आली. सदर अचानक तपासणीमुळे सांगोला शहरासह तालुक्यात सोमवार दि.१ डिसेंबर रोजी दिवसभर सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगली होती.

> कुणी तरी विरोधकांनी तक्रार केल्यामुळे हा प्रक्रियेचा भाग होता. तो विषय संपला आहे. ह्या प्रकरणी माझी कुणाविषयी तक्रार नाही.
> - शहाजीबापू पाटील, माजी आमदार

# २६४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी आज मतदान

**न्यायालयीन स्थगितीमुळे २४ नगरपरिषद व १५४ सदस्यासाठी २० डिसेंबरला निवडणुका**

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ डिसेंबर-**

राज्यातील २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मंगळवारी (दि.२) मतदान होत आहे. त्यासाठी संपूर्ण मतदान यंत्रणा सज्ज झाली आहे. एकूण १२ हजार ३१६ मतदान केंद्रांसाठी ६२ हजार १०८ निवडणूक अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मतदान केंद्रांवर पुरेशा बंदोबस्त तैनात केला आहे.

दरम्यान, न्यायालयाच्या स्थगितीमुळे ऐनवेळी रद्द करण्यात आलेल्या २४ अध्यक्षपदांच्या आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्यपदाच्या जागांसाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या २६४ अध्यक्षपदांच्या आणि ६ हजार ४२ सदस्यपदांच्या जागांसाठी उद्या मतदान होईल. संपूर्ण निवडणूक प्रकियेसाठी पुरेशा मतदान



यंत्रांची (EVM) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात एकूण १७ हजार ३६७ कंट्रोल युनिट; तर ३४ हजार ७३४ बॅलेट युनिटचा समावेश आहे. अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली मतदान पथके मतदान केंद्रावर सुरळित पोहचली आहेत. उद्या सकाळी ७.३० वाजता मतदानास सुरुवात होईल. सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असेल.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदाच्या आणि सदस्यपदांच्या निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार नाही.

तेथे सुधारित कार्यक्रमानुसार २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे आता उर्वरित २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी उद्या मतदान होईल. त्यातील ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील न्यायालयीन प्रकरणांमुळे बाधित १५४ जागांसाठीदेखील मतदान होणार नाही. तिथेही सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार संबंधित बाधित जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होईल.

# राज्यभर गाजलेली अनगर नगराध्यक्षपदाची निवडणूक स्थगित

**जिल्हाधिकारी आशिर्वाद : सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार होणार पुढील कार्यवाही**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून अनगर नगरपंचायत अध्यक्षपदाची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. आता सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार पुढील कार्यवाही होणार आहे. याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आदेश जारी केले आहेत.

अनगरसह जिल्ह्यातील ६ नगरपालिकेतील ६ प्रभाग आणि २ नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. आता या निवडीला स्थगिती देण्यात आली असून, सुधारित कार्यक्रमानुसार येथे पुढील कार्यवाही होणार आहे. दरम्यान, अनगरच्या बिनविरोध निवडणुकीची औपचारीक घोषणा पुढे ढकलली असून, स्थगितीचा बिनविरोध झालेल्यांवर कसलाही परिणाम होणार नाही. जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत निवडणूक बिनविरोध झाल्याने राज्यभरात या निवडणुकीची चर्चा रंगली होती. तर, येथील माजी आमदार राजन पाटील यांचे सुपुत्र बाळराजे पाटील यांनी विजयी जल्लोष करताना थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव घेऊन चॅलेंज केले. त्यामुळे, येथील निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले होते. त्यातच, भाजप उमेदवार प्राजक्ता पाटील यांच्याविरोधात निवडणूक लढवलेल्या उज्ज्वला थिटे यांचा अर्ज बाद झाल्यानंतर त्यांनी न्यायालयात धाव घेतली. मात्र, जिल्हा न्यायालयानेही त्यांचा अर्ज फेटाळल्याने ही जागा बिनविरोध झाली आहे. त्यातच, आता सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी अनगर नगरपंचायतीची निवडणूक स्थगित केल्याने येथे फेरनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होणार आहे. मात्र, ह्या स्थगितीचा भाजप नेते राजन पाटलांना आणि बिनविरोध निवड झालेल्या कुठलाही धक्का बसणार नाही. कारण, केवळ येथील बिनविरोध निवडणुकीची औपचारीक घोषणा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती आहे.

**राजन पाटील यांना धक्का नाही**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्ज्वला थिटे यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला आहे. सोलापूर सत्र न्यायालयानेही त्यांचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे, पुढील निवडणूक प्रक्रियेत त्यांना अर्ज दाखल करता येणार नाही, ज्या उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत, अथवा ज्यांचे अर्ज बाद झाले आहेत, त्यांनीही सुधारित निवडणुकीत अर्ज दाखल करता येणार नाहीत. त्यामुळे, येथील बिनविरोध निवडणुकीची औपचारीक घोषणाच केवळ पुढे ढकलल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे, राजन पाटील किंवा अनगर नगरपंचायतीमधील नगराध्यक्ष व १८ सदस्यांना धक्का म्हणता येणार नाही.

# संसदेला अहंकाराचा आखाडा बनू देऊ नका : पंतप्रधान मोदी

**विरोधकांनी कामकाजात अडथळे आणू नये**




**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

संसदेला निवडणुकीतील जयपराजयामुळे येणाऱ्या निराशेचा तसेच अहंकाराचा आखाडा बनू देऊ नका, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून प्रारंभ झाला, अधिवेशनासाठी संसदभवन परिसरात आगमन झाल्यावर पत्रकारांशी बोलतांना मोदी म्हणाले की, विरोधकांनी जनतेच्या आकांक्षा तसेच लोकशाहीच्या मर्यादा लक्षात घेऊन अधिवेशनाच्या कामकाजात सहभागी झाले पाहिजे.



आपल्या व्यक्तिगत अजेंड्यासाठी सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणला जाऊ नये, नवीन सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली पाहिजे, सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणून या सदस्यांना मिळणाऱ्या संधीपासून वंचित केले जाऊ नये.

नवीन सदस्यांना वेगवेगळ्या मुद्यावर अभिव्यक्त होण्याची संधी मिळाली पाहिजे, आपली निराशा तसेच निवडणुकीतील पराभवामुळे नवीन सदस्य बळीचा बकरा होणार नाही, याची काळजी सगळ्यांनी घेतली पाहिजे, असे आवाहन करत मोदी म्हणाले की, या अधिवेशनामुळे संसद आणि संसदसदस्य देशासाठी काय करत आहे, काय करणार आहे, याची माहिती देशाला होणार आहे. त्यामुळे विरोधकांनीही आपली जबाबदारी पार पाडत मजबूत मुद्दे उचलले पाहिजे, लोकशाही मजबूत करण्यात आपले योगदान दिले पाहिजे. मात्र आज दुर्दैवाने काही राजकीय पक्ष निवडणुकीतील पराभवामुळे आलेल्या निराशेतून बाहेर यायलाच तयार नाही. त्यांच्या विधानावरुन तरी तसेच जाणवत आहे.

पराजयामुळे निराश होत संसदेला आखडा बनू देऊ नये, तसेच विजयाच्या अहंकारात डुबत आपल्या जबाबदारीचा विसर पडू देऊ नये, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, देशाच्या हितासाठी सगळ्यांनी एकत्र येत काम केले पाहिजे.

सभागृहात गोंधळ झाल्यामुळे नवीन सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळत नाही, त्यामुळे नव्या सदस्यांना संधी मिळाली पाहिजे. (तभा वृत्तसेवा)

> जुन्यांचा अनुभव आणि नवीन पिढीचा जोश यांचा फायदा देशाला मिळाला पाहिजे. नारेबाजी करायला संपूर्ण देश पडला आहे, तेथे नारेबाजी करा, सभागृहात नारेबाजी नाही तर नीतीवर चर्चा झाली पाहिजे, सभागृहात ड्रामा नाही तर डिलिव्हरी झाली पाहिजे, असे मोदी म्हणाले. नकारात्मकेतचा फायदा कधी कोणाला मिळत असला तरी देशासाठी सकारात्मक विचार केला पाहिजे, सभागृहाच्या मर्यादेत राहून काम केले पाहिजे, असे मोदी म्हणाले.

## महत्त्वाचे...



### कृपासिंधू सोशल फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना उबदार शालींचे वाटप

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती संचलित अस्थिव्यंग व मतिमंद विद्यार्थ्यांच्या अक्कलकोट येथील निवासी शाळेतील ३० विद्यार्थ्यांना शहरात नव्याने स्थापन झालेल्या कृपासिंधू सोशल फाउंडेशनच्या वतीने उबदार शालींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कोंडीबा इंगळे प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत इंगळे, उद्योगपती ओंकार कोरे यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला. याप्रसंगी फाउंडेशनचे सचिव रवीकिरण पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकामधून कृपासिंधू सोशल फाउंडेशन स्थापन करण्याचे उद्दिष्ट विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अरविंद पाटील यांनी केले. याप्रसंगी युवा उद्योजक ओंकार कोरे, व्यापारी संघटनेचे उपाध्यक्ष प्रसन्न हत्ते, संतोष नरुणे, ओम हत्ते, निवासी शाळेतील शिरीष बन्ने, विठ्ठल मदरी, इराया स्वामी, शीला पवार आदी उपस्थित होते.



### राष्ट्रीय कराटे स्पर्धेत चैतन्य स्कूलच्या संबोधी गायकवाडला कांस्य


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ डिसेंबर-**

विशाखापट्टणम येथे झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत कै. सुरेश सखाराम सुरवसे चारिटेबल ट्रस्ट संचलित श्री चैतन्य प्रशालेतील संबोधी गायकवाड कांस्यपदक तर कराटे प्रशिक्षिका साक्षी तोरंगी हिनेही रौप्यपदक पटकाविले. प्रशिक्षिका म्हणाल्या, नियमित प्रशिक्षण, प्रोत्साहन, तसेच तांत्रिक मार्गदर्शनामुळेच राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळाली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची क्षमता ओळखून त्यांना योग्य मार्गदर्शन दिले, तसेच स्पर्धेपूर्वी त्यांची शारीरिक आणि मानसिक तयारी करण्यावर विशेष भर दिला. मुख्याध्यापिका डॉ.पी. सौजन्या यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**राष्ट्रीय कराटे स्पर्धा : प्रशिक्षिका साक्षी तोरंगीस रौप्य**

### पालिका क्र.१ कॅम्प शाळेत संविधान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**




महानगरपालिका सोलापूर संचलित प्रशाला क्र. १ कॅम्प शाळेत संविधान दिन २० ते २६ नोव्हेंबर या कालावधीत येथे संविधान महोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना रांगोळी, चित्रकला, प्रश्नमंजुषा, पोस्टर स्पर्धा तसेच तज्ञाचे संविधान दिनाचे महत्त्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दि. २६ नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन मुख्याध्यापक जे. आर. सज्जन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांची प्रशालेच्या परिसरात संविधान रॅली काढण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षकांच्या हस्ते मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक कांबळे, हंचाटे, खरबस, रंडाळे, खांडेकर, शेळके, अझहर पठाण, बनसोडे व भंडारे यांचे सहकार्य लाभले.

# १८० दिवसांच्या आत पदवी प्रमाणपत्र देणे बंधनकारक

## विद्यापीठ अनुदान आयोगाचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

अभ्यासक्रम पूर्ण करून पदवीसाठी पात्र ठरल्याच्या दिवसापासून १८० दिवसांच्या आत विद्यार्थ्यांना विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्र देणे यूजीसीने बंधनकारक केले आहे. उच्च शिक्षण संस्थांकडून परीक्षा आणि पदवी प्रमाणपत्राच्या वितरणात होत असलेल्या मोठ्या विलंबावर विद्यापीठ अनुदान आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

काही विद्यापीठे वेळेवर परीक्षा घेत नसल्याचे आणि विद्यार्थ्यांना त्यांची पदवी व अंतिम प्रमाणपत्रे देण्यास विलंब करत असल्याचे यूजीसीच्या निदर्शनास आले आहे. या गंभीर समस्येमुळे विद्यार्थ्यांच्या करिअरवर नकारात्मक परिणाम होत आहे. वेळेवर कागदपत्रे न मिळाल्याने त्यांना योग्य नोकरीच्या संधी आणि पुढील उच्च शिक्षणाचे प्रवेश गमवावे लागत आहेत यूजीसीने सर्व विद्यापीठांना या नियमांचे आणि शैक्षणिक मार्गदर्शक तत्त्वांचे त्वरित पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**पालन न झाल्यास कठोर कारवाई**

यूजीसीने सर्व उच्च शिक्षण विद्यापीठांना या नियमांचे आणि शैक्षणिक मार्गदर्शक तत्त्वांचे त्वरित पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. यापुढे, जी विद्यापीठे यूजीसीच्या नियमांचे उल्लंघन करतील आणि वेळेवर परीक्षा घेऊन प्रमाणपत्रे देणार नाहीत, त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचा स्पष्ट इशारा आयोगाने दिला आहे.

**विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्याच्या मार्गात अडथळे**

या विलंबाबद्दल यूजीसीने स्पष्ट केले आहे की, वेळेवर प्रमाणपत्रे न मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या नोकरीच्या आणि पुढील शैक्षणिक संधी गमावल्या जातात. यामुळे विद्यार्थ्यांच्या योग्य आणि दर्जेदार रोजगार मिळवण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

# सोलापूर विद्यापीठाची 'पेट १०'ची प्रवेश प्रक्रिया फेब्रुवारीमध्ये

## प्र. कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांची माहिती

**विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते आजतागायत विद्यार्थ्यांचे संशोधन वेबसाईटवर**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची 'पेट९'ची ऑनलाईन परीक्षा यशस्वी झाल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमास अधिन राहून 'पेट १०'च्या (पीएच.डी. प्रवेश परीक्षा) प्रवेश प्रक्रियेस फेब्रुवारी २०२६ मध्ये सुरू होणार असल्याची माहिती विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा.लक्ष्मीकांत दामा यांनी दिली.

प्रा. दामा म्हणाले, गुणवत्ता वाढीसाठी विद्यापीठ नवनवीन उपक्रम राबवित आहे. त्यात २००४ पासून ते आतापर्यंतेच विद्यार्थ्यांनी संशोधन केलेले शोध निबंध हे विद्यापीठाच्या बेवसाईटवार ऑनलाईन स्वरुपात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्णत्वास येत आहे. पेट१०च्या परीक्षेस बसणाऱ्या या विद्यार्थ्यांना हे उपयोगी पडणार आहे. देशहित साधून सर्वांना उपयुक्त असे संशोधनाचे विषय निवडीसाठी विद्यापीठ प्राधान्य देत आहे. पीएच.डीच्या अंतिम मौखिक परीक्षेअगोदर पूर्व मौखिक परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांच्या त्या प्रबंधामध्ये असलेल्या उणिवा व त्रुटी दूर करण्यासाठी विद्यापीठातील तसेच राज्यातील व राज्याबाहेरील तज्ञ व्यक्तीकडून पूर्व मौखिक परीक्षा विद्यापीठाकडून घेतली जाते. त्यांच्या सूचनाचा त्या प्रबधात समाविष्ठ करण्यात येतो. त्यामुळे संबंधित पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांचा शोध निंबध निर्दोष होण्यासाठी उपयोग होणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

# काळे व वाघमोडे तायक्कोंदो स्पर्धेत अजिंक्य

## दोघींची विद्यापीठ संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पंढरपूर येथे झालेल्या महाविद्यालयीन तायक्वोंदो स्पर्धेत येथील समीर गांधी कला महाविद्यालयातील तनिष्का काळे ४९ किलो वजन गटात व तेजस्विनी वाघमोडे हिने ६७ किलो वजन गट अजिंक्यपद पटकाविले. त्यांना क्रीडा मार्गदर्शक प्रा.संजय सपताळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांची फकीर मोहन युनिव्हर्सिटी उडीसा येथे होणाऱ्या ऑल इंडिया विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. दोघींचे श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष ॲड. माधव मिराजदार, कार्याध्यक्ष ॲड. मिलिंद दादा कुलकर्णी, कार्यवाह रामभाऊ दोशी, सहकार्यवाहक ढाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास गेजगे व विष्णुपंत कुलकर्णी, इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका अपर्णा इनामदार आदींनी अभिनंदन केले.





# तायक्कांदो स्पर्धेत मंद्रुपच्या चौघांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांनी आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन तायक्वान्दो स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमीच्या चौघांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

पंढरपूर येथील उमा महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेत तनुजा पवारने ५८ ते ६२ किलो वजनी गटात सुवर्ण पटकाविले. तिची सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली आहे. शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रवीण जोडमोटे, रेश्मा राठोड, दीपक धूळखेडे, सचिन कुंभार, सिध्दाराम विजापुरे यांनी अभिनंदन केले.

प्रणाली व्हनमाने (४६ ते ४९ किलो, कांस्य), यश खंदारे ( ५४ किलो, कांस्य), शिवराज बोळकवठे (५८ ते ६३ किलो, रौप्य),




# ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

स्वरक्षणाचे हे फक्त शारीरिक नसून ते विविध पाच स्तरावर करावयाचे असते. प्राप्त परिस्थितीत मनोबल खचू न देणे, प्रसंगावधान आदी गोष्टी ही स्वरक्षणाचाच भाग आहे, अशी माहिती कराटे प्रशिक्षिका संगीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिली.

ए.जी.पाटील अभियांत्रिकीच्या संगिनी वुमन्स फोरम तर्फे विद्यार्थ्यांसाठी स्वरक्षणाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. सुरुवातीस जाधव यांनी स्व आणि संरक्षण यांचा अर्थ विषद केला. संरक्षण हे फक्त शरीराचे नसून मन, बुद्धी, भावना यांचेही असते असे विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. त्यांच्यासोबत त्यांचे सहाय्यक मिहीर जाधव व शिष्य हे उपस्थित होते. मिहीर यांनी प्रात्यक्षिकांद्वारे हाताची पकड सोडविणे, आक्रमणापासून बचावात्मक हालचाली, शारीरिक संतुलन राखणे तसेच धोका ओळखण्यासाठी आवश्यक परिस्थिती ज्यांनी जागरूकता इत्यादी सराव करून घेतला. तसेच संभाव्य संकट परिस्थितीत शांत मनाने आणि योग्य निर्णय क्षमता वापरत स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत ही मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत २०० पुरुष व महिलांनी सहभाग नोंदविला.

संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील व संस्था सचिव शिवानंद पाटील हे नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आग्रही असतात त्यामुळे अशा कार्यशाळा वारंवार आयोजित केल्या जातात अशी माहिती कॅम्पस डायरेक्टर एम.ए.चौगुले यांनी दिली प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.डी.ए.जव्हेरी, प्रा. एस.एन. कांबळे प्रा.आर.एस. कटनळळी, प्रा.ए.जी. घाळीमठ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आभार प्रदर्शन प्रा. एस. के. कोनापूरे यांनी केले.

# बाळे ते जुळे सोलापूरपर्यंत राष्ट्रवादीचे नगरसेवक महापालिकेत जाणार : बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केवळ जुळे सोलापूर नव्हे तर 'बाळे ते जुळे' इथपर्यंत अजित पवार राष्ट्रवादीचे नगरसेवक महानगरपालिकेत गेले पाहिजेत, असा विश्वास अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला. ते जुळे सोलापूर भागातील प्रभाग २४ आणि २६ मधील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन गोविंदश्री मंगल कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.



या बैठकीत महानगरपालिका जिंकण्याचा निर्धार राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्या साक्षीने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केला. सोलापूर शहरात गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी पक्षाचे काम मोठ्या जोमाने सुरू आहे सातत्याने अजित पवार यांच्या पक्षाकडे येण्याचा ओढा अनेकांचा वाढला आहे.जुळे सोलापूर भागामध्ये यंदा कोणत्याही परिस्थितीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे जास्तीत जास्त नगरसेवक सोलापूर महानगरपालिकेत जातील, असा विश्वास प्रमोद भोसले यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

याप्रसंगी राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम,जेष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, विद्यार्थी अध्यक्ष अनिकेत व्हसुरे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले माजी नगरसेविका नूतन गायकवाड,प्रदेश सचिव विशाल बंगाळे उपस्थित होते.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'मरे'च्या १५ अनारक्षित विशेष सेवा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ डिसेंबर-**

मध्य रेल्वेच्यावतीने येत्या ४ ते८ डिसेंबर या कालावधीत १५ अनारक्षित विशेष सेवा नागपूर ते मुंबई या मार्गांवर चालवणार आहे.प्रवाशांच्या सुविधेसाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनासाठी प्रवास करणाऱ्या भाविकांच्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे महानिर्वाणदिनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी होत असते. त्यासाठी राज्यभरातून भीम अनुयायी शिवाजी पार्कवर जमत असतात. त्यांच्या सोयीसाठी यंदाही विशेष गाड्या सोडण्यात येत आहेत. **त्याचा तपशील असा:**

**(अ) नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस : ४ सेवा : ४ डिसेंबरला सुटणाऱ्या विशेष गाड्या-**

**गाडी क्रमांक ०१२६० नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून १८.१५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल.

**गाडी क्रमांक ०१२६२ नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून २३.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १५.३० वाजता पोहोचेल.

**५ डिसेंबरला सुटणाऱ्या विशेष गाड्या:**

**गाडी क्रमांक ०१२६४ नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून ०८.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे त्याच दिवशी २३.४५ वाजता पोहोचेल.



**गाडी क्रमांक ०१२६६ नागपूर** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून १८.१५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल.

**थांबे** : अजनी, सेवाग्राम, वर्धा, पुलगांव, धामणगांव, बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, जालंब, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कसारा, कल्याण आणि दादर.

**(ब) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर** : ४ सेवा

**६ डिसेंबर:** गाडी क्रमांक ०१२४९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २०.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ११.२० वाजता पोहोचेल.

**७ डिसेंबर:**

**गाडी क्रमांक ०१२५१**

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस** - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १०.३० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ००.५५ वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०१२५५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १२.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ०३.०० वाजता पोहोचेल.

**८ डिसेंबर:** गाडी क्रमांक ०१२५७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

**दादर - नागपूर : १ सेवा**

**७ डिसेंबर:** गाडी क्रमांक ०१२५३ दादर - नागपूर विशेष गाडी दादर येथून ००.४० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

**थांबे:** दादर, कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, जालंब, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा, सेवाग्राम आणि अजनी.

**(क) कलबुर्गी** - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कलबुर्गी : २ सेवा

**गाडी क्रमांक ०१२४५ विशेष**

ही गाडी कलबुर्गी येथून ५ डिसेंबर १८.३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ८.२० वाजता पोहोचेल.

**गाडी क्रमांक ०१२४६ विशेष**

ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ७. डिसेंबरला ००.२५ वाजता सुटेल आणि कलबुरगि येथे त्याच दिवशी ११.३० वाजता पोहोचेल.




# चंडक प्रशालेच्या शिबिरात ३८४ रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

महेश इंग्लिश स्कूल, संतोकीराम रामसुख चंडक इंग्लिश हायस्कूल व दमाणी विद्या मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते . या रक्तदान शिबिरामध्ये ३८४ पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोदविला.

या शिबिराचे उदघाटन डॉ. योगेश बंग यांच्या हस्ते झाले. रक्तदान जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पथनाट्य , कलाकृती व चित्रकलेचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यासाठी कला शिक्षक अरविंद गोटीमुकुल, शशिकांत कनकी व स्वाती साठे यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी संस्थेचे चेअरमन चेअरमन योगेश बियाणी, सचिव डॉ. अर्चना दरक, सहसचिव स्वप्निल मर्दा, गिरीधारी भुतडा, ओमप्रकाश सोमाणी, सी.ए. जोत्स्ना भट्टड, विष्णुक मानधनिया, संजय करवा, राहुल चंडक, जितेंद्र राठी, शैलेश चंडक, प्रमोद भुतड , सपना राठी, डॉ. सारिका झंवर, नयना राठी, पूजा सोमाणी, डॉ. नूतन झंवर, डॉ. प्रतिभा बलदवा व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अंजली चव्हाण, पर्यवेक्षिका मनाली संगवे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# स्थानिकच्या निवडणुकीत ढवळले जिल्ह्याचे राजकारण

## ● आजी-माजी पालकमंत्र्यांची जुंपली; यंदाच्या निवडणुकीत पालकमंत्री गोरेंचा मोठा प्रभाव; विरोधकांसह मित्रपक्षही घेतले अंगावर

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

**तब्बल तीन वर्षांच्या गॅपनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने जुन्यांसह नव्यांमध्ये देखील मोठा उत्साह आहे. तर राजकीय पक्षांनी देखील युती-आघाड्या धाब्यावर बसवून सत्तेसाठी काय पण म्हणत भेळ-मिसळीचे कारस्थान केल्याने सोलापूर जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. आजपर्यंतचा इतिहास पाहता यंदा पहिल्यांदाच जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी स्थानिकच्या राजकारणात ग्राऊंडवर लक्ष घातल्याने या निवडणुकीवर त्यांचा मोठा प्रभाव दिसत आहे. कुरघोड्यांचे राजकारण करत भाजपाचे सर्वाधिक नगराध्यक्ष विजयी करण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विरोधकांसह मित्रपक्षांनाही अंगावर घेतल्याने राजकारण रंगले आहे. बार्शी तालुक्यात तर पालकमंत्री गोरे आणि माजी पालकमंत्री दिलीप सोपल यांच्यातच जुंपल्याचे चित्र आहे. माळशिरस, करमाळा, अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा, मोहोळ, बार्शी, कुर्डुवाडी, सांगोला तालुक्यात यंदा राजकारण रंगले असून आज मंगळवारी मतदान तर बुधवारच्या मतमोजणीनंतर कोण, किती पाण्यात हे कळणार आहे.**




स्थानिकच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात अशी या निवडणुकांची ओळख असल्याने आस लावून बसलेल्यांनी निवडणुकीच्या रिंगणात ताकद लावली आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत युती-आघाड्या करुन निवडणूक लढणारे राजकीय पक्ष स्थानिकच्या निवडणुकीत मात्र एकमेकांच्या बोकांडी बसून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडत असल्याने लोकांचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत असल्याचे जाणवत आहे. कारण लोकसभा, विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाची तत्वे, नितिमत्ता सांगणारे पक्ष स्थानिकच्या निवडणुकीत मात्र सर्वकाही धाब्यावर बसवत असल्याचे दिसून येते.

पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्राचे राजकारण तर गेल्या काही वर्षात वेगळ्याच वळणावर गेले आहे. घराणेशाहीच्या सत्ताकारणामुळे राजकीय नेत्यांनी उभारलेले डोळे दिपवणारे एम्पायर टिकवून ठेवण्यासाठी राजकीय घराण्यांनी नवा राजकीय फंडा सुरु केला आहे. कुटुंबातील सदस्यांची विभागणी करत काहीजण सत्ताधारी तर काहीजण विरोधी पक्षात जोमाने राजकारण करत आहे. जेणेकरून देश-राज्यात अथवा स्थानिक पातळीवर कोणत्याही पक्षाची सत्ता असो, आपल्या कुटुंबातील एक तरी सदस्य सत्तेत असतोच. त्यामुळे कोणत्याही कारवाईची भीतीच त्या राजकीय घराण्याला असत नाही. मोठ-मोठ्या राजकीय घराण्यांनी हा राजकीय फंडा अवलंबल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्वच पक्षात स्वार्थाचे आणि घराणेशाहीचे राजकारण सुरु असल्याचा प्रकार आता लोकांच्या लक्षात येवू लागला आहे.



मोहोळ, बार्शी, पंढरपूर, माळशिरस, सांगोला नगरपालिकांच्या निवडणुकीत तर यंदा मोठी राजकीय खलबते झाली. एकेकाळी राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे बालेकिल्ले असलेल्या जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये या पक्षांची वाताहत होत आहे. विशेष म्हणजे, पक्षांतर्गत वादाच्या राजकारणानेच राष्ट्रवादीची अवस्था बिकट झाली आहे. मोहोळमधील राष्ट्रवादीमध्ये मोठा वाद उफाळला. या वादाचे रुपांतर पक्षाला रामराम ठोकण्यापर्यंत गेले. तरी देखील पक्षांतर्गत वाद पक्षाच्या मुख्य नेत्यांनी थांबवले नसल्याचे दिसून आले. याचाच अर्थ आपल्याच पक्षातील नेते आपसात शिवराळ भाषेत आरोप-प्रत्यारोप करत असताना पक्षप्रमुखांची याला मूकसंमती तर नव्हती ना, अशी चर्चा लोक करीत आहेत. एकत्र असतानाही राष्ट्रवादीमध्ये एकमेकांची जिरवण्याचेच राजकारण सुरु होते आणि त्याला राष्ट्रवादीच्या सर्वेसर्वा नेत्यांनी मौन धरुन खतपाणी घातल्यानेच या पक्षाची वाताहात झाल्याचे दिसून आले. याचाच परिपाक म्हणून अनगरच्या बाळराजेंनी थेट राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवारांनाच आव्हान दिल्याचे दिसले.

बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत तेथील पारंपारिक राजकीय विरोधक सोपल-राऊत यांच्यातच पहिल्या दिवसापासून चुरस दिसून आली. पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या बार्शीतील सभेनंतर राजकारण ढवळले आणि बार्शीचे आमदार तथा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री दिलीप सोपल यांनीही गोरेंवर टीकास्त्र सोडले. बार्शीचे चाणाक्ष मतदार कोणाच्या पारड्यात आपल्या मताचे दान टाकतात, हे मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे.

अक्कलकोट तालुक्यात अक्कलकोट, मैंदर्गी आणि दुधनी अशा तीन नगरपरिषदा आहेत. येथेही पारंपारिक राजकीय विरोधक असलेले आ.सचिन कल्याणशेट्टी आणि माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांच्यातच प्रमुख लढत दिसते आहे. येथील नेत्यांनी कार्यकर्त्यांसह घरातील लोकांनाही निवडणुकीत उतरवल्याने मोठी चुरस दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांना देखील येथे प्रचाराच्या मैदानात उतरावे लागले. त्यामुळे अक्कलकोटच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

पंढरपूर तालुक्याचे राजकारणच इरसाल असल्याची चर्चा नेहमीच होते. पंढरपूरचे आमदार स्थानिक मंगळवेढ्याचे आहेत तर पंढरपूरचे स्थानिक माढ्याचे आमदार आहेत. माजी आमदारांनी नगरपरिषदेवर सत्ता राखण्याचा चंग बांधला आहे. पंढरीच्या राजकारणात देखील घराणेशाहीचे चित्र आहे. मंगळवेढा नगराध्यक्ष पदाची निवडणूक पुढे ढकलली असल्याने येथील चुरस थोडी थंडावल्याचे चित्र आहे.

सांगोल्यात मात्र यंदाच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट असून शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या विरोधात सर्वच विरोधक एकवटले असून याची धुरा पालकमंत्री गोरेंच्या हाती आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्याच्या सत्तेत महायुतीत असलेल्या भाजपा-शिवसेनेत येथे आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. पालकमंत्री गोरे, आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दिपकआबा साळुंखे यांच्या युतीच्या उमेदवारांना वेगवेगळी चिन्हे मिळाली तर शहाजीबापूंचे उमेदवार मात्र चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. रात्रीत अचानक राजकीय पक्षांची कार्यालये तपासण्यात आल्याने येथील राजकारणाला काहीसे वेगळे वळण लागले आहे. या निवडणुकीत सांगोल्यात पालकमंत्र्यांसह विद्यमान आणि माजी आमदारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

माळशिरस येथेही चुरशीची निवडणूक सुरु असून मोहिते-पाटील कुटुंबातही आमना-सामना होत आहे. याठिकाणी भाजपाचे माजी आमदार राम सातपुते आणि शरद पवार राष्ट्रवादीचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यातच प्रमुख लढत जाणवते आहे. पालकमंत्री गोरेंनी देखील याठिकाणी प्रतिष्ठा पणाला लावली आहे. पण माळशिरस-अकलूजचा राजकीय इतिहास पाहता येथील मतदार चाणाक्ष असून निकाल बुधवारी मतमोजणीनंतरच कळणार आहे. करमाळा नगरपालिकेच्या निवडणुकीत स्थानिक आमदार अलिप्त दिसून येत आहेत. येथील निवडणुकीत माजी आमदार आणि नेत्यांमध्ये तसेच सावंत परिवारांमध्ये प्रमुख राजकीय लढत रंगल्याचे चित्र आहे. करमाळ्यात देखील राजकीय प्रमुख पक्षांमध्ये राजकीय भेळ-मिसळ दिसून येत आहे. करमाळ्यात सावंत गट सध्या प्रमुख दावेदार असल्याची चर्चा मतदारांमध्ये रंगली आहे.

### निधी कोणाला मागणार : पालकमंत्री गोरे; शासनाचा निधी वडिलोपार्जित प्रॉपर्टी नाही : आ. सोपल

बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत आजी-माजी पालकमंत्री भिडल्याचे चित्र आहे. पालकमंत्री जयकुमार गोरेंनी प्रचार सभेत आ. दिलीप सोपल यांना आव्हान देताना वक्तव्य केले की, एक तरी विकासकाम दाखवा, तूम्ही विकासकामासाठी निधी कोणाकडे मागणार. याला प्रत्युत्तर देताना आ.दिलीप सोपल प्रचार सभेत म्हणाले की, अहो पालकमंत्री गोरे मी १९८५ ला पहिल्यांदा आमदार झालो तेंव्हा तुम्ही कुठे तरी कॉलेजात शिकायला असाल. सोलापूरचे पालकमंत्री शरद पवारांसह अनेक दिग्गजांनी भूषविलेले आहे. पालकमंत्री पदाची प्रतिष्ठा जपली पाहिजे. विकासकामांसाठी आम्ही निधी कोणाकडे मागणार म्हणजे आम्ही मुख्यमंत्र्यांकडे निधी मागणार. कारण मुख्यमंत्री हे कोणत्या पक्षाचे नसतात तर ते महाराष्ट्राचे असतात. शासनाचा निधी म्हणजे कोणीही वडिलोपार्जित प्रॉपर्टी समजू नये. आजी-माजी पालकमंत्र्यांच्या टोलेबाजीने बार्शीचे राजकारण ढवळून निघाल्याचे चित्र आहे.

# २ लाखांवर खाजगी कंपन्या पाच वर्षांत बंद

**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

गेल्या पाच वर्षांमध्ये देशात २ लाख ४ हजार,२६८ हजार खाजगी कंपन्या बंद पडल्या आहेत, अशी माहिती सरकारने दिली आहे. २०१३ च्या कंपनी कायद्यांतर्गत ह्या कंपन्या बंद पडल्या आहेत.

कार्पोरेट राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी दिलेल्या लेखी उत्तरात ही माहिती देण्यात आली आहे. बंद पडलेल्या कंपन्यांमधील कामगारांचे पुनर्वसन करणार का? अशी माहिती विचारली असता यासंदर्भात सरकारपुढे असा कोणताही प्रस्ताव नसल्याचे मल्होत्रा यांनी सांगितले.

गेल्या पाच वर्षांमध्ये १ लाख, ८५ हजार, ३५० कंपन्यांची नोंदणी हटविण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात १६ जुलैपर्यंत साडेआठ हजार कंपन्या बंद पडल्या आहेत. बंद झालेल्या कंपन्या शेल कंपन्या होत्या का, असे विचारले असता कंपनी कायद्यात अशा कंपनीची नोंद होत नसल्याचे उत्तर सरकारच्या वतीने देण्यात आले आहे.

अनेक कंपन्या वित्तीय घाट्यामुळे बंद पडल्या आहेत. कंपन्या सुरू राहाव्यात यासाठी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. (वृत्तसंस्था)



संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत करताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, जितेंद्रसिंह व अन्य. कामकाजाला उपस्थित राहण्यासाठी येत असताना मंत्री चिराग पासवान, भाजपा खासदार कंगना राणावत, काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा आणि अपक्ष खासदार पप्पू यादव यांच्या टिपलेल्या भावमुद्रा

# काश्मीर-उत्तरप्रदेशात एनआयएची छापेमारी

### ● तपासाची व्याप्ती वाढविली ● डॉ. आदिल, मौलवीच्या घराची झडती







पुलवामा येथे संशयिताच्या घराची झडती घेताना सुरक्षा दलाचे जवान

**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने सोमवारी जम्मू-काश्मीर आणि उत्तरप्रदेशातील काही ठिकाणांवर छापेमारी केली. व्हाईट कॉलर्ड मॉड्युलशी संबंधित ही छापेमारी असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दिल्लीतील बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती वाढवत एनआयएने जम्मू-काश्मिरातील पुलवामा, शोपियाँ आणि कुलगाम जिल्ह्यातील आठ ठिकाणांवर छापेमारी केली. उत्तरप्रदेशातील विविध जिल्हे आणि लखनौमध्येही छापेमारी करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

शोपियाँतील मौलवी इरफान अहमद वगायच्या घराची एनआयएच्या पथकांनी झडती घेतली. व्हाईट कॉलर्ड दहशतवाद्यांना कट्टर बनवण्यात आणि तरुणांची भरती करण्यात वगायचा हात आहे. कार बॉम्बस्फोटाचा तपास हाती घेतल्यावर एनआयएने मागील महिन्यात त्याला अटक केली आहे.

एनआयएच्या पथकांनी पुलवामातील कोईल, चंदगाम, मलंगपुरा आणि संबुरा येथेही छापेमारी केली. मागील महिन्यात अटक केलेल्या डॉ. अदील अहमद राथरच्या उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथील घरावर एनआयएने छापेमारी केली, अशी माहिती सूत्रांनी दिली.

**जावेद सिद्दिकीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी**

दहशतवादाशी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात ईडीने अटक केलेला अल-फलाह विद्यापीठाचा संस्थापक जावेद सिद्दिकीला १४ दिवस न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिल्लीतील न्यायालयाने सोमवारी दिला.

१९ नोव्हेंबर रोजी न्यायालयाने त्याला १३ दिवस ईडीच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला होता. त्याला सोमवारी अतिरिक्त सत्र न्यायाधीश शीतल चौधरी प्रधान यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांनी जावेदला १५ डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. जावेदच्या कोठडीची मुदत मंगळवारी पहाटे एक वाजता संपणार असल्याने त्याला मुदतीआधीच हजर करणे अकाली आहे. तांत्रिकदृष्ट्या सोमवारी त्याच्या कोठडीला १२ दिवस होत असल्याचा युक्तिवाद ईडीच्या वकिलाने केला. दरम्यान, कोठडीतल्या कालावधीत जावेद सिद्दिकीला औषधे आणि चष्मा वापरू देण्याची त्याच्या वकिलाने मागितलेला परवानगी न्यायालयाने मान्य केली. ईडीच्या अधिकाऱ्यांनी सिद्दिकीच्या औषधांची चिठ्ठी न्यायालयाला सादर केली. त्याला उपचार मिळत राहावे, असे न्यायालयाने सांगितले. (वृत्तसंस्था)

## बॉर्डरजवळील श्रीगंगानगर बनले ‘लॉजिस्टिक हब’

**◆ जयपूर, १ डिसेंबर**

भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेला लागून असलेले श्रीगंगानगर परदेशी शस्त्रास्त्रांचे लॉजिस्टिक हब (पुरवठ्याचे केंद्र) बनत चालले आहे. पाकिस्तानात बसलेले समर्थित तस्कर दारूगोळापासून ते चीन-तुर्कस्तानमध्ये बनवलेली शस्त्रे ड्रोनद्वारे टाकत आहेत. येथून ही शस्त्रे देशाच्या इतर भागांमध्ये पोहोचवली जात आहेत. पूर्वी या मार्गातून अंमली पदार्थांचा पुरवठा केला जात होता.

अलीकडेच लुधियाना (पंजाब) पोलिसांच्या चकमकीत सापडलेला श्रीगंगानगर (राजस्थान) येथील रहिवासी रामलाल देखील पाक-समर्थित दहशतवादी मॉड्यूलचा भाग होता. यापूर्वी गुजरात एटीएसच्या ताब्यात आलेल्या तीन संशयित दहशतवाद्यांनाही शस्त्रे याच मार्गाने पोहोचवण्यात आली होती.

लुधियाना येथे पोलिसांनी २० नोव्हेंबर रोजी चकमकीनंतर रामलाल आणि दीपक या दोन तस्करांना हँड ग्रेनेडसह अटक केली होती. रामलाल श्रीगंगानगर जिल्ह्यातील लालगड शहरातील ताखरांवाली गावाचा रहिवासी आहे. (वृत्तसंस्था)

# ‘उम्मीद’वर वक्फ मालमत्तेची माहिती अपलोड करणे सक्तीचे

### मुदतवाढ देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार




**◆ नवी दिल्ली, १ डिसेंबर**

‘उम्मीद’ पोर्टलवर वक्फ मालमत्तेची माहिती अपलोड करण्याची अंतिम मुदत वाढविण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नकार दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना संबंधित न्यायाधिकरणासमोर त्यांची बाजू मांडण्यास सांगितले आहे.

अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करणाऱ्या याचिकांमध्ये ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड आणि नेते असदुद्दीन ओवैसी यांनी दाखल केलेल्या याचिकांचा समावेश होता. पोर्टलवर वक्फ मालमत्तेची माहिती अपलोड करण्याची अंतिम मुदत ५ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. तोवर माहिती अपलोड न केल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेला शिक्षा होऊ शकते.

न्यायाधीश दीपंकर दत्ता आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या न्यायासनाने सांगितले की न्यायालय वक्फ कायदा पुन्हा लिहू शकत नाही; उलट, वक्फ कायद्यात आधीच उपाय आहेत. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आधीच सांगितले होते की प्रत्येक मुतवल्ली केस-दर-प्रकरण आधारावर न्यायाधिकरणाकडून दिलासा मागू शकतो. हे अधोरेखित करून न्यायालयाने अंतिम मुदत वाढविण्यास नकार दिला. (वृत्तसंस्था)

**संभाव्य शिक्षा काय?**

**» यापूर्वी, १५ सप्टेंबर रोजी, सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अंतरिम आदेशात, वक्फ (सुधारणा) कायदा २०२५ पूर्णपणे स्थगित करण्यास नकार दिला होता. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने काही तरतुदींवर बंदी घातली होती. नियमांनुसार, वक्फ मालमत्ता अपलोड न करणाऱ्यांना सहा महिन्यांची शिक्षा आणि २०,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. पोर्टलवर त्यांच्या मालमत्तांची नोंदणी न करणाऱ्यांच्या मालमत्ता रद्द केल्या जातील आणि वक्फ न्यायाधिकरणाच्या आदेशानुसारच त्यांची पुन्हा नोंदणी करता येईल.**


# सोन्याची २० बिस्किटे जप्त

**◆ कोलकाता, १ डिसेंबर**

पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील घोजडांगा सीमेवर सोन्याची २० बिस्किटे सीमा सुरक्षा दलाने पकडली आहेत. या बिस्किटांची किंमत ३ कोटी रुपये आहे.

सीमेवरून दोन तस्कर सीमा पार करीत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर जवानांनी पाळत ठेवली. ३० नोव्हेंबर रोजी सीमेवर एक ट्रक आला. चालकाच्या केबिनची तपासणी केली असता आतमध्ये सोन्याची बिस्किटे आढळली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. दोघेही उत्तर २४ परगणा जिल्ह्यातीलच रहिवासी असून ते वीटभट्टीवर कामगार आहेत. एका अनोळखी व्यक्तीने ही बिस्किटे दिली असून त्याबदल्यात पैसे घेण्यास सांगितल्याची कबुली दोघांनी दिली आहे. सीमा सुरक्षा दलाने ट्रक जप्त केला असून दोघांना पुढील कारवाईसाठी संबंधित अधिकाऱ्यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

## ‘स्त्री’च्या पुढील भागात दिसणार दीपिका?



**मुंबई :** हिंदी चित्रपटसृष्टीत सध्या हॉरर कॉमेडीचे युग सुरू आहे. त्यात ‘स्त्री’ या चित्रपटाच्या सीरिजचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. श्रद्धा कपूर आणि राजकुमार राव यांच्या अप्रतिम अभिनयाने या चित्रपट मालिकेला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. आता याच्या आगामी भागात दीपिका पदुकोण झळकणार, अशी शक्यता वर्तविली जात आहे. कारण काही दिवसांपूर्वीच दीपिका मुंबईतील मॅडॉक फिल्म्सच्या कार्यालयाबाहेर दिसली. लोककथांमध्ये प्रसिद्ध असलेल्या बंगाली रहस्यमय भूतनी शकचुन्नीवर आगामी कथाभाग राहू शकतो. या भूमिकेसाठी सध्या दीपिकाशी चर्चा सुरू आहे. ही चर्चा पूर्णत्वास गेली तर कदाचित दीपिका आगामी भागात दिसू शकते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# केल्याने तीर्थाटन

भौतिक समाधानासाठी आवश्यक असलेल्या गरजांची पूर्तता झाली की, आपण ज्या समाधानाच्या शोधात होतो ते समाधान हे नाही याची जाणीव कदाचित होत असावी. बहुधा, भौतिक सुखाच्या आणि समाधानाच्या आजपर्यंतच्या कल्पनांचा पूर्ण उपभोग घेऊनही सुखाचा आणि समाधानाचा तो शोध संपलेला नसावा. तसे नसते, तर पर्यटनाच्या पारंपरिक प्रथांमध्ये परिवर्तन होऊ लागले नसते. 'केल्याने देशाटन' हा पर्यटनाचा पारंपरिक बाज आपल्या देशात तसा जुनाच आहे. या पर्यटनाच्या कल्पना मात्र जुन्या काळात वेगळ्या होत्या. अशा पर्यटनातून वेगवेगळ्या प्रांतातील पंडित, विद्वानांचा सहवास मिळतो, व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो आणि व्यासंग वाढून विद्वत्ता समृद्ध होते ही पारंपरिक पर्यटनाची समजूत काळासोबत बदलत गेली आणि पर्यटनास सहलीचे स्वरूप प्राप्त होत गेले. प्रेक्षणीय स्थळांच्या सहली आणि त्या निमित्ताने होणारा बाजारहाट व त्यातून पुन्हा घरांचे स्वरूप समृद्ध करणाऱ्या वस्तूंची खरेदी असा पर्यटनाचा नवा बाज सुरू झाल्याने त्यास या क्षेत्रास उद्योगाचे स्वरूप प्राप्त होत गेले. एका अर्थाने, पर्यटन हा आर्थिक उन्नतीचा एक नवा पर्याय म्हणून उभारी घेत गेला असला, तरी सहली, मौजमजा आणि आर्थिक उलाढालीचा नवा मार्ग असेच त्याचे रूप राहिल्याने जुन्या काळातील पर्यटनाच्या किंवा देशाटनामागच्या कल्पना संकोतच गेल्या. पुढे पर्यटनाच्या नव्या कल्पनांस बळ देतील अशी नवी पर्यटनस्थळे नव्याने आकार घेऊ लागली, जुन्या, पठडीबाज पर्यटनस्थळांनी कात टाकली व नव्या जाणिवांसोबत जुळवून घेण्याचे प्रयत्न करून त्यानुसार स्वत:मध्ये तसे बदलही घडवून आणले. पर्यटनाचा उद्देशच जेव्हा बदलून जातो, तेव्हा त्यामागील व्यवहारदेखील बदलतात. नव्या व्यवहारांनुसार पर्यटनाच्या संकल्पनेत आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य मिळाल्याने साहजिकच भौतिक सुखाच्या आणि विरंगुळ्याच्या शोधाचा नवा मार्ग म्हणूनच पर्यटन व्यवसायाची बरकत सुरू झाली. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असे म्हणतात. ते खरे आहे हे वारंवार सिद्धही झालेले आहे. अन्यथा, वेशभूषेपासून केशभूषेपर्यंतच्या अनेक परंपरा वेगळ्या स्वरूपात फॅशनच्या नावाने नव्या पिढीत रुजल्या नसत्या. पर्यटनाच्या नव्या व्यावहारिक विरंगुळ्यातून सुख, समाधानाचे शोध संपत नाहीत, विरंगुळ्याचे क्षणही वेचता येत नाहीत असे आता अनेकांच्या लक्षात येऊ लागले आहे. आता या क्षेत्राला नव्या वळणाची वाट सापडली असावी, पर्यटनक्षेत्राचे पूर्वीचे देशाटनाचे रूप बदलून सहली किंवा विरंगुळ्याचा मार्ग म्हणून वळण घेतलेल्या या क्षेत्राने पुन्हा जुन्या वाटांकडे मोहरा वळविण्याचे ठरविले असावे. त्याची काही चिन्हे आता दिसू लागली आहेत. समाजाची संस्कृती पिढीगणिक बदलत असते असे म्हटले जाते. नव्या पिढीसोबत रुजणाऱ्या नव्या संस्कृतीमुळे जुन्या पिढ्या उसासे टाकतात, 'आमच्या वेळी असे नव्हते' असे म्हणत बदलत्या संस्कृतीच्या नावाने खंतदेखील व्यक्त करत असतात, त्या पिढीला दिलासा मिळेल असे नवे चित्र पर्यटनाच्या क्षेत्रात उमटू लागल्याचे काही संकेत आता मिळू लागले आहेत. सहलींच्या किंवा प्रेक्षणीय स्थळांची जागा आता पुन्हा तीर्थक्षेत्रे घेऊ लागल्याचे चित्र नव्याने समोर येऊ लागले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पर्यटन क्षेत्राच्या भावी वळणाची ही नवी दिशा कदाचित याआधीच दिसू लागली असावी. राजे महाराजांच्या सामर्थ्यामुळे नव्हे, तर या देशातील तीर्थक्षेत्रांच्या वाटेवर उमटलेल्या संत-महंतांच्या पाऊलखुणांमुळे भारतासारखा खंडप्राय देश सांस्कृतिकदृष्ट्या एकसंध राहिला आहे, यावर विदेशी अभ्यासकांचेही एकमत आहे. भक्तीच्या धाग्याने व धार्मिकतेच्या भावनेने शाश्वत जीवनाच्या अर्थाचा शोध घेण्याचा ध्यास ही भारताची सांस्कृतिक परंपरा राहिली आहे आणि त्या ध्यासाच्या धाग्यानेच जनतेस प्रांतभेद, भाषाभेदाच्या दऱ्या बुजवून एकत्र राखले आहे. त्यामुळेच हा देश परकीय आक्रमकांच्या विध्वंसालाही पुरून उरला आणि देशाने आपली परंपरा जतन केली. संस्कृतीच्या या उपकारांची जाणीव पुन्हा समाजात जागी करण्याच्या हेतूने मोदी सरकारने विकासासोबत परंपरांच्या पुनरुज्जीवनाची मोहीम हातात घेतली आणि तार्थक्षेत्रांच्या विकासाचा कार्यक्रम सुरू केला. अयोध्येतील राम मंदिर, काशी विश्वेश्वराच्या नवनिर्माणाचा कार्यक्रम, गुजरातमधील सरदार पटेल यांचा स्टॅच्यू ऑफ युनिटी, अशा काही स्थळांच्या विकासातून पर्यटनक्षेत्रातील बदलाच्या नव्या वाटा निर्माण होत गेल्या. काशी विश्वेश्वराच्या कायापालटामुळे, केवळ तीर्थक्षेत्र असलेले हे ठिकाण आता पर्यटनक्षेत्रही ठरले आहे. सुधारलेले रस्ते, नियोजनबद्ध विकास यामुळे भाविकांच्या भक्तिभावना जाग्या होतात, तसेच प्रेक्षणीय काही पाहिल्याचा नवा आनंदही त्यासोबतच मिळू लागला आहे. केदारनाथ धामच्या विकासाची योजनाही पर्यटनाच्या नव्या वाटांना विस्तृत करण्यास साह्यभूत ठरणार आहे. विकास आणि संस्कृती संवर्धनाचे हे नवे प्रयोग हातात हात घालून सुरू असल्याने पर्यटनक्षेत्राच्या पठडीबाजपणाने कात टाकण्यास सुरुवात केली असून पर्यटनाची जागा तीर्थाटनाने घेतली तर नवल वाटू नये असा आश्चर्यकारक बदल दिसू लागला आहे. भारतातील पर्यटनक्षेत्राचा हा बदलता बाज देशातील पर्यटकांप्रमाणे विदेशी पर्यटकांसही भुरळ घालू लागला आहे. गेल्या काही वर्षांत भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढत आहेच, पण त्यांनादेखील पर्यटनसंस्कृतीतील हा नवा बदल खुणावत आहे. भारतातील प्रेक्षणीय स्थळांच्या त्यांच्या पसंतिक्रमात विविध धार्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रे आणि अयोध्येतील राम मंदिरासारख्या नव्या यादीचीही भर पडली आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत, विशेषतः कोविड महामारीनंतर जनजीवन पूर्वपदावर आल्यापासूनच्या काळात भारतास तब्बल सुमारे एक कोटी विदेशी पर्यटकांनी भेट दिली. यापैकी बहुसंख्य पर्यटकांची पावले भारतीय संस्कृतीची मानचिन्हे असलेल्या तीर्थक्षेत्रांकडेही वळलेली दिसतात. हा पर्यटनसंस्कृतीतील बदल किती चांगला, हे ठरविण्यासाठीचे नवे मापदंड याचे उत्तर सकारात्मकच देतात. पर्यटन हा उद्योग असेल, तर त्यातून आर्थिक उलाढालींचे नवे स्रोत तयार व्हावेत हीच प्राधान्याने अपेक्षा असते. समाजात रोजगाराच्या नव्या संधी, उत्पन्नाचे नवे स्रोत आणि पर्यायाने जीवनशैलीत होणारी सुधारणा हेच विकासाचे उद्दिष्ट असेल, तर तीर्थाटनांच्या नव्या प्रकारांतूनही ते साध्य झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दर वर्षी ३१ डिसेंबर हा दिवस वर्षअखेरचा सोहळा म्हणून साजरा केला जातो. त्याच्या साजरेपणाच्या कल्पनांवरील बाह्य समजुतींचा पगडादेखील आता नव्या पर्यटनसंस्कृतीमुळे पुसला जात असल्याचे चित्र आहे. सणासुदीच्या काळातील पर्यटनाकडे वळणारी पावले आणि वर्षअखेरीसारख्या क्षणांचे साजरेपण यांमधील फरक आता पुसला जाऊ लागला आहे. उत्सवांचा काळ संपला की समाजाची पावले मौजमजेकडे वळतात हा आजवरचा पर्यटनक्षेत्राचा पठडीबाज अनुभवही आता बदलाच्या टप्प्यावर दाखल झाला आहे. कारण, आता भारतीय पर्यटकांची पावले वर्षअखेरीचा सोहळा साजरा करण्यासाठी किंवा ख्रिसमसची सुटी घालविण्यासाठी युरोप किंवा थायलंडसारख्या प्रेक्षणीय परदेशी पर्यटनांची वाट धरण्याऐवजी भारतातील तीर्थक्षेत्रांच्या सहलीकडे वळू लागली आहेत. अयोध्या, वाराणसी, ऋषीकेश, अमृतसरसारख्या तीर्थस्थळांवरील गर्दी यंदाच्या डिसेंबरचा अखेरच्या आठवड्यात नवा विक्रम प्रस्थापित करेल असा सहल आयोजकांचा अंदाज या बदलाचे संकेत देतो. गेल्या वर्षभरात जेन-झीच्या मानसिकतेचे अनेक नवे पैलू जगाच्या वेगवेगळ्या भागांतून दिसू लागले असताना, भारतातील 'जेन-झी'ला तीर्थस्थळांचे आकर्षण वाटू लागल्याचेही दिसू लागले आहे. तीर्थस्थळांची यात्रा करणाऱ्यांपैकी सुमारे १२ टक्के पर्यटक तरुण पिढीतील असल्याची ढोबळ आकडेवारी समोर येत आहे. गेल्या वर्षातील तीर्थयात्रींच्या तुलनेत ही टक्केवारी सुमारे १५ टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे, भौतिक सुखाच्या उपभोगानंतरही समाधानाचा शोध संपलेला नसल्याचा व समाधानाच्या शोधात नव्या समाजाच्या आसुसलेपणाचा अंदाज या नव्या बदलातून येऊ शकतो. पर्यटनक्षेत्राला चालना मिळेल हा या नव्या बदलाचा फायदा आहेच, पण नव्या मानसिकतेचे दर्शन घडविणारा हा नवा बदल म्हणजे भविष्यात घडणाऱ्या इतिहासाच्या पुनरावृत्तीची चाहूल तर नसेल?

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# नेतान्याहू यांनी का टाळला भारत दौरा?

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने इस्रायलचे भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेले संबंध खूप मजबूत आहेत, असे अलिकडे सांगितले. खरे तर याची उजळणी करण्याची काहीच गरज नव्हती; परंतु नेतान्याहू यांच्या कार्यालयाने 'एक्स'वर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांची टीम भारतभेटीसाठी नव्या तारखेबाबत चर्चा करीत आहे. याचा अर्थ असा की, नेतान्याहू यांचा आगामी भारत दौरा पुढे ढकलला गेला आहे आणि नवी तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. याचा दुसरा अर्थ असा की, मध्य पूर्वेत घेतलेल्या भूमिकेमुळे नेतान्याहू अनेकांच्या रडारवर आहेत आणि जीविताला धोका असल्याच्या भीतीतून तूर्त त्यांचा दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. दुसरे एक कारण म्हणजे इस्रायलचे परंपरागत विरोधी असलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हेही नेमके याच काळात भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. 'आय २४ न्यूज' या इस्रायली वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव भारत दौरा रद्द केला आहे. तथापि, 'सुरक्षेच्या कारणास्तव' असा उल्लेख कुठेही अधिकृतपणे करण्यात आलेला नाही. या वृत्तवाहिनीचे राजनयिक प्रतिनिधी गाय अझिएल यांनी लिहिले आहे की, नेतान्याहू यांची भारतभेट सुरक्षेच्या कारणास्तव पुढे ढकलण्यात आली आहे. दोन आठवड्यांपूर्वी नवी दिल्ली येथे एका दशकाहून अधिक काळानंतर अत्यंत शक्तिशाली बॉम्बस्फोट झाला. त्यात १३ लोक ठार झाले तर डझनभर जखमी झाले होते. नेतान्याहू यांनी २०१८ मध्ये शेवटचा भारत दौरा केला होता आणि पंतप्रधान मोदी यांना भेटण्यासाठी ते परत येणार होते. आता सुरक्षेच्या मूल्यांकनाच्या आधारे, पुढील वर्षी नवीन तारीख निश्चित होण्याची अपेक्षा आहे.

नेतान्याहू हे मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प या दोघांनाही आपले मित्र म्हणतात. वृत्तवाहिनीच्या या अहवालाचा हवाला देऊन, भारतीय माध्यमांमध्ये बातम्या पसरू लागल्या की, इस्रायली पंतप्रधानांनी सुरक्षेच्या कारणास्तव आपला भारत दौरा पुढे ढकलला आहे. संध्याकाळपर्यंत इस्रायली पंतप्रधान कार्यालयाला स्पष्टीकरण द्यावे लागले. इस्रायली पंतप्रधान कार्यालयाच्या विधानाबाबत, गाय अझिएल यांनी लिहिले की, सुरक्षेच्या कारणास्तव डिसेंबरमध्ये पंतप्रधान नेतान्याहू यांचा भारत दौरा पुढे ढकलण्यात आला आहे, या आमच्या विशेष वृत्तानंतर पंतप्रधान कार्यालयाने एक असामान्य निवेदन जारी केले आहे. हे विधान दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यावर आणि भेटीसाठी नवी तारीख निश्चित करण्यावर भर देते. भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी २० नोव्हेंबर रोजी इस्रायलमध्ये नेतान्याहू यांची भेट घेतली. या बैठकीनंतर, इस्रायली पंतप्रधानांनी २३ नोव्हेंबर रोजी 'एक्स'वर लिहिले की, आज मी गोयल यांची भेट घेतली. भारत आणि इस्रायल आपली धोरणात्मक भागीदारी मजबूत करीत आहेत.



नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव त्यांचा भारत दौरा पुढे ढकलला का, या प्रश्नाचे उत्तर देताना सौदी अरेबियातील भारताचे माजी राजदूत तलमीज अहम म्हणतात, नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव दौरा पुढे ढकलणे भारतासाठी लज्जास्पद आहे. इस्रायली पंतप्रधानांनी आपला भारतातील सुरक्षेवर पूर्ण विश्वास आहे, असे स्पष्ट केले असले, तरी नेतान्याहू सरकारकडून ब्रीफिंगशिवाय तिथल्या माध्यमांमध्ये इतका मोठा मुद्दा प्रकाशित झाला नसता.

आजघडीला नेतान्याहू हे घरी अनेक आघाड्यांवर वेढलेले आहेत आणि या वेळी भारताला भेट देणे त्यांच्यासाठी कठीण आहे. त्यांनी सत्य सांगायला हवे होते; परंतु कथित भेट पुढे ढकलण्याचे कारण म्हणून त्यांनी सुरक्षाविषयक चिंता पुढे केल्या आहेत. हे भारताचा अपमान करणारे आहे. भारत आणि इस्रायलमध्ये बरेच प्रतीकात्मक संबंध आहेत. असे असूनही, नेतान्याहू यांनी आपला दौरा पुढे ढकलून भारताला चांगला संदेश दिलेला नाही. अमेरिकेशिवाय कोणीही त्यांच्यासोबत उभे नव्हते, तेव्हा भारत त्यांना पाठिंबा देत होता. ट्रम्प यांच्या भारताप्रति बदललेल्या भूमिकेवरून इस्रायलमध्ये वाद सुरू झाला आहे. नेतान्याहू यांनी भारताचा दौरा पुढे ढकलण्याचे कारण म्हणून सुरक्षा चिंतांचा उल्लेख करणे तर्कसंगत नाही. नेतान्याहू भारताकडून खूप अपेक्षा करत आहेत, पण भारत एका मर्यादेपलीकडे जाऊ शकत नाही. नेतान्याहू यांना वाटते की, भारत कधी तरी पॅलेस्टिनींची बाजू घेतो तर कधी तरी इस्रायलला पाठिंबा देतो. भारताने या विषयात मध्यस्थी करावी, असे इस्रायलला वाटत असले, तरी भारत तसे करणार नाही. कारण त्याच्याही काही मर्यादा आहेत. त्यातच सध्या भारत आणि अमेरिकेचे संबंध चांगले नसल्याने ट्रम्प भारताची मध्यस्थी मान्य करणार नाहीत. याची भारताला जाणीव आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला, तर इस्रायलची प्रासंगिकता वाढते. कारण इस्रायल पाकिस्तानच्या अण्वस्त्रांना धोका मानतो. भारताचे अमेरिकेशी संबंध खराब असतील, तर इस्रायलशीही फारसे चांगले संबंध राहणार नाहीत. ट्रम्प यांनी भारतावरील कर ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली, तेव्हा नेतान्याहू म्हणाले होते की, मोदी आणि ट्रम्प हे चांगले मित्र आहेत. ते मोदी यांना ट्रम्प यांच्याशी व्यवहार करण्यासाठी काही सूचना देतील; परंतु सार्वजनिकरीत्या नाही. नेतान्याहू यांनी भारतीय पत्रकारांच्या गटाला सांगितले की, भारत आणि अमेरिकादरम्यानच्या संबंधांमध्ये मूलभूत समजूतदारपणा आहे. दोन्ही देशांमधील संबंधांचा पाया खूप मजबूत आहे. दोन्ही देशांनी करार केला आणि करसमस्येचे निराकरण केले तर ते भारत आणि अमेरिकेच्या हिताचे असेल. हे आमच्यादेखील हिताचे असेल; कारण दोन्ही देश चांगले मित्र आहेत. नेतान्याहू यांनी या वर्षी सप्टेंबरमध्ये अमेरिकेला भेट दिली होती. 'व्हाईट हाऊस'च्या एका सल्लागाराने युक्रेनवरील रशियाच्या क्रूर हल्ल्याला 'मोदी युद्ध' म्हटले आहे. ऊर्जेसाठी भारताचे रशियावर वाढत असलेले अवलंबित्व दुःखद आहे; परंतु पुतिन यांच्या युद्ध गुन्ह्यांसाठी भारत जबाबदार नाही, असेही त्यांनी म्हटले होते. माजी इस्रायली खासदार आणि मध्य पूर्व प्रकरणांच्या तज्ज्ञ केसेनिया स्वेतलोवा यांनी या वर्षी फेब्रुवारीमध्ये मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीपूर्वी 'जेरुसलेम पोस्ट' या वृत्तपत्रामध्ये 'इस्रायलने मोदी-ट्रम्प बैठकीची काळजी का घ्यावी' या शीर्षकाचा लेख लिहिला होता.

केसेनिया स्वेतलोवा यांनी लिहिले की, भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (आयएमईसी) साठी भारत आणि अमेरिकेतील चांगले संबंध महत्त्वाचे आहेत. मोदी पंतप्रधान झाल्यापासून भारताचे इस्रायलशी संबंध चांगले झाले आहेत. मोदी हे इस्रायलला भेट देणारे पहिले पंतप्रधान होते. भारत-पाकिस्तान संघर्षात जगातील जवळजवळ सर्व देशांनी तटस्थ राहण्याचा प्रयत्न केला, तेव्हा इस्रायलने भारताला उघडपणे पाठिंबा दिला. २००३ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात इस्रायली पंतप्रधानांची पहिली भारतभेट झाली होती. त्या वेळी एरियल शेरोन यांनी भारताला भेट दिली होती. भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला की भारत आणि इस्रायलमधील संबंध अधिक मजबूत होतात, असे निरीक्षण अनेक विचारवंतांनी नोंदवले आहे. पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे आणि अणुबॉम्ब मुस्लिम राष्ट्रांचा विरोधक म्हणून पाकिस्तान इस्रायलविरोधात वापरायला कमी करणार नाही, अशी भीती इस्रायलला वाटते. त्यामुळे या दोन देशांमध्ये तणाव होतो, तेव्हा इस्रायल-भारत संबंधांमध्ये सुधारणा होते. सध्या भारत आणि पाकिस्तानदरम्यानचे संबंध ताणलेले आहेत. अशा वेळी नेतान्याहू यांनी दौरा रद्द करायला नको होता; परंतु ट्रम्प यांच्या दबावाखाली कदाचित नेतान्याहू यांनी हा दौरा रद्द केला असावा.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# बिबट्यांची दहशत; नागरिकांची गस्त

राज्यातील अनेक जिल्ह्यांत सध्या बिबट्यांनी दहशत माजवली आहे. अनेक ठिकाणी मानवी वस्तीत बिबट्यांचा मुक्तसंचार दिसून येतो आहे. काही ठिकाणी तर लहानग्या मुलांवर बिबट्याने हल्ला केल्याच्याही घटना घडल्या आहेत. पण सुदैवाने या घटनेत लहान मुले वाचली असली तरी इजा मात्र गंभीर झाल्या आहेत. या घटनेने सध्या नगर पालिका निवडणुकांच्या धामधुमीत राजकीय वातावरण तापलेले असताना संपूर्ण महाराष्ट्रभर बिबट्यांची दहशत पसरली आहे. अशा परिस्थितीत बिबट्यापासून वाचवण्यासाठी वनविभागाने नागरिकांसाठी काही आदेश व उपाय जारी केले आहेत. बिबट्यांच्या वाढत्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यावर उपाय म्हणून, अनेक ठिकाणी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून गस्त वाढवण्यात आली आहे. ज्यात थर्मल ड्रोनसारख्या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. नागरिकांनीही स्वसंरक्षणासाठी उपाययोजना केल्या आहेत. जसे की पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात महिलांनी गळ्यात टोकदार खिळ्यांचा पट्टा घालणे. प्रशासनाकडे बिबट्या पकडण्यासाठी पिंजरे लावण्याची आणि गस्त वाढवण्याची मागणी होत आहे. नागरिक आणि वन विभागाचे कर्मचारी मिळून गस्त घालत आहेत. बिबट्याच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्रात बिबटग्रस्त भागात राज्य आपत्ती जाहीर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. वनअधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे आवश्यक आहे. जंगलातील वन्यप्राणी मानवी वस्तीकडे वळू लागले आहेत. वन्यप्राण्यांमुळे शेती पिकांचे नुकसान होत आहे. तसेच प्राणघातक हल्ले करत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने यावर ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे. काही दिवसांपासून शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बिबट्याचा वावर वाढला आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा-मेहकर मार्गावर लमानदेव मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या शेतात बिबट्याचा मुक्तसंचार असल्याचे समजते. तिथे खेळत असलेल्या लहान मुलांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार निदर्शनास आला व मोठा अनर्थ टळला. पाच दिवसांपासून संग्रामपूर तालुक्यातील पाच गावांत बिबट्याने दहशत माजविली आहे. काकनवाडा, वडगाववाण, खळद, कोलद, बल्लाळी या गावांत आपला डेरा टाकल्याने या भागातील शेतातील कामे प्रभावित झाली आहेत. गेल्या पाच दिवसांपासून शेतमजूर व शेतकऱ्यांनी शेताकडे जाण्यास पाठ फिरवली आहे. या पाच गावांना लागून वान नदी व अडचणीचे जंगल अशी बिबट्याला लपण्यासाठी जागा आहे. पुणे जिल्ह्यातील बिबटप्रवण क्षेत्रातील शाळांची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी ४ अशी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि अंधार होण्यापूर्वी त्यांना घरी पोहोचता यावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मागील महिन्यात बिबट्याच्या हल्ल्यात तीन लोकांना प्राण गमवावे लागले. या पृष्ठभूमीवर, शिरूर- आंबेगाव- खेड-जुन्नर या अतिसंवेदनशील बिबटप्रवण क्षेत्रातील शाळांच्या वेळात बदल करण्यात आला. गेल्या काही महिन्यांत गावोगावी दिसणाऱ्या बिबट्यांची दहशत हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला आहे. याच पृष्ठभूमीवर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाची महत्त्वाची आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीत वन विभागाच्या संरचनात्मक विस्तारीकरण तसेच कार्यात्मक सबलीकरणासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. थर्मल ड्रोन, ट्रॅप कॅमेरे, झूम स्कोप यांच्या मदतीने तसेच पथकांनी विविध भागांत बिबट्यांचा शोध सुरू केला आहे. तसेच वन विभागामार्फत शहरातील विशेषत: टेकडी परिसर व इतर मोठ्या प्रमाणात संरक्षित प्रदेशातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. बिबट्याच्या मुक्तसंचाराने परिस्थिती गंभीर झाली असून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिक दोन्ही स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कामगार कायद्यांचे स्वरूप आणि फायदे

केंद्र सरकारने नवीन कामगार कायदे लागू करण्यासंबंधी निर्णय नुकताच जाहीर केला असून, त्यामुळे सर्व राज्य सरकारांच्या माध्यमातून या कायद्यांतर्गत नियम व तरतुदींच्या अंमलबजावणीला चालना मिळणार आहे. या नव्या कामगार कायद्यांवर साधकबाधक चर्चा होणे स्वाभाविक व आवश्यकदेखील आहे. विशेषत: केंद्रीय कामगार संघटनांनी यासंदर्भात आंदोलनांसह विरोधाची भूमिका घेण्याच्या पृष्ठभूमीवर नवीन कामगार कायदे व त्यातील तरतुदींचा मुळातून अभ्यास करणे गरजेचे ठरते.

यासंदर्भात सकृद्दर्शनी सांगायचे म्हणजे, केंद्र सरकारने परंपरागत स्वरूपात लागू असणाऱ्या २९ कामगार कायद्यांचा व्यापक व सर्वसमावेशक समावेश नवीन चार कामगार कायद्यांमध्ये केला आहे. कामगारांच्या संदर्भात संख्यात्मकदृष्ट्या सांगायचे म्हणजे, आज देशांतर्गत श्रमिकक्षेत्रात सुमारे ५० कोटी कर्मचारी-कामगार कार्यरत असून, त्यापैकी अधिकांश म्हणजेच सुमारे ९० टक्के कामगार हे असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचा या नव्या तरतुदींमध्ये प्रकर्षाने विचार करण्यात आल्याचे दिसून येते.

कामगार कायद्यांची संख्या व त्यातील मुख्य व महत्त्वाच्या तरतुदींची अंमलबजावणी यावर आपले मत आणि विचार व्यक्त करताना २००२ मध्ये स्थापन झालेल्या द्वितीय श्रम आयोगाने स्पष्टपणे नमूद केले होते की, भारतातील प्रचलित कामगार कायद्यांची संख्या व स्वरूप पाहता, त्यावर गांभीर्याने विचार करून केंद्र सरकारने सर्वसमावेशक व व्यापक तरतुदींसह असणारे चार ते पाच कामगार कायदे केंद्रीय स्तरावर करणे आवश्यक ठरते. त्यानंतर या मुद्यावर सुमारे १८ वर्षे फारशी चर्चा व हालचाल झाली नाही. त्यामुळेच या नव्या कामगार कायद्यांच्या संदर्भातील महत्त्व प्रकर्षाने जाणवते.

नव्या कामगार कायद्यांची रचना आणि आखणीची पूर्वतयारी म्हणून २०१४ पासून मोदी सरकारने घेतलेल्या व अंमलात आणलेल्या प्रमुख कामगार कायद्यांचा गोषवारा खालीलप्रमाणे सांगता येईल :

कामगार कायदे व नियम यांची पारदर्शी व परिणामकारक स्वरूपात अंमलबजावणी करण्यासाठी संगणकीय पद्धत आणि प्रक्रियेची अंमलबजावणी आवश्यक करण्यात आली.

ग्रॅच्युईटी रकमेची कमाल मर्यादा २९ मार्च २०१८ पासून १० लाखांहून २० लाख करण्यात आली.

१६ फेब्रुवारी २०१७ पासून कामगार वेतन कायद्यात कामगारांचे वेतन चेकद्वारा अथवा थेट त्यांच्या खात्यावर जमा करण्याची तरतूद करण्यात आली.

मातृत्वविषयक कायद्यांतर्गत २०१७ मधील नव्या तरतुदींनुसार १ एप्रिल २०१७ पासून मातृत्व रजेचा कालावधी १२ आठवड्यांहून २६ आठवडे एवढा करण्यात आला.

या पृष्ठभूमीवर नवीन कामगार कायद्यांच्या संदर्भात थोडक्यात; पण महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे सांगता येतील :

**किमान वेतनविषयक तरतुदी** : नव्या तरतुदींनुसार किमान वेतन कायदा आता सुमारे ५० कोटी कामगारांना लागू होईल. यामध्ये संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांतील कामगारांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

**किमान वेतन** : २०१९च्या नव्या कामगार कायद्यातील तरतुदी आता सर्व उद्योगातील कामगारांना लागू करण्यात आल्या असून, त्याची दर पाच वर्षांनंतर कामगारांच्या किमान वेतनाची फेररचना केली जाणार आहे.

**सामाजिक सुरक्षा कायदा** : कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने नव्या कायद्यांमध्ये कामगारांना सामाजिक सुरक्षेच्या संदर्भात लागू असणाऱ्या सुमारे १३ कायद्यांचा नव्या संदर्भात समावेश करून औद्योगिक कामगारांना प्रत्येक परिस्थितीत सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.

**कामगार सुरक्षाविषयक कायदे** : कामगारांना सर्वकालीन सुरक्षा प्रदान करण्याच्या व्यापक उद्देशाने कामगार सुरक्षा विषयाशी संबंधित अशा १३ प्रचलित कायद्यांच्या समावेशातून २०२०च्या कामगार सुरक्षा व आरोग्यविषयक कायदा लागू करण्यात आला आहे. या नव्या कायद्यातील तरतुदींनुसार, आता रोजगारासाठी अन्य राज्यांमधून येणाऱ्या कामगारांना आता त्यांच्या रोजगाराच्या राज्यात सरकारी नियमांनुसार धान्य उपलब्ध करून दिले जाईल, याचा फायदा अशा कामगारांच्या कुटुंबीयांना पण मिळेल. याशिवाय, महिला सशक्तीकरण अधिक परिणामकारक करण्यासाठी कायदेशीर तरतुदी केल्या आहेत.

**कामगार विवादांची सोडवणूक** : कामगार व कामगार संघटनांशी निगडित विवाद वा विषयांची सोडवणूक करण्यासाठी २०२० औद्योगिक संबंध कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. याशिवाय, कामगारांना वार्षिक रजा मिळण्यासाठी पूर्वी असणारी वर्षात २४० दिवस काम करण्याची अट आता वर्षात १८९ दिवसांवर आणण्यात आली आहे. यानुसार, कामगारांना आता २० दिवस काम करण्यापोटी एक दिवसाची वार्षिक रजा लागू होणार आहे. संघटित क्षेत्रातील कामगारांचा रोजगार गेल्यास त्याला सरकारी योजनेनुसार, अटल विमित व्यक्ती कल्याण योजनेंतर्गत लाभ मिळू शकेल. बेरोजगार झालेल्या कामगारांसाठी हा एक नवा पर्यायी लाभ ठरू शकेल. न्यायालयीन प्रक्रियेला चालना देऊन अधिक गतिमान करण्यासाठी कामगार न्यायालयात दोन सदस्यांची नेमणूक करणे, कामगार प्रश्नाचे विवाद प्राधान्य तत्त्वावर सोडवून निर्णय देण्यासाठी आता अशा प्रकरणी निकाल देण्यासाठी एक वर्षाची कालमर्यादा घालण्यात आली आहे.

**कामगार संघटनाविषयक** : ज्या कारखाना-आस्थापनेत एखाद्या कामगार संघटनेची सदस्यसंख्या ५१ टक्के वा त्याहून अधिक असेल, अशा कामगार संघटनेला त्या आस्थापनेत कामगारांची प्रतिनिधिक कामगार संघटना म्हणून मान्यता दिली जाईल. ज्या आस्थापनेत कामगार संघटनेची सदस्यसंख्या ५१ टक्क्यांहून कमी असेल, अशा ठिकाणी विविध कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची मिळून समिती स्थापित करून या प्रतिनिधींना व्यवस्थापनाशी चर्चा करण्याचे अधिकार राहतील.

**कंत्राटी कामगार कायदा** : नव्या कामगार कायद्यातील तरतुदींनुसार, कंत्राटी कामगारविषयक तरतुदी ज्या ठिकाणी ५० हून अधिक कंत्राटी कामगार असतील, अशा ठिकाणी लागू होतील. याशिवाय, कंत्राटी कामगारविषयक परवान्याची मुदत आता पाच वर्षांपर्यंत वाढविण्यात आली असून, निवडक उद्योगांमधील कंत्राटी कामगारांनी संघटना स्थापन केल्यास, निर्णय प्रक्रिया केंद्र सरकारकडे सोपविण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या नव्या कामगार कायद्यांमध्ये उद्योगक्षेत्रातील कंपन्यांपासून कामगार-कंत्राटदारांपर्यंत विविध घटकांची नोंद घेतली गेली आहे, हे या धोरणाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-६०

मंगळवार, २ डिसेंबर २०२५

### तुझे तेज अंगी शतांशे जरीही उजाळून देऊं दिशा दाहि दाही

तुझे तेज अंगी शतांशे जरीही उजाळून देऊं दिशा दाहि दाही ॥धृ.॥

स्मिताने तुझ्या विश्व तेजे भरेल, तमाचे कुठे नाव तेव्हा उरेल
मुखातून ये ना जरी शब्द काही, अभागी जना या तरी यापुढेही
तुझे धीर गंभीर ते शब्द कानी, अजूनी अम्हा देति उत्साह कार्या
पुढे चालवू कार्य तूझे सदाही, उजाळून देऊ दिशा दाहि दाही ॥१॥

समाधी तुझी ही इथे बांधिलेली, म्हणूनीच भूमी असे पुण्यशाली
हवेचा इथे हा अणूरेणु पूर्ण, तुझ्या आत्मतेजे असे दीप्तिपूर्ण
समाधिस्थ होता तुवा हा दिलेला, करांतील तो दीप आम्ही धरीला
पुढे चालवू कार्य तूझे सदाही, उजाळून देऊ दिशा दाहि दाही ॥२॥

स्मृतीने तुझ्या मात्र अश्रू गळावे, सुचावे न काही मनाशी रडावे
पुसूनीच अश्रू पुढे जावयाते तुझा याचितो स्पर्श मी एक हाते
मुखी नाम राहो सदा केशवाचे, तरूनी-तदा अश्मही जावयाचे
प्रसादे तुझ्या शक्ति ती अंगि येवो समाधीपुढे प्रार्थना हीच होवो ॥३॥

## वाचक पत्रे

### मतदारांनी मतदानाचा हक्क चोखपणे बजावा

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये नागरिकांना मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला असतो. ग्रामपंचायत, नगरपालिकांपासून तर लोकसभेपर्यंत ज्या निवडणुका होतात त्यामध्ये मतदार आपल्या मतदानाच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा उमेदवार लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देतो. निवडलेल्या लोकप्रतिनिधींमधून त्या त्या स्तरावरील शासन व्यवस्था निर्माण होत असल्याने मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार चोखपणे बजावणे अत्यावश्यक आहे.

मंगळवार २ डिसेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात नगरपालिका व नगरपंचायत निवडणूक होत आहे. आपल्या नगरामधील, शहरातील समस्या सोडविण्यासाठी मतदारांना सक्षम उमेदवारांची निवड करावयाची आहे. सक्षम नगराध्यक्षांची निवड करावयाची आहे. मतदारांसाठी ही एक उत्तम संधी आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेमध्ये निवडणुकीचे महत्त्व कथन केले आहे.

काही उमेदवार निवडणुका जिंकण्यासाठी मतदारांना पैशाचे प्रलोभन दाखवून त्यांची मते विकत घेण्याचा प्रयत्न करतात, खोटी आश्वासने देतात, मतदारांना दमदाटी करतात, सत्तेच्या माध्यमातून भ्रष्टाचार करतात, अशा उमेदवारांना मतदारांनी मतदान करू नये. जनसामान्याच्या हिताची व विकासाची तळमळ असणाऱ्या उमेदवारांनाच मतदारांनी निवडून द्यायला पाहिजे.

**प्रा. उदय कानतोडे**/९४२३६६३७०६

### ढोंगी आणि हिंदुद्रोही पर्यावरणप्रेमी

लवकरच नाशिकला कुंभमेळा होणार आहे. नुकताच प्रयागराजला १४४ वर्षानंतर झालेला महाकुंभ सर्व विश्वात गाजला. संपूर्ण जगातले कोट्यवधी धर्मप्रेमी यात सहभागी झाले व मानसिक, धार्मिकरीत्या धन्य झाले. त्यामुळे अब्जो रुपयांची उलाढाल देखील झाली व हजारो हाताना रोजगार मिळाला. आता एवढे मोठे प्रस्तावित आयोजन करताना अनेक बाबी विचारात घ्याव्या लागतात. पहिले म्हणजे विस्तारित भव्य विशाल व योग्य जागा.

**रवी वाघमारे**/नागपूर

### सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मची उंची कमी करावी



सोलापूर रेल्वे स्थानकात रेल्वे प्रशासन प्लॅटफॉर्म २ व ३ चे विस्ताराचे काम करणार आहेत तर डब्यातून उतरताना सध्या डबा व platform मधील अंतर (उंची) १ फूट आहे. ती कमी करून एकच लेव्हल करावे. म्हणजे ज्येष्ठ नागरिक, महिला व गुडघ्याचा त्रास असणाऱ्यांना फायदा होईल व चढ उताराचा वेळ वाचेल. व्हिल बॅगा घेऊन माणूस सोईस्कर डब्यातून आत बाहेर करू शकेल. तसेच वेळ व पाकीट मारीचे प्रसंग व सामान चोरीचे हे सर्व बंद होतील. सन २०११-१२ साली प्लॅटफार्मचे काम झाले, त्यावेळी हा उंचीचा प्रश्न निर्माण झाला. पूर्वी डबा व plateform यांची लेव्हल एकच होती. हा पण एक शारीरिक सोलापूरकरांसाठी विकासचाच भाग आहे, असे समजावे.

**- जयजीत पटवा, सोलापूर**

# सत्तेच्या चाव्या मतदारराजा कोणाकडे देणार?

## अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गीतील मतदानाकडे जिल्ह्याचे लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**
अक्कलकोट, मैंदर्गी, दूधनी नगरपालिकेसाठी मंगळवारी मतदान होणार असून तिन्ही नगरपालिकेत सत्तेच्या चाव्या मतदार राजा कोणाकडे देणार याचे गुढ मतदानयंत्रात बंद होणार आहे. येथील मतदान व निकालाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेली प्रचाराची रणधुमाळी थांबली आहे. अक्कलकोट, मैंदर्गी, दूधनी येथील मतदार नगरपालिकेतील सत्ता कोणाच्या ताब्यात देणार आहेत. याचा फैसला ३ डिसेंबर रोजी मतमोजणीनंतर होईल. या निवडणुकीमध्ये जाहीर सभा पदयात्रा त्याचबरोबर वैयक्तिक गाठीभेटी यावर उमेदवारांनी भर दिला. भाजपाकडून आमदार सचिन कल्याणशेट्टी तर शिवसेना शिंदे गटाकडून माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे या दोन्ही मातब्बर नेत्यांनी नगराध्यक्षपद तसेच नगरसेवकपदाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी स्टार प्रचारक द्वारे मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. प्रचारादरम्यान दोन्ही गटाने घेतलेल्या जाहीर




सभा तसेच आश्वासने चर्चेत राहिली. दूधनी नगराध्यक्षपदाच्या शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार प्रथमेश म्हेत्रे आणि भाजपाचे अतुल मेळकुंदे या दोन्ही उमेदवारांमध्येच अटीतटीची लढाई आहे. निवडणूक रिंगणात काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार रिंगणात आहेत. मैंदर्गी नगराध्यक्षपदाच्या स्थानिक गटाचे उमेदवार शिवाम्मा पोतेनवरू आणि भाजपाचे उमेदवार अंजली बाजारामठ या दोन्ही उमेदवारांमध्येच अटीतटीची लढाई आहे. अक्कलकोट नगरपरिषद नगराध्यक्षपदाचे भाजपाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी आणि शिवसेना शिंदे पक्षाकडून रईस टिनवला या दोन्ही उमेदवारांमध्येच अटीतटीची लढाई आहे. यामध्ये बाजी कोण मारणार आणि नगराध्यक्षपदाची खुर्ची अखेर कोण काबीज करणार हे आता अवघ्या काही तासामध्ये समोर येईल. विशेष म्हणजे नगराध्यक्षपदाची लढाई ही अतिशय चुरशीची ठरणार आहे. मात्र, निवडणूक रिंगणात असणारे काँग्रेस उमेदवार देखील चांगली मते घेण्याची शक्यता आहे. यामुळे मत विभागणी होणार आहे. या मत विभागणीचा फटका कोणत्या उमेदवाराला बसणार हे आता अवघ्या काही तासात समोर येईल. दरम्यान, प्रचाराच्या शेवटच्या दिवसांपर्यंत नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराबरोबरच उमेदवारांचीही अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठीची धडपड कायम राहिली आहे.

## महत्वाचे...



### सोलापूर जिल्हा निवडणूक उपजिल्हाधिकारी म्हणून किरण सुरवसे रुजू

**सोलापूर. दि. १ डिसेंबर-**
जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक उपजिल्हाधिकारी गणेश निराळे यांचे प्रमोशन झाल्यानंतर रिक्त झालेल्या निवडणूक उपजिल्हाधिकारी पदी किरण सुरवसे हे नव्याने रुजू झाले आहेत शुक्रवारी त्यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.

### इतर मतदारसंघात नावे गेली तर फॉर्म भरून द्या; महापालिकेचे आवाहन

**मतदार यादीतील घोळासंदर्भात उपाय योजना**

**सोलापूर, दि.१ डिसेंबर -**
महापालिका संकेतस्थळावर डिजिटल पोस्टर तयार करून सोशल मीडियावर जाहीर केले आहे. यावर मतदार यादीत आपले नाव कसे शोधायचे याची माहितीही दिली. त्यानुसार -प्रत्येकांनी यादीत शोधावे असे आवाहन - करण्यात आले आहे. तुमची नावे इतर विधानसभा मतदारसंघात गेली असतील, तर महापालिका निवडणूक कार्यालयात जाऊन फॉर्म भरून देऊ शकता. त्याचे कार्यालय हुतात्मा स्मृती मंदिराच्या पाठीमागील आयसीआयसीआय बँकेच्या वर आहे. त्याची दुरुस्ती होईल, असेही महापालिकेने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मतदार याद्यातील घोळा संदर्भात अनेक तक्रारी दाखल झाल्यानंतर महापालिका प्रशासनाने यावर प्रतिबंधात्मक उपाय योजना सुरू केली आहे. संबंधित मतदाराचे नाव अथवा इतर माहिती दुसऱ्या प्रभागातील मतदार यादीत समाविष्ट झाले असल्यास, त्याची माहिती एका अर्जात भरून द्यावयाची आहे. त्यासाठी निवडणूक प्राधिकरण कार्यालय तथा महापालिका प्रशासनाच्या वतीने वेबसाईट द्वारे अर्ज भरावयाचा आहे.

### महापालिका प्रारूप मतदार यादीवर सोमवारी १०२ हरकती

**आतापर्यंत एकूण ३३७ तक्रारी प्राप्त**

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
सोलापूर महापालिका प्रारूप मतदार यादीवर आज सोमवार दि. १ डिसेंबर रोजी दिवसभरात एकूण १०२ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. २० नोव्हेंबर ते एक डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण ३३७ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. मतदार यादीमध्ये काही लेखनिकाच्या चुका असल्यास त्याबाबतचे प्राप्त अर्ज - २, दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागतून वगळण्यात यावी व संबंधित प्रभागत समाविष्ट करण्याबाबतचे प्राप्त अर्ज - ८५ , मनपा संबंधित प्रभागाच्या क्षेत्रातील विधानसभा भाग यादीत मतदारांची नावे असूनही मनपाच्या मतदार यादी मध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत प्राप्त अर्ज - ९, इतर अर्ज - ६ असे अशा एकूण १०२ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत दि. २० नोव्हेंबर ते एक डिसेंबर २०२५ दरम्यान एकूण ३३७ हरकती व सूचना महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.






### शहरातील सिटी बससेवेसाठी संभाजी ब्रिगेडचे महापालिका अतिरिक्त आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ डिसेंबर-**
संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूर शहरातील सिटी बस सेवा सुरु करण्यासाठी महापालिका जनता दरबारात अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांना निवेदन देण्यात आले. मागील बऱ्याच वर्षांपासून सोलापूर शहरात बऱ्याच ठिकाणी सिटी बसेस बंद आहेत. सिटी बसेस बंद असल्यामुळे रिक्षाने प्रवास करावा लागतो व रिक्षावाले सिटी बसच्या तुलनेत दुप्पट तिप्पट पैसे घेतात.

सिटी बस हा सर्वसामान्यांसाठी खूप मोठा आधार आहे. परंतु मागील बऱ्याच वर्षांपासून शहरात बऱ्याच ठिकाणी सिटी बस धावत नाहीत. यामुळे रिक्षावाले खूप मनमानी करतात. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेतात. विविध समस्यांमुळे संभाजी ब्रिगेडच्या वतीने शहरांमध्ये सर्व ठिकाणच्या सिटी बसेस सुरू कराव्यात अशी मागणी केली आहे.

याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महानगर प्रमुख शिरीष जगदाळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मिनल दास, ॲड.गणेश कदम, महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष जयश्री जाधव, शहराध्यक्ष मनीषा कोळी, जिल्हा सचिव संजीवनी सलबत्ते, जिल्हा उपाध्यक्ष सुनिता घंटे, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, उद्योग आघाडी शहर अध्यक्ष संतोष सुरवसे, शहर व जिल्हा सचिव सिद्धाराम सावळे, शहर कार्याध्यक्ष सतीश वावरे, सुनंदा सूर्यवंशी, सुनिता कारंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती : ३ कोटी २२ लाखांचा निधी प्राप्त

**थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार रक्कम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनेतंर्गत सन २०२३-२४ या सालात अर्ज दाखल केलेल्या २७ हजार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीपोटी ३ कोटी २२ लाख ८९ हजार रुपये निधी प्राप्त झाले आहेत. थेट विद्यार्थ्यांच्या खात्यावर हे पैसे जमा होणार आहेत. त्यामुळे शिष्यवृत्ती प्राप्त करुन घेण्याकामी विद्यार्थ्यांना चकरा मारावे लागणार नाही, असे सांगण्यात आले.

इयत्ता पाचवी ते सातवी व आठवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क, नववी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मेट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, अस्वच्छ व्यवसायामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती अशा योजना राबविण्यात येतात.

सन २०२४-२०२५ या सालासाठी आतापर्यंत १२०५९ अर्ज दाखल करण्यात आले आहेत. २०२४-२५ या वर्षासाठी अर्ज स्वीकारणे सुरु असून मुदत शेवटच्या टप्प्यात आहे. जास्तीत जास्त अर्ज भरण्यासाठी जिल्हा परिषदेने मुख्याध्यापकांना सूचना केल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी तातडीने अर्ज करावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाकडून करण्यात आले आहे.

**लवकरात लवकर अर्ज भरावेत**

२०२४-२५ सालातील शिष्यवृत्ती योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून आतापर्यंत १२ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. जास्तीत जास्त अर्ज करण्यासाठी शाळांना, मुख्याध्यापकांना पत्रव्यवहार करुन सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी लवकरात लवकर अर्ज भरावेत. मंजूर शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे, असे प्रभारी समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले.

**चकरा माराव्या लागणार नाहीत**

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम थेट त्यांच्या खात्यावर पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात चकरा मारावे लागणार नाहीत. शिवाय त्यांच्या खात्यावर पैसे जमा झाल्याने गरजेनुसार रक्कम काढता येणार आहे, असे मंद्रुप येथील लोकसेवा विद्यामंदिरचे प्राचार्य बसवराज कुमठेकर यांनी सांगितले.

## भटक्या कुत्र्यांबाबत आता विविध संस्थांना उपाययोजना करणे बंधनकारक

### सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेकडून संस्थांना निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
देशभरात भटक्या कुत्र्यांमुळे घडणाऱ्या अपघात व हल्ल्यांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमिवर तत्काळ व बंधनकारक उपाययोजना करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने जारी केले आहेत. या अनुषंगाने सोलापूर शहरात विविध संस्थांना आवश्यक उपाययोजना कराव्यात असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने सुओ-मोटू प्रकरण मध्ये दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी संपूर्ण देशभरातील संस्थांच्या परिसरात भटक्या कुत्र्यांमुळे घडणाऱ्या अपघात व हल्ल्यांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर तत्काळ व बंधनकारक उपाययोजना करण्याचे आदेश जारी केले आहेत. या अनुषंगाने महापालिका हद्दीतील सर्व शैक्षणिक संस्था शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे ई. (शासकीय व खाजगी), सर्व रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये सहित (शासकीय व खाजगी), सर्व क्रीडांगणे, क्रीडा संकुले, बसस्थानके व रेल्वे स्टेशन यांनी खालील उपाययोजनांची तात्काळ अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने याबाबत मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. ती पुढील प्रमाणे आहेत.



संस्थेच्या संपूर्ण परिसराचे कुंपण/कंपाउंडिंग ८ आठवड्यांत पूर्ण करावे. संस्थेच्या परिसराभोवती सुरक्षित कुंपण/कंपाउंड भिंत बांधणे / गेट बसवून सर्व प्रवेशमार्गावर भटक्या प्राण्यांच्या प्रवेश नियंत्रणासाठी उपाय करावे. यासंदर्भात नोडल अधिकारी नियुक्त करावे. संस्थेच्या परिसरातील भटके कुत्रे रोखणे, स्वच्छता व सुरक्षितता यासाठी प्रत्येक संस्थेने एक नोडल अधिकारी नियुक्त करून त्याचे नाव व संपर्क क्रमांक प्रवेशद्वारावर प्रदर्शित करावे. सर्व क्रीडांगणे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, बसस्थानके, रेल्वे स्थानक येथे संबंधित आस्थापना यांनी दिवस-रात्र सुरक्षा तपासणीसाठी सुरक्षारक्षक पथक नियुक्त करावे.

शैक्षणिक संस्थांना या संदर्भात जागृती कार्यक्रम घेणे अनिवार्य आहे. सर्व विद्यार्थ्यांसाठी/ कर्मचाऱ्यांसाठी भटक्या प्राण्यांचे वर्तन तसेच त्यांचे उपस्थितीत करावयाचे आचरण याबाबत जागृती करावी. कुत्र्याकडून चावा झाल्यास संबंधित व्यक्तीवर प्रथमोपचार करावे तसेच तातडीची वैद्यकीय संपर्क प्रक्रिया याबाबत सत्रे आयोजित करावीत.

या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी, संस्था प्रमुख व व्यवस्थापनाविरुद्ध न्यायालयीन आदेशाचा अवमान कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. तरी सर्व संस्थानी वरील उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करण्याची खबरदारी घेण्यात यावी, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Alimuddin Basumiya Naikwadi** HAS BEEN CHANGED TO **Aleem**

Resi. - Plot No.314, Siddheshwar Nagar Bhag-4, New Jindagi Chowk, Solapur

**KINDLY NOTE**

**THE SAME. (41772 Dtd.27.11.2025)**

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, सुधाबेन पटेल यांच्या फायनल प्लॉट नं. १३२/१३अ/१/१/१/२ टी.पी.एस स्कीम, मजरेवाडी, जुळे सोलापूर, सोलापूर-४१३००४ येथील सोलापूर महानगरपालिका हद्दीतील " प्रपोज्ड रेजिडेंशियल व कमर्शियल प्रोजेक्ट या प्रकल्पास दिनांक २६/ ११/ २०२५ रोजीच्या पत्रान्वये इ. सी. आयडेन्टीफिकेशन नंबर EC25C3801MH5811681N व फाईल नं. SIA/MH/ INFRA2/543415/2025 नमूद केले आहेत त्यानुसार पर्यावरण विषयक महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागकडून परवानगी मिळाली आहे. ही परवानगी पर्यावरण आघात मूल्यांकन अधिसूचना २००६ नुसार देण्यात आलेली आहे. सदर परवानगीची प्रत पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळावर http://parivesh.nic.in वर उपलब्ध आहे.

**श्रीमती. सुधाबेन पटेल, सोलापूर-४१३००४**

## बायोक्लीन सिस्टिम इंडिया कंपनीला ५ वर्षांसाठी काळ्या यादीत समाविष्ट करण्याचा निर्णय

### भोगाव येथील जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्पातील निष्काळजीपणामुळे कारवाई

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
भोगाव येथील जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्पातील निष्काळजीपणाबाबत बायोक्लीन सिस्टिम इंडिया कंपनीला ५ वर्षांसाठी काळ्या यादीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर महापालिकेमार्फत भोगाव येथील जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे कामकाज पूर्वी "मे. बायोक्लीन सिस्टिम इंडिया प्रा. लि." यांचेकडे सोपविण्यात आले होते. मात्र प्रकल्प हस्तांतरणाच्या वेळी तसेच त्याआधीच्या काळात सदर मक्तेदाराकडून जैववैद्यकीय कचऱ्याची नियमानुसार प्रक्रिया न झाल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच महानगरपालिकेच्या तपासणीतून स्पष्ट झाले. महानगरपालिकेने दिलेल्या निर्देशांनुसार प्रकल्प परिसरात अंदाजे ४० ते ५० टन जैववैद्यकीय कचरा, व कार्बन सुमारे २५ टन, १५ टन, अशा स्वरूपातील धोकादायक कचऱ्यावर प्रक्रिया करणे ही जबाबदारी पूर्वीच्या मक्तेदार "मे. बायोक्लीन लि." यांची होती.तथापि, महानगरपालिकेकडून दिलेल्या मुदतमंजुरीनंतरही तसेच त्यानंतर जारी केलेल्या नोटिसीनंतरही सदर कचरा प्रक्रियेशी संबंधित कोणतीही कार्यवाही मक्तेदाराने केली नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार महानगरपालिकेला नवीन प्रकल्प चालक यांच्यामार्फत हा संपूर्ण कचरा व्यवस्थितरीत्या नष्ट करावा लागला.

नवीन प्रकल्प चालक यांच्याकडून या विल्हेवाटीबाबत रु. ४२,५९,६९४/- इतक्या खर्चाची मागणी महानगरपालिकेकडे करण्यात आली असून हा संपूर्ण खर्च पूर्वीच्या मक्तेदारामुळे झालेला असल्याने ही रक्कम "मे. बायोक्लीन लि." यांच्याकडून वसुल करणे आवश्यक होते. महानगरपालिकेतर्फे संबंधित कंपनीला आयुक्तांसमक्ष अनेक वेळा सुनावणीसाठी बोलावून या खर्चाची रक्कम जमा करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच १७ ऑक्टोंबर २०२५ रोजी आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीतही त्यांना अंतिम सूचना दिली होती. परंतु संबंधित कंपनीने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले. ही नुकसान भरपाई करण्यासाठी महाराष्ट्र महसूल संहितेनुसार वसुली करण्याची आणि तसेच सदर कंपनीला काही वर्षांसाठी काळ्या यादीत समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली होती. सध्या सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्यामुळे ११ मार्च २०२२च्या गठीत उपसमितीमार्फत प्रस्ताव प्रशासकाकडे पाठविण्यात आला. त्यानुसार आयुक्तांच्या २१ नोव्हेंबरच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आला.

**गंभीर जबाबदारीतील निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही**

याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनाही सूचित करण्यात येणार आहे.सोलापूर शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन अत्यंत गंभीर व महत्त्वाचा विषय आहे. अशा गंभीर जबाबदारीतील निष्काळजीपणा कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि कायद्याची अंमलबजावणी यात कुठलीही तडजोड न करता महानगरपालिका कठोर भूमिका पुढेही कायम ठेवेल, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## निधन वृत्त...

### रुथ कलबंडी



**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
वृंदावन पार्क आसरा येथील सोलापूर महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सिंग असोसिएशनचे माजी अध्यक्ष रुथ कलबंडी यांचे सोमवारी सकाळी साडेआठ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मंगळवारी दुपारी चार वाजता होणार ख्रिश्चन स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील.

### निर्मला राऊळ



**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
येथील निर्मला विष्णुपंत राऊत ( वय ८६) यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुले, तीन मुली, पाच नातवंडे व नातसुना असा परिवार आहे. छायाचित्रकार मिलिंद राऊळ यांच्या त्या मातोश्री होत. सोमवारी सकाळी मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शकुंतला भोसकर



**मंगळवेढा, दि. १ डिसेंबर-**
नागणेवाडी येथील श्रीमती शकुंतला अभिमन्यू भोसकर (वय ७२) यांचे सोमवार दि.१ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,चार मुली,सुन,जावई,नातवंडे असा परिवार आहे. भोसकर इलेक्ट्रीकल्सचे चालक हरी भोसकर यांच्या त्या मातोश्री होत.मंगळवार२ डिसेंबर रोजी सकाळी ७ वा. बोराळे नाका स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार होतील.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १२६६२०६२५ | मालमत्ता तारण कर्ज | १. अप्पासो किसन वायदंडे<br>२. कृष्णा शामराव वायदंडे | ०४.११.२०२५ | रुपये ६,९५,१३७.१२/- |

**मालमत्तेचा पत्ता:** मालमत्ता क्रमांक ६४/१ येथे नोंदणीकृत मालमत्तेचा/घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ १००० चौ.फूट, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला आहे = ७५०.०० चौ.फूट. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = ७५०.०० चौ.फूट., गाव विटे येथे, पोस्ट येथे स्थित; बिटरगाव, तालुका: पंढरपूर जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि अशी सीमा आहे: - पूर्व: रस्ता पश्चिम: मालमत्ता क्रमांक ५२ उत्तर: मालमत्ता क्रमांक ६३ दक्षिण: मालमत्ता क्रमांक ६४ सर्जेराव वायदंडेचा भाग

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : ०२/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

# हिमाचलविरुद्ध महाराष्ट्राच्या ७ बाद ३५४ धावा

## १९ वर्षाखालील मुलांची कूच बिहार क्रिकेट स्पर्धा : सुआशिक जगताप, जशन सिंग, इंद्रजीत शिंदेंची तडफदार अर्धशतके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
येथील प्रसिद्ध इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर महाराष्ट्र विरुद्ध हिमाचल प्रदेश हा च्या १९ वर्षाखालील मुलांच्या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील तिसऱ्या फेरीचा सामना सुरू झाला असून पहिल्या दिवशी महाराष्ट्राने ७ गडी गमावत ३५४ धावा केल्या आहेत.

सकाळी नाणेफेक जिंकल्यानंतर कर्णधार साहिल ने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय योग्य सिद्ध करताना ताबडतोब फलंदाजी करत पहिल्या ८ षटकात ६० धावा केल्या, ३१ चेंडूत ८ चौकारानिशी ४५ धावा करून साहिल पारख फलकावर ६१ धावा असताना बाद झाला, त्यानंतर इंद्रजीत शिंदे ने आल्यापासून फटकेबाजी करत तडफदार अर्धशतक झळकावले. जेवणाला खेळ थांबला तेंव्हा ३ बाद १६४ धावा (३१ षटके) करत महाराष्ट्राने पहिल्या सत्रात सामन्यावर पकड मिळवली. २० षटकात ९२ धावांची भागीदारी रचून इंद्रजीत बाद झाला आणि त्याच्या


अंश धीमन


इंद्रजीत शिंदे


जशन सिंग


सुआशिक जगताप

पाठोपाठ ईशान खोंड (०), समकित सुराणा (८) बाद झाले. हिमाचलच्या नौनिहाल ने लागोपाठ २ गडी बाद करत १ बाद १५० वरून ४ बाद १६४ अशी धावसंख्या केली. पण त्यानंतर सलामीवीर जशन सिंग याने यष्टिरक्षक साई परदेशी सोबत संयमी फलंदाजी करत ५८ धावांची भागीदारी रचली आणि आपले अर्धशतक देखील पूर्ण केले. साई ३४(५६) बाद झाल्यावर सुआशिक जगताप याने एक बाजू लावून धरत धावफलक हलता ठेवला. जशन सिंग ७० धावा काढून अंश धिमन चा बळी ठरला.


त्यानंतर अरकाम सय्यद हा खेळण्यास आला आणि जगताप हा खेळताना जायबंदी झाला व चहापानाला खेळ थांबला, तेंव्हा ६ बाद २५८ (५८.२ षटके) धावा झालेल्या.

चहापान नंतर खेळ सुरू झाला आणि तिसऱ्याच षटकात पुन्हा अंश धिमन ने अरकाम (६) ला बाद करत तिसरा बळी टिपला. शेवटच्या सत्रातील खेळात शुभम कदम सह सुआशिक जगतापने ९० धावांची भागीदारी करत आपले अर्धशतक झळकाविले. पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा शुभम कदम नाबाद ४३ व जगताप नाबाद ७१ धावा करून खेळपट्टीवर तग धरून आहेत.

हिमाचल प्रदेश संघाकडून अंश धीमन ने ६२/३ बळी तर नौनिहाल २ बळी व अक्षय वशिष्ठ, आर्यन ठाकूर यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला आहे. सामन्याचा उद्या दुसरा दिवस असून सकाळच्या सत्रात महाराष्ट्र संघ पुढे आणखी किती धावा जोडतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## महत्त्वाचे

### विश्व कनिष्ठ पुरुष हॉकी; जर्मनी उपांत्यपूर्व फेरीत



**मदुराई** : गतविजेत्या जर्मनीने सोमवारी आयर्लंडवर ५-१ असा विजय मिळवत २०२५ च्या एफआयएच कनिष्ठ पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. दक्षिण आफ्रिकेने गट अ मध्ये दुसरे स्थान मिळविले. जर्मनीने सलग तिसरा विजय मिळवला आणि गट अ मध्ये अव्वल स्थान निश्चित केले. पहिल्या चरणात जर्मनीने जोनास वॉन गेरसमच्या गोलमुळे आघाडी घेतली. सर्वाधिक गोल नोंदविणारा बेन हॅसबॅक याने डी मध्ये जागा मिळवण्यासाठी बॅकलाइन ओलांडून उजवीकडून डावीकडे धाव घेतली, त्यानंतर वॉन गेरसमने पूर्ण स्ट्रेच मारून त्याला आत ढकलले. आयर्लण्डने आक्रमक खेळाचा पर्याय निवडला, परंतु जर्मनीवर जोरदार दबाव आणण्याचे काम असलेल्या त्यांच्या खेळाडूंना मदुराईमध्ये झालेल्या कडक उन्हाचा सामना करावा लागला.

### इटलीचे दिग्गज टेनिसपटू निकोला पिएट्रांजेली यांचे निधन

**रोम** : इटालियन टेनिस दिग्गज व दोन वेळा फ्रेंच ओपन विजेती निकोला पिएट्रांजेली यांचे निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत पिएट्रांजेली यांनी एकूण ४८ विजेतेपदे जिंकलीत. त्यांनी डेव्हिस चषकांत सर्वोत्तम कामगिरी केली असून तिथे त्यांनी विक्रमी १६४ सामने खेळले आणि १२० सामने जिंकले. ही कामगिरी अजूनही अतुलनीय आहे. १९६० मध्ये फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत ब्रेक दरम्यान, निकोला पिएट्रांजेलीने लॉकर रूममध्ये आपले बूट काढले. त्यांचे मोजे रक्ताने लाल झाले होते. पहिल्या तीन सेटमध्ये, चिलीचा लुईस निकोला पिएट्रांजेलीला ड्रॉप शॉट्स आणि लॉब्सने त्रास देत होता, त्यामुळे निकोलाला त्याच्या पायाची त्वचा सोलून येईपर्यंत पुढे आणि मागे धावावे लागले होते. तरीही, त्याने चिवट झुंज देत आपला दुसरा रोलँड गॅरोस मुकुट जिंकला.




### २०३० राष्ट्रकुल स्पर्धेत नेमबाजीचा समावेश

**जयपूर** : २०३० मध्ये भारत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आयोजित करेल तेव्हा स्पर्धेत नेमबाजीचा समावेश केला जाईल आणि देशाच्या एकूण पदकतालिकेत लक्षणीय भर पडेल, अशी आशा ऑलिम्पिकपटू सिफ्ट कौर समरा हिने व्यक्त केली. २०२२ बर्मिंगम व २०२६ ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धांसाठी पदक स्पर्धा म्हणून नेमबाजी बंद करण्यात आली होती, परंतु यजमान म्हणून भारतीय नेमबाजांना त्यांची प्रतिभा दाखवण्याची आणि त्यांच्या घरच्या प्रेक्षकांसमोर पदकांचा एक थैली जिंकण्याची संधी मिळेल. भारत राष्ट्रकुल स्पर्धा आयोजित करत आहे याचा मला आनंद आहे आणि मला खात्री आहे की नेमबाजीचाही एक क्रीडा प्रकार म्हणून समावेश केला जाईल. आपल्या राष्ट्रीय नेमबाजांसाठी चमकण्याची आणि घरी पदके आणण्याची ही एक उत्तम संधी आहे, अशी आशा तिने व्यक्त केली. या स्पर्धेमुळे क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल व त्यामुळे इच्छुक खेळाडूंना शिकणे आणि प्रशिक्षण घेणे सोपे होईल,'असेही ' सिफ्ट कौर म्हणाली.

### शालेय महाराष्ट्र क्रिकेट संघात आदित्य माने

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी १४ वर्षाखालील महाराष्ट्र शालेय क्रिकेट संघात आदित्य ज्ञानेश्वर माने याची निवड झाली. नाशिक येथे झालेल्या राज्य क्रिकेट स्पर्धेतील निवड चाचणीतून त्याची निवड झाली. पुणे विभागाकडून आदित्यने अमरावती विभागाविरुद्ध ५७ चेंडूमध्ये ८ चौकारासह ७२ धावा काढल्या. या कामगिरीवर त्याची निवड झाली. आदित्यला ट्रिनिटी स्कूल येवलेवाडी पुणे येथील प्रशिक्षक निलेश गोलगिरे व येथील सेंट जोसेफ स्कूलचे क्रीडा शिक्षक सनी भोसले यांचे मागदर्शन लाभले.



# गिलचे तंदुरुस्ती मूल्यांकन बंगळुरुत

**नवी दिल्ली, १ डिसेंबर**
भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार शुभमन गिल सोमवारी बंगळुरूच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे आपल्या अनिवार्य तंदुरुस्ती मूल्यांकन चाचणीसाठी उपस्थित झाला असेल. या चाचणीच्या माध्यमातून गिल ९ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या आगामी पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी आपले पुनरागमन निश्चित करेल.

कोलकाता येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी फलंदाजी करताना गिलच्या मानेला दुखापत झाली होती आणि तेव्हापासून तो दुसरी कसोटी आणि चालू एकदिवसीय मालिका खेळू शकला नाही.

अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समिती सेंटर ऑफ एक्सलन्सच्या क्रीडा विज्ञान चमूकडून गिलच्या तंदुरुस्ती अहवालाची प्रतीक्षा असेल.



गिलला इंजेक्शन देण्यात आले आणि २१ दिवस विश्रांती आणि पुनर्वसनाचा सल्ला देण्यात आला, यात दुखापतग्रस्त भागाच्या स्नायूंना बळकटी देण्यासाठी विशिष्ट व्यायामांचा समावेश होता. अर्थात, क्रीडा विज्ञान संघ कौशल्य प्रशिक्षण सुरू करण्यापूर्वी त्याच्या सर्व अनिवार्य तंदुरुस्ती चाचण्या करेल.

क्रीडा विज्ञान चमू कौशल्य प्रशिक्षणादरम्यान त्याच्या हालचालींचे मूल्यांकन करत नाही आणि फलंदाजी करताना त्याला शून्य अस्वस्थता येत आहे की नाही हे पाहत नाही तोपर्यंत काहीही सांगता येणार नाही, असे या घडामोडींशी परिचित असलेल्या बीसीसीआयच्या एका सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

सध्या, गिलच्या दक्षिण आफ्रिका टी-२० मालिकेसाठी परतण्याची शक्यता पन्नास-पन्नास टक्के आहे असे दिसते.

(वृत्तसंस्था)

### हार्दिक पूर्णपणे तंदुरुस्त



दरम्यान, भारतीय चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे, कारण हार्दिक पांड्याला टी-२० स्वरूपात परतण्याची परवानगी मिळाली आहे आणि तो मंगळवारी हैदराबादमध्ये सय्यद मुश्ताक अली चषकांत पंजाबविरुद्ध जवळजवळ अडीच महिन्यांत पहिला सामना खेळणार आहे. संघ जाहीर होण्यापूर्वी तो त्याची एकूण तंदुरुस्ती तपासण्यासाठी राष्ट्रीय निवडकर्ता प्रज्ञान ओझासह दोन्ही सामन्यांमध्ये उपस्थित राहणार आहे. २१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत हार्दिकने सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) सोडलेच नाही. त्याने संपूर्ण पुनर्वसन आणि रिटर्न टू प्ले तपासणी केली. आतापर्यंत, त्याला टी-२० मध्ये फलंदाजी आणि गोलंदाजी करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तो पंजाब सामन्यासाठी बडोदा संघाशी आधीच जोडलेला आहे. तो ४ डिसेंबर रोजी गुजरात विरुद्ध खेळेल आणि जर भारतीय संघ व्यवस्थापनाने त्याला लवकर बोलावले नाही, तर तो ६ डिसेंबर रोजी हरयाणा विरुद्ध खेळण्याची योजना आखत आहे, असे एका सूत्राने सांगितले.

# जलतरणपटू प्रत्याशा रे हिचा प्रेरणादायी उदय

## वॉटर थेरपी ते खेलो इंडिया विद्यापीठ गेम्सपर्यंतचा थरारक प्रवास

**जयपूर, १ डिसेंबर**
प्रत्याशा रे, आरोग्यविषयक गुंतागुंतींशी झुंजणाऱ्या या मुलीसाठी वॉटर थेरपी म्हणून सुरू झालेली ही कारकीर्द पदकांनी समृद्ध झाली आहे. येथे आयोजित खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत ती भारतातील सर्वात हुशार जलतरणपटूंपैकी एक म्हणून उदयास आली आहे.

खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रत्याशा रे हिने ३ सुवर्ण, १ रौप्य आणि १ कांस्यपदक जिंकले आहे.

या स्पर्धेच्या चार आवृत्त्यांमध्ये प्रत्याशाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट निकालांसह - नऊ सुवर्ण, सात रौप्य आणि दोन कांस्यपदकांसह एकूण १८ पदके मिळवली आहेत.

प्रत्युशाचा इथपर्यंतचा जीवनप्रवास अतिशय भावनाशील आणि प्रेरणादायी आहे. प्रत्याशा रे बालपणापासून आजारी असायची. तिच्या पालकांना प्रत्याशाची तब्येत सतत चिंतेचा विषय होता. प्रत्याशा तीन वर्षांची झाली तेव्हा तिचे पालक तिच्या आरोग्य समस्यंचे निराकरण करण्यासाठी अनेक रुग्णालयात गेले होते. प्रत्याशा जन्मतःच निरोगी जन्मली होती. पण तिला संसर्गापासून वाचवण्यासाठी अँटीबायोटिक्स देण्यात आले होते जेव्हा ती केवळ २१ दिवसांची होती आणि त्या औषधांचा प्रतिकूल परिणाम झाला. त्यानंतर तिचा नैसर्गिक शारीरिक




विकास थांबला. आमची चिंता वाढली. आम्हाला निरोगी मूल हवे होते, पण सर्व काही आमच्या विरुद्ध जात होत्या, असे प्रत्याशाची आई चारुश्री यांनी सांगितले.

तेव्हाच चारुश्री यांनी वॉटर थेरपीवरील एक लेख वाचला आणि तिने ते वापरून पाहण्याचा निर्णय घेतला. सतत रुग्णालयात जाण्याने कंटाळून मी तो धोका पत्करण्याचा निर्णय घेतला.

मी माझ्या तीन वर्षांच्या मुलीला संबलपूरमधील एका स्विमिंग पूलमध्ये घेऊन जाऊ लागली. त्या वयात प्रवेश शक्य नव्हता, म्हणून मी स्वतः तिच्यासोबत पाण्यात पोहू लागली. हळूहळू पाण्याने तिची भीती खेळात बदलली. दोन महिन्यांतच, रुग्णालयात जाण्याचे प्रमाण कमी झाले आणि तीन महिन्यांनंतर तिची तब्येत स्थिर झाली. पाण्यामुळे तिला आराम मिळाला. तिला पाण्यात राहण्याचा आनंद मिळू लागला आणि तिला जाणवलं की ते तिला रुग्णालयांपासून दूर ठेवत आहे. पुढच्या दोन ते तीन वर्षांत तिने तिचे पोहण्याचे अंतर सहजपणे २५ मीटरवरून ५० मीटरपर्यंत वाढवले, असे प्रत्याशाच्या आईने सांगितले.

संबलपूरमधील एका स्थानिक प्रशिक्षकाने माझी क्षमता ओळखली आणि मला स्पर्धात्मक पोहण्याचा सल्ला दिला, असे प्रत्याशाने सांगितले. आठ वर्षांची असताना, प्रत्याशाने रंगनिधी सेठ यांच्या नेतृत्वाखाली झारसा खेतान जलतरण संकुलात व्यावसायिक प्रशिक्षण सुरू केले.

या दरम्यानच्या काळात ओडिशा सरकारमध्ये काम करणारे प्रत्याशाचे वडील रजत कुमार रे यांची भुवनेश्वरला बदली झाली. त्यानंतर ती कलिंगमध्ये सराव करू लागली. अभ्यास आणि खेळ संतुलित करत, मी आता उत्कल विद्यापीठातून दुहेरी पदव्युत्तर पदवी घेत आहे, असे प्रत्याशा म्हणाली.

प्रत्याशा आता जपानमधील नागोया येथे २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघात स्थान मिळवण्याचे ध्येय ठेवत आहे.

(वृत्तसंस्था)



# हरेंद्र सिंग यांचा राजीनामा

**नवी दिल्ली, १ डिसेंबर -**
भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी सोमवारी 'वैयक्तिक कारणे' देऊन तात्काळ प्रभावाने आपल्या पदाचा राजीनामा दिला. हरेंद्र यांनी हॉकी इंडियाला एक ई-मेल पाठवून सर्वोच्च संस्थेला कळवले की, ते तात्काळ प्रभावाने राजीनामा देत आहेत. २०२१ मध्ये टोकियो ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिलेल्या संघाचे मुख्य प्रशिक्षक असलेले नेदरलॅण्डचे रणनीतीज्ञ शोएर्ड मारिज्ने मुख्य प्रशिक्षक म्हणून परत येऊ शकतात, असे सूत्रांनी सांगितले. ऑगस्ट २०२१ मध्ये महिला हॉकी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा मारिजने दिला होता. यापूर्वी अमेरिकेच्या पुरुष हॉकी संघाचे प्रशिक्षक असलेले हरेंद्र यांनी एप्रिल २०२४ मध्ये मुख्य प्रशिक्षकपद स्वीकारले होते. त्यापूर्वी त्यांनी २०१६ मध्ये लखनौ येथे झालेल्या विश्वचषक जिंकणाऱ्या भारताच्या कनिष्ठ पुरुष संघाचे प्रशिक्षकपद भूषवले होते.

### गावस्करने केले कोहलीचे कौतुक

**नवी दिल्ली** : रांची येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात विजयी शतक ठोकल्यानंतर भारताचे दिग्गज फलंदाज सुनील गावस्करने विराट कोहलीच्या शिस्तबद्ध आणि गणनात्मक दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे. रविवारी कोहलीने केवळ १२० चेंडूत १३५ धावा फटकावल्या तो स्वतःचा खेळ इतर कोणापेक्षाही चांगल्या प्रकारे समजतो. कोहलीला त्याचा खेळ आतून कळतो, असे गावस्कर म्हणाले.

# प्रशिक्षक पाठीशी असल्यास यश नक्की मिळतेच

## भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा कदम हिचा विश्वास; सोलापूर विद्यापीठाच्या वतीने गंगा व तिचे प्रशिक्षक राजू शेळके यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**
जेव्हा आपल्या पाठीशी एखादा प्रशिक्षक असतो, तेव्हा आपण कधीच हरु शकत नाही. माझे प्रशिक्षक राजू शेळके यांनी माझ्यासाठी कष्ट घेतल्यामुळे मी आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वी होऊ शकले, असे मत भारतीय दिव्यांग टी-२० क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा संभाजी कदम यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आठ खेळांच्या सराव शिबिराच्या सांगता समारंभप्रसंगी त्या बोलत होत्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर होते. याप्रसंगी गंगाचे प्रशिक्षक राजू शिवाजी शेळके, प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत बसवराज दामा, परिक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे आदी उपस्थित होते. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अतुल लकडे यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा समन्वयक प्रा. बाळासाहेब वाघचवरे यांनी सूत्रसंचालन केले. शिवानंद मैलारी यांनी आभार मानले.


सोलापूर : महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी जाणारा सोलापूर विद्यापीठाचा चमू क्रिकेटपटू गंगा कदम, प्रशिक्षक राजू शेळके यांच्या समवेत.




सोलापूर : गंगा कदम हिचा सत्कार करताना कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर व मान्यावर

महामहिम राज्यपाल कार्यालय आयोजित महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा जगतातील एक महत्त्वपूर्ण असलेल्या २७व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे आठ खेळातील पुरुष व महिला असे १६ संघ नांदेड येथे सहभागी होणार आहेत. यावर्षी या स्पर्धे चे आयोजन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ४ ते ८ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. सोलापूर विद्यापीठाकडून या महोत्सवासाठी खेळाडू, प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांचा असा एकुण १८७ जणांचा मोठा चमू क्रीडा समन्वयक प्रा. बाळासाहेब वाघचवरे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेडकडे जात आहे. यात १६२ खेळाडू (पुरुष व महिला), २४ संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक आणि १ स्पर्धा समन्वयक यांचा समावेश आहे. या स्पर्धेत अॅथलेटिक्स, बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन व बुद्धिबळ या आठ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.

### गंगाने प्रशिक्षकाचा बहुमान स्वीकारावा!

आज गंगा कदम यांनी संकटावर मात करत मोठे शौर्य गाजवले आहे. याचा समस्त सोलापूरकरांना अभिमान असून त्यामुळे सोलापूरची मान उंचावली आहे. अशक्य गोष्ट शक्य करून त्यांनी मोठे यश संपादन करून एक आदर्श निर्माण केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थी खेळाडूंना त्यांनी प्रशिक्षण द्यावे व प्रशिक्षक म्हणून विद्यापीठाचा बहुमान स्वीकारण्याची विनंती कुलगुरू प्रा. महानवर यांनी यावेळी त्यांना केली.

### विद्यापीठाचे संघ यंदाही कामगिरी सुधारतील



गतवर्षी विद्यापीठाने मैदानी स्पर्धेत २ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्य अशी ७ पदकांची कमाई केली होती. यात नीरज महानवर (भालाफेक), हर्ष राऊत (१००व २०० मी. धावणे), प्रणिता जाधवर (तिहेरी उडी), सुजाता बाबर(उंच उडी), बबलू चव्हाण (५ किमी धावणे) यांचा समावेश होता. यंदाही मैदानी स्पर्धेतील कामगिरीत सुधारेल. तसेच सांघिक स्पर्धेतही विद्यापीठास पदके मिळेल अशी आशा आहे.

**-प्रा. बाळासाहेब वाघचवरे, स्पर्धा क्रीडा समन्वयक**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर

# तरुण भारत

आयोजित

# "मला हवंय आदर्श सोलापूर"

## या विषयावरील निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची यादी...

यादी क्रमांक ७

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रेरणा लोंढे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| २ | पूर्वा मोळकेरी | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ३ | दया कोळेकर | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ४ | अनमोल सवडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ५ | श्रेयस पाटील | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ६ | महंमद सय्यद | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ७ | पौर्णिमा पाटील | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ८ | आचल भवर | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ९ | ऐश्वर्या आरबेल | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १० | जानवी माने | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| ११ | श्रीदेवी राठोड | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १२ | निरंजन देडे | जय मल्हार प्राथमिक शाळा बाळे |
| १३ | अथर्व उंबरदंद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४ | मानवी बुरटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५ | श्रेया हंचाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १६ | परिहा पांढरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १७ | प्रगती पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १८ | सानिका सपाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १९ | सर्वेश अष्टगी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २० | श्लोक देशमाने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २१ | विराज काशिद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २२ | पराग कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २३ | विहान कुमार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २४ | अरव लहाने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २५ | चयन संकलेचा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २६ | आरव तोडकरी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २७ | रजत वानकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २८ | अश्विका जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| २९ | स्वरनिका कमटम | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३० | आरोही कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३१ | उर्वी कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३२ | आदर्शिनी लिंबोळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३३ | मैनवी मोगीली | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३४ | आशी शहा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३५ | आराध्या सुरेकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३६ | गोविंदसिंग दोडमनी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३७ | ओम गुजराथी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३८ | आर्यन गुतल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३९ | अमान जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४० | अद्वीक लोंढे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४१ | प्रितम मोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४२ | अलिया काझी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४३ | विश्वराज पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४४ | विहान दोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४५ | शौर्य थोरात | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४६ | विस्मया कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४७ | अनत शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४८ | अस्मि हुंडेकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४९ | जिजा पाटकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५० | झिया शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ५१ | आर्यन सलगरकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५२ | फैझ मोमिन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५३ | स्वानंद तपकिरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५४ | समर्थ जोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५५ | सृष्टी अन्सारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५६ | सोनम अन्सारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५७ | शिवानी अर्जुन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५८ | अदिती बेळ्ळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५९ | प्रणवी चेंडके | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६० | पवित्रा गायकवाड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६१ | स्मिता गौर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६२ | स्वराली होटकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६३ | धनश्री जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६४ | शर्वरी जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६५ | अलिझा शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६६ | हुमेरा शेख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६७ | फैजाबानो वाडिकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६८ | विराजसिंग चव्हान | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६९ | तुषार धायफुले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७० | रोशन फुले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७१ | प्रतिक जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७२ | जय कोळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७३ | राजवीर माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७४ | विघ्नेश्वर माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७५ | प्रसाद पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | |
|---|---|---|
| ७६ | असद सय्यद | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७७ | श्रेयश उदानशीव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७८ | मधुरा बासुतकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७९ | समृद्धी भोसले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८० | अन्वी गांगजी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८१ | ममता गरदास | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८२ | काव्या जाधव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८३ | जान्हवी कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८४ | आकांक्षा शिवशरण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८५ | अप्रिता गाडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८६ | अक्षरा मोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८७ | अंशिया सादिक | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८८ | शिवाजी काळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ८९ | आरोह जावळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९० | स्वरा नाईकनिंबाळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९१ | आरूषी शिंगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९२ | हुमैरा बागवान | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९३ | अफिफा पठाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९४ | माही शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९५ | प्रिन्स चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९६ | शौर्य देशमुख | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९७ | सारंग देशपांडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९८ | समर्थ नरोटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ९९ | श्रावण सारसांबी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०० | ईशान सावले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १०१ | रूद्रप्रताप मोसलगी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०२ | आरव जावळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०३ | रूद्रा शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०४ | पियुष शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०५ | श्रुती अंकुशराव | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०६ | रुतुजा बहालसकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०७ | प्रार्थना चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०८ | अदिती हताले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १०९ | अंगारिका कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११० | अलमस पठाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १११ | मिहीर राजे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११२ | इब्राहिम बिजापूरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११३ | प्रज्योत तिर्थकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११४ | मंथन उपळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११५ | श्रेया केंद्रे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११६ | ईश्वरी माने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११७ | वर्षा मंगलुरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११८ | क्षिषा पेंटर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ११९ | वैष्णवी पन्हाळकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२० | शिवानी सहानी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२१ | प्रतिज्ञा स्वामी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२२ | शौर्य कासे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२३ | श्रावणी क्षीरसागर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२४ | फलकनाझ मुजावर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२५ | वैष्णवी सोनार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२६ | विराज घेरडी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२७ | श्रीपाद पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२८ | संकेत राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १२९ | प्रणव रेवे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३० | रिशा बेग | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३१ | वैष्णवी दण्णे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३२ | आकांक्षा काळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३३ | श्रेयांशी कोळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३४ | स्वरा कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३५ | श्रावणी म्हमाणे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १३६ | नितीशा शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३७ | अफिया पटेल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३८ | ईशिता पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १३९ | रूजुता विंचुरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४० | हर्षवर्धन बाबे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४१ | हर्षद बबलेश्वर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४२ | युवराज बबलेश्वर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४३ | ओम गुडमल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४४ | युग लोहार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४५ | भगवंत नरोटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४६ | अप्रित राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४७ | हर्ष साखरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४८ | ओंकार तेलंग | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १४९ | कौस्तुभ दंतकाळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५० | मानव पटोले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| १५१ | स्नेहा ढगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५२ | आरोही सुरवसे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५३ | सिद्धी शिलवंत | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५४ | ओवी आयितवाडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५५ | साईदुर्वा सरदार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५६ | श्रावणी निंबर्गी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५७ | अन्वी सांगले | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५८ | अनन्या शिंपी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १५९ | वृषभ पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६० | भार्गवी जमगोंडी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६१ | रितीका राठोड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६२ | आर्वी राका | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६३ | स्वरा बसाटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६४ | आराध्या अभिवंत | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६५ | आदित्य बोराडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६६ | उन्नती चाबुकस्वार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६७ | आरोही करंडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६८ | अनिरूद्ध नादर्गी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १६९ | राजनंदीनी पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७० | सानवी रेबन | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १७१ | मधुरा जोशी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७२ | मेधा पुजारी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७३ | अनुश्री भट्टड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७४ | आरोही पाटील | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर सीबीएसी |
| १७५ | श्रावणी वाळके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७६ | राजश्री बोराळे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७७ | वैभवी बिराजदार | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७८ | शिवराज गयाळे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १७९ | विवेक आडके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८० | अजबदी काटे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८१ | अन्नपूर्णा हेळकर | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८२ | ज्ञानेश्वरी बिराजदार | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८३ | साक्षी चिट्टे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८४ | कोमल गुडे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८५ | वैष्णवी गरड | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८६ | सानिका लामकाने | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८७ | सक्षम मैदर्गीकर | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८८ | रुद्र सुरवसे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १८९ | अनुप थोरात | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९० | संचिती कोळी | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९१ | राजनंदिनी चटके | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९२ | श्रावणी चव्हाण | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९३ | तनया सोनवणे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९४ | स्वरांजली शिंदे | अण्णप्पा काडादी हायस्कूल, सोलापूर |
| १९५ | रिद्धी राऊत | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९६ | पार्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९७ | अरहम पिरजादे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९८ | आलोक परसगेंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| १९९ | तेजस राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०० | पार्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०१ | अरहम पिरझादे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०२ | आलोक परसगोंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०३ | प्रांजल गालंडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०४ | श्रेयश यैवाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०५ | आराध्या कलदिप | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २०६ | नेहा कडबे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०७ | श्रृतीका चौगुले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०८ | प्रतीक थंबाके | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २०९ | अवनी बागलकोट | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१० | अनन्या मोरे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २११ | शौर्य माने | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१२ | सियोना सबाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१३ | अर्णव दहातोंडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१४ | आदर्श गायकवाड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१५ | तन्वी बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१६ | अनुजा करे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१७ | एकांश कांबळे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१८ | समर्थ बिराजदार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २१९ | ईशान्वी नरके | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२० | यशस्विनी माने | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२१ | अथर्व म्हमाणे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२२ | श्रावणी सुतार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२३ | तेजस्विनी सुतार | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२४ | तेजस म्हेत्रे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२५ | मिताली पांढरे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२६ | रितेश पुजारी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२७ | संगमेश गुद्दड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२८ | राजवर्धिनी चव्हाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २२९ | तन्मय बुदाले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३० | वामन कुलकर्णी | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३१ | विराज राठोड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३२ | दिव्या परसगोंड | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३३ | तपस्या गोदीसेला | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३४ | हुझेता शेख | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३५ | संस्कृती चव्हाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३६ | अर्पिता शेटे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३७ | अस्मिता बनसोडे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३८ | श्रावणी साबले | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २३९ | दिव्या शिंदे | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |
| २४० | हुरेन पठाण | युनिक इंग्लिश मिडियम स्कूल सोलापूर |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### अक्कलकोट शहरात ४४ मतदान केंद्रांवर मतदार मतदानाचा हक्क बजावणार

**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

अक्कलकोट नगरपरिषद निवडणूकीची तयारी पूर्ण झाली असून अक्कलकोट शहरात ४४ मतदान केंद्रावर लोक मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांनी निर्भयपणे जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी केले. आदर्श गुलाबी मतदान केंद्र श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला येथे आहे. ४४ मतदान पथके असून प्रत्येकी ५ मतदान कर्मचारी आणि एक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या शिवाय १६ राखीव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी प्रांत अधिकारी सुमीत शिंदे, सहायक निवडणूक अधिकारी नेहा कंठे, निवडणूक निरीक्षक अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे (कोल्हापूर) मुख्याधिकारी रमाकांत डाके, अधिक्षक शैलेश बिराजदार निवडणूकीवर लक्ष ठेवून आहेत. मतदान केंद्राच्या आत आणि बाहेर मिळून ७६ पोलीस तर ७४ होमगार्ड तसेच पोलिसांचे फिरते पथक राहणार आहे.सहा पोलीस अधिकारी आहेत यात पोलीस उपविभागीय अधिकारी विलास यामावार, पोलीस निरीक्षक दीपक भिताडे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव, सहाय्यक पोलीस अधिकारी सतीश रणवरे, पांडुरंग पवार, रेवणसिद्ध काळे, गोपनीय शाखेचे शरद चव्हाण यांचा समावेश आहे. अक्कलकोट शहरात सहा पोलिस अधिकारी, ७८ पोलिस अंमलदार, ७४० होम गार्ड,१ एसआरपीचे प्लॉटुन (३० कर्मचारी) असा तगडा बंदोबस्त आहे . नागरिकांनी निर्भय पणे मतदान करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांनी केले. आहे शहरात सर्वत्र पोलीस आणि होमगार्ड बंदोबस्त असून शहरात येणाऱ्या सर्व प्रवेश मार्गावर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

### विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिवापर टाळून उज्ज्वल भविष्य घडवावे - पो.नि. भिताडे

**अक्कलकोट, दि. १ डिसेंबर-**

विद्यार्थ्यांनी समाज माध्यमावरील रील बघण्यात वेळ घालवू नये. मोबाईलचा आणि समाज माध्यमाचा वापर आपल्या अभ्यासासाठी केल्यास आपले भविष्य उज्वल होऊ शकते असे प्रतिपादन येथील पोलिस निरीक्षक दिपक भिताडे यांनी केले. येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल येथे भारतीय संविधान दिन व शहीद दिनानिमित्तच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर .एस. पडवळकर होते. यावेळी एनसीसीचे हवालदार विक्रमजितसिंग, हवालदार अजित जाधव, जेष्ठ शिक्षक वाय. पी.कबाडे, एनसीसी प्रमुख एस.एस. जवळकोटे उपस्थित होते.



प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व शहीद दिनानिमित २६/११ तील शहिदांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी संविधान प्रस्ताविकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. एन. सी सी प्रमुख एस.एस. जवळकोटे यांनी भारतीय संविधान दिनाबाबत अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. संविधान दिनाचे औचित्य साधून प्रशालेत रांगोळी स्पर्धा, सेल्फी पॉईंट, भाषण, प्रश्नोउत्तरे आदी विविध कार्यक्रम घेतले. विभाग प्रमुख जे. एस.बगले यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन एम. एम. साळुंखे यांनी केले. एन.एम.तांबोळी यांनी आभार मानले.

# पंढरपुरात प्रचाराच्या तोफा थंडावल्या; मतदारांना प्रतिक्षा 'लक्ष्मी'दर्शनाची?

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.१ डिसेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली शहर विकास आघाडीसह भाजपा, भगीरथ भालके यांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र विकास आघाडी आणि आमदार अभिजीत पाटील यांच्या विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी यांच्यामध्ये निवडणुकीचा सामना होत आहे. अपक्षांनी देखील दोन, चार प्रभागातील निवडणूक प्रतिष्ठेची केलेली आहे. रविवारी रात्री १० वाजता जाहीर प्रचाराची सांगता झाली. मंगळवार, दि.२ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. आता प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून मतदारांना 'लक्ष्मी'दर्शनाची प्रतिक्षा लागून राहिल्याचे बोलले जात आहे.

मतदानाच्या पूर्वसंध्येला आणि मतदानादिवशी दिवसभर निवडणूकीच्या आखाड्यातील सर्व पक्ष, स्थानिक आघाड्यांकडून होणाऱ्या लक्ष्मी दर्शनाच्या देखील प्रतिक्षेत मतदार बांधव ऐन थंडीत रात्री उशिरा पर्यंत आपल्या घराची दारे उघडे ठेवून 'लक्ष्मी' येण्याच्या प्रतिक्षेत जागता पहारा देत असल्याचे निदर्शनास आले. प्रचारादरम्यान आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. सुरुवातीला वेगवेगळ्या मुद्यांवरुन सुरु असलेला प्रचार शेवटच्या टप्प्यात गुद्यांवर, एकमेकांच्या कार्यकर्त्यांना उचलण्यापर्यंत पोहचल्याचे दिसून आले. तरी पण, प्रचार कालावधीत कोणताही अनुचित प्रकार व अप्रिय घटना न घडता शांततेत प्रचार करण्यात आला.

**पालकमंत्र्यांची प्रतिष्ठा लागली पणाला**

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीमध्ये भाजपने चांगलेच लक्ष केंद्रित केले. सोलापूर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे नगरपरिषद निवडणुकीची जबाबदारी दिली आहे. पालकमंत्री गोरे गेल्या महिनाभरापासून निवडणुकीच्या नियोजनासाठी भाजपासह मित्रपक्ष, स्थानिक आघाड्यांची यंत्रणा कामाला लावली. त्यामुळे पालकमंत्र्यांची प्रतिष्ठा लागली असल्याचे बोलले जात आहे.




**भाजपाकडून नियोजनबध्द आखणी**

नगरपरिषदेची निवडणूक लढविण्यासाठी भाजपाकडे इच्छुकांची संख्या मोठी होती. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी नियोजनबध्द आखणी करुन इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. नगराध्यक्षपदाची उमेदवारी शेवटच्या क्षणी शामल शिरसट यांना बहाल करण्यात आली. १८ प्रभागातून एकूण ३७ उमेदवार सदस्य पदासाठी रिंगणात उतरविण्यात आले. नेतेमंडळींच्या कार्यपध्दतीवर जुने व निष्ठावंत कार्यकर्त्यांतून टीकाटिप्पणी करण्यात आली.

**पाचशे कोटींच्या विकासाचा दावा**

भाजपकडून जबाबदारी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या खाद्यांवर होती. प्रचार सभेमध्ये त्यांनी गेल्या २५ वर्षात पंढरपूर शहरामध्ये पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीने केलेल्या कामाचा लेखाजोखा त्यांनी मांडला. सध्या ५०० कोटीची कामे सुरु असल्याचा दावाही त्यांनी केला. ही कामे झाली नसल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला.

**आ.पाटील यांचा कारखाना कर्जाच्या ओझ्याखाली**

पंढरपूर नगर परिषदेच्या निवडणुकीत आमदार अभिजीत पाटील यांनी देखील लक्ष घातले. मात्र सुरुवातीला त्यांचा जो टेम्पो होता तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खास लक्ष घालून श्री विठ्ठल कारखान्याला दिलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली केव्हा कमी झाला याचा कुणाला पत्ता देखील लागला नाही. तरी देखील त्यांनी श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी स्थापन करुन ११ उमेदवार रिंगणात उतरविलेले आहेत.

**मनसेच्या दिलीप धोत्रेंची चिकाटी**

मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी चिकाटी लावून माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या सर्व विरोधकांना एकाच छताखाली आणले. त्यामुळे विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांच्या नेतृत्वात विठ्ठल परिवाराने भाजपापुढे तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून आव्हान उभे केल्याचे दिसून येते.

**परिवर्तन घडविण्याचा निर्धार**

तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून भालके पत्नी, पत्नीने निवडणुकीसाठी जोर लावल्याचे दिसून येते. नगराध्यक्षपदाची उमेदवारी डॉ.प्रणिता भालके यांना देण्यात आली. गेल्या ४० वर्षांपासून पंढरपूर नगरपरिषद परिचारक गटाकडे आहे. मात्र म्हणावा तसा विकास झाला नाही. यामुळे नागरिक त्रस्त असून यंदाच्या निवडणुकीत परिवर्तन घडविण्याचा निर्धार नागरिकांनी केला आहे. यामुळे तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा विजय निश्चित आहे, असा दावा भालके यांनी केला आहे.

**मतदारांनी लुटला सहली, भोजनावळीचा आनंद**

उमेदवारांकडून भोजनावळी, सहलीचे आयोजन करण्यात आले. काही ठिकाणी सोमवारी सकाळपासूनच लक्ष्मी दर्शनाला सुरुवात झाल्याचे दबक्या आवाजात बोलले जात आहे. विशेषत: विरोधी गटातील वजनदार पदाधिकाऱ्यांना आपल्याकडे वळविण्याकामी लाखोंची बोली लावले जात असल्याचे बोलले जात आहे.

# मैंदर्गीत १२ हजार ४६६ मतदार; २० केंद्रांवर होणार मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ डिसेबर**

मैंदर्गी नगरपरिषद निवडणूकीसाठी एकूण १२४६६ मतदार आहेत २० मतदान केंद्रावर मतदान होणार आहे . मतदारांनी निर्भयपणे जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहन मुख्याधिकारी अर्जुन सुरवसे यांनी केले. ६२५६ पुरुष व ६२०९ स्त्री व १ इतर असे १२४६६ मतदार आहेत.

२० मतदान पथके असून प्रत्येकी ५ मतदान कर्मचारी आणि एक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या शिवाय २ राखीव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. केंद्रावरील स्टाफ १२० व राखीव १२ असे एकूण १३२ कर्मचारी तैनात आहेत. मैंदर्गी शहरात ४६ सदस्य व २ अध्यक्ष पदासाठी उमेदवार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ओसवाल, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अर्जुन सुरवसे निवडणूकीवर लक्ष ठेवून आहेत. मतदान वेळ सकाळी ७-३० ते ५-३० अशी आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी विलास यामावार हे लक्ष ठेऊन आहेत.शहरात सर्वत्र पोलीस आणि होमगार्ड बंदोबस्त असून शहरात येणाऱ्या सर्व प्रवेश मार्गावर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.



**दुधनीत १०९०५ मतदार १६ मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावणार**

दुधनी नगरपरिषद निवडणूक साठी एकूण १०९०५ मतदार आहेत १६ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. मतदारांनी निर्भयपणे जास्तीत जास्त मतदान करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर यांनी केले आहे. ५५५४ पुरुष व ५३५० स्त्री व १ इतर असे १०९०५ मतदार आहेत.

### मैंदर्गीसह दुधनीतही तगडा पोलिस बंदोबस्त

१६ मतदान पथके असून प्रत्येकी ५ मतदान कर्मचारी आणि एक पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या शिवाय ३ राखीव पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. केंद्रावरील स्टाफ ९६ व राखीव १५ असे एकूण १११ कर्मचारी तैनात आहेत. दुधनी शहरात सदस्य ५३ व ५ नगर अध्यक्ष पदासाठी उमेदवार आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर , सहायक निवडणूक निर्णय अधिकारी लक्ष्मीकांत कहार निवडणूकीवर लक्ष ठेवून आहेत. मतदान वेळ सकाळी ७-३० ते ५-३० अशी आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी विलास यामावार हे लक्ष ठेऊन आहेत. शहरात सर्वत्र पोलीस आणि होमगार्ड बंदोबस्त असून शहरात येणाऱ्या सर्व प्रवेश मार्गावर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

## स्वच्छ भारत मिशनच्या ५४ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वच्छतेला महत्व देत स्वच्छता संदेश देत आहेत. अनेक कार्यक्रमात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात स्वच्छतेला महत्व प्राप्त होत आहे. ग्रामीण भागातील लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती होताना दिसून येत आहे. मात्र याच स्वच्छतेविषयी मोलाची भूमिका बजावणारे व या विभागात १४ वर्षांपासून काम करणाऱ्या स्वच्छ भारत मिशन व जलजीवनचे ५४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती मुदत डिसेंबर अखेरला संपणार आहे. डिसेंबर अखेरला स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचे नियुक्ती कालावधी मुदत संपणार असल्याने या विभागाच्या कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्वच्छता व ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयांतर्गत विविध तालुक्यात स्वच्छता मिशनचे ५४ कर्मचारी कार्यरत आहेत. मुख्य कार्यालयात स्वच्छता भारत मिशनचे ५ व जलजीवन विभागाचे ६ कर्मचारी विविध पदावर काम करीत आहेत. जिल्ह्यातील विविध तालुक्यात स्वच्छता भारत मिशनचे २१ व जलजीवनचे २२ कर्मचारी काम करीत आहेत. यामध्ये मानव संशोधन तज्ञ, इंजिनिअर, ऑपरेटर, स्वच्छता तज्ज्ञ, घनकचरा सांडपाणी तज्ज्ञ, लेखा सल्लागार, सनियंत्रण, मुल्यमापन तज्ज्ञ यांचा समावेश आहे.

**डिसेंबर अखेर मुदत संपणार**

जिल्ह्यातील नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्व व जनजागृती करण्यामध्ये स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे. मात्र या विभागाचे कर्मचारी कंत्राटी असल्याने त्यांना एका वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येते. डिसेंबर महिना अखेरला मुदत संपणार असल्याने या विभागाच्या कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. मुदतवाढ मिळविण्यासाठी संघटनामार्फत पाठपुरावा करण्यात येईल.

**- सचिन जाधव,**
कार्याध्यक्ष, पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समिती, महाराष्ट्र राज्य

ग्रामीण भागात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा आहे. मात्र लोकांना स्वच्छता करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या स्वच्छता भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती मुदत डिसेंबर महिना अखेरला संपणार आहे. त्यामुळे त्यांचे भविष्य अधांतरी असल्याचे दिसून येते. मार्च महिन्यात या विभागाच्या कर्मचाऱ्यांची मुदत संपल्यानंतर त्यांना डिसेंबर अखेरपर्यंत मुदत वाढवून देण्यात आले होते. त्यामुळे डिसेंबर महिन्यानंतर त्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात येत आहे.

## जागतिक एड्स दिनानिमित्त सायकल रॅली

**सोलापूर, दि. १ डिसेंबर-**

जागतिक एड्स दिनानिमित्त राज्य एड्स नियंत्रण संस्था, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, डॉ. वैशपायन महाविद्यालय, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, विधी व सेवा प्राधिकरण तसेच रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृतीपर सायकल रॅली उत्साहात पार पडली.



या रॅलीचा शुभारंभ जिल्हा रुग्णालय, गुरुनानक चौक येथून अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आला. वालचंद महाविद्यालयातील एनएसएसचे विद्यार्थी सायकली आणि जनजागृतीपर बॅनरसह रॅलीत सहभागी झाले. सहशिक्षक संदीप चेंडकापुरे आणि एनएसएस विभाग प्रमुख डॉ. अमोल शिंदे हे उपस्थित होते. सुरुवातीस विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी सहभागाचे कौतुक केले.

## बार्शी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर : राऊत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ डिसेंबर-**

बार्शी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव तत्पर आहे. शहरातील तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी औद्योगिक वसाहतीची निर्मिती शहरात होत आहे. लवकरच मोठमोठे उद्योगधंदे बार्शीत येतील. सर्वात मोठ्या उपसा सिंचन प्रकल्पामुळे तालुक्याची अर्थ व्यवस्था सुधारते आहे म्हणूनच विकासासाठी भाजपच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी केले.



बार्शीत २०१६ ते २०२१ पर्यंत नगरपरिषदेत आमची सत्ता होती. त्याकाळात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहेत, असे सांगून ते पुढे म्हणाले, डांबरी रस्ते, सिमेंट रस्ते, शहीद पार्क, शिवसृष्टीसह २९६ कोटीची उजनी ते बार्शीपर्यंत नवीन पाईप लाईनचे काम केले आहे. हे काम जवळजवळ ६० ते ७० टक्के पूर्ण झाले आहे. येत्या एप्रिलपर्यंत कोणत्याही परिस्थितीत पाणी येईल. बार्शीत मागील सहा महिन्यात शहरात सुमारे ३५ तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत. हे कोणालाही भूषणावह नाही. तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी, शेतकरी सुजलाम सुफलाम होण्यासाठी पाण्याची मोठी आवश्यकता आहे. केंद्र आणि राज्यात आपल्या विचाराचे सरकार असल्यामुळे विकासाला चालना मिळणार आहे. भगवंत मंदिराच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी शासन दरबारी आपण प्रयत्नशील राहणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# पंढरपूर तीर्थक्षेत्र आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी भाजप उमेदवारांना निवडून द्या

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ डिसेंबर-**

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र आपणास आंतरराष्ट्रीय स्तरावर सादर करायचे आहे. यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी लागणार आहे, हा निधी केवळ भाजप सरकार जनतेला देऊ शकते. शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी भाजप आणि शहर विकास आघाडीच्या उमेदवारांना नगरपालिकेत निवडून द्या, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. भाजपा व शहर विकास आघाडीच्या वतीने शिवतीर्थ येथे आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते.

व्यासपीठावर आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शामल शिरसट यांच्यासह गुरुदास अभ्यंकर, गणेश अधटराव, बालाजी मलपे, शैलेश बडवे, अपर्णा तारके, रचिता सगर, प्रदीप पवार, श्वेता डोंबे, शंकर सुरवसे, अमोल डोके, भागवत बडवे, बाळासाहेब कौलवार, माऊली हळवणकर, अक्षय वाडकर, महादेव धोत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.




पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले, पाचशे कोटींचे रस्ते करायचे आहेत, तीर्थक्षेत्र विकास योजना करण्यासाठी ३५०० कोटी रुपये लागणार आहेत, विरोधक हा निधी कसा आणतील, हे पैसे कोणाकडे मागणार? आलेला निधी कसा वापरणार? नुसती वैयक्तिक टीका करून विकास करता येत नाही त्यासाठी दृष्टी लागते. वाराणसी, अयोध्या येथे फाईव्ह स्टार हॉटेल्स झाली आहेत. त्या धर्तीवर पंढरपूर विकसित करायचे आहे.

माजी आमदार प्रशांत परिचारक याप्रसंगी बोलताना म्हणाले, तालुक्यातील द्राक्ष, ऊस, डाळिंब लागवड वाढली आहे. तालुका सुजलाम सुफलाम झाला आहे. मोठे मालक श्रीमंत सुधाकर परिचारक १९६५ पासून राजकारणात आहेत, खेड्यासारखी परिस्थिती होती. एकही डांबरी रस्ता नव्हता केवळ घरपट्टी, पाणीपट्टी, दुकानाचे भाडे एवढेच उत्पन्न शहरातून मिळते. गरपालिकेचा खर्च कोट्यवधी रुपयांचा आहे. १९९५ साली प्रथम ड्रेनेज सिस्टीम तयार केली.

यावेळी चंदु जगताप, भारत माळी, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे श्रीकांत शिंदे, जितेंद्र बनसोडे, कृष्णा वाघमारे, आप्पा राऊत, माजी नगरसेवक बागवान, पंडित भोसले, सतीश धनवे, सुनील वाळूजकर, पंढरपूर अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, स्वेरी कॉलेज चे डॉ.बी.पी.रोंगे, लक्ष्मण शिरसट यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रचारादरम्यान विरोधकांनी परिचारक कुटुंबियांवर अनेक खोटे आरोप करत आहेत. श्रीकृष्ण यजुर्वेद जागेविषयी दस्तुरखुद्द मालक भारत माळी यांनी स्पष्ट केले की, सुरवसे बिल्डिंगवरुन राजकारण सुरु आहे. पण या जागेचे केवळ डेव्हलपर परिचारक आहेत, असा जाहीर खुलासा करून विरोधकांचे खोटे आरोप हाणून पाडले.

आज विरोधकांना बडवे, उत्पात सेवाधारी मंडळींचा कळवळा आला आहे. पण २०१४ साली त्यांच्या ताब्यातून देऊळ काढून घेतले. त्यावेळी याच लोकांनी फटाके उडवून आनंद साजरा केला होता. तेव्हा कुठे गेले गेली होती तुमची माया? असा जाब माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी विचारला.

## पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे सोलापुरात ७ डिसेंबरला व्याख्यान

**सोलापूर,दि.१ डिसेंबर-**



महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या दक्षिण सोलापूर शाखेतर्फे पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे 'भारत का भविष्य' या विषयावर ७ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजून २५ मिनिटांनी हुतात्मा स्मृती मंदिरात व्याख्यान होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर देवगिरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे उपस्थित राहणार आहेत. कुलश्रेष्ठ यांच्या ओघवत्या भाषणाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन परिषदेच्या अध्यक्षा रेणुका महागावकर तसेच पदाधिकारी यांनी केले आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तीन नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी आज मतदान

त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : लातूर जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर व औसा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज मंगळवार, २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या कालावधीत मतदान होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार निलंगा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायतीच्या सर्व जागांचे मतदान, तसेच उदगीर शहरातील तीन जागांचे मतदान पुढे ढकलण्यात आले असून ते सुधारित कार्यक्रमानुसार होणार आहे.

उदगीर नगरपरिषदेमध्ये २० प्रभागांमध्ये ९१ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी एकूण ११० मतदान पथके आणि १४ झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच १२१ कंट्रोल युनिट आणि २४२ बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या नगरपरिषदेत ८३ हजार १७९ मतदार आपला हक्क बजाविणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार प्रभाग क्रमांक ८ अ, प्रभाग क्रमांक १५ ब आणि प्रभाग क्रमांक १६ ब या तीन सदस्यपदाची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे ३७ सदस्य आणि नगराध्यक्ष पदासाठी मतदान होणार आहे.



# नांदेड रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत टाकला जातोय घंटागाडीतील कचरा

## नागरिकांच्या आरोग्याकडे मनपा प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष?

त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : लातूर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचा कारभार काही केल्या सुधारणारच नाही, असे एकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे. लातूर शहरातून नांदेडला जाणाऱ्या अगदी शहराच्या भर वस्तीतील मुख्य रस्त्यालगत घंटागाडीतून संकलित केलेला कचरा टाकला जात असल्याने या परिसरातील नागरिकांचे धोक्यात आल्याशिवाय राहील तरी कसे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यावरून नागरिकांच्या आरोग्याकडे मनपा प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारीकडेही फारसे गांभीर्याने पहिले जात नसल्याचे निदर्शनास येते.

लातूर शहराचा चौफेर वेगाने विकास होत आहे. शहरातील नांदेड रोड वगळता अन्य मार्गावरील मालमत्तांच्या किमती जणू आता गगनाला भिडल्या आहेत. त्याला अपवाद आहे तो फक्त नांदेड रोड परिसरातील जागा-मालमत्तांचा. शहराच्या सर्वच भागात आजमितीस प्लॉट आणि घरांच्या किंमती वेगाने वाढलेल्या पाहावयास मिळतात. औसा रोड परिसरातील मालमत्तांच्या किमतीबाबत तर बोलायलाच नको. मराठवाड्यातील अन्य महानगरांच्या तुलनेत लातूर शहरात प्लॉट, फ्लॅट आणि जागांचे दर जास्तीचे आहेत, हे वास्तव आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये तीन चार बीएचके चे रो हाऊस पन्नास ते साठ लाखांच्या दरम्यान



मिळते असे सांगण्यात येते. तेवढ्याच रो हाऊससाठी लातूरात मात्र किमान एक कोटी वा त्याहूनही अधिकचे पैसे मोजावे लागतात.

आता छत्रपती संभाजीनगर ही मराठवाड्याची राजधानी म्हणून ओळखले जाणारे शहर आहे. त्याठिकाणी औद्योगिक क्षेत्र, उद्योगधंदेही अधिक आहेत. त्यामानाने लातुरात औद्योगिक क्षेत्र मर्यादित आहे. लातूरला शिक्षणाची पंढरी म्हटले जात असल्याने आणि त्याठिकाणच्या मालमत्ता क्षेत्रातील वाढत्या दलालांमुळे लातूरच्या मालमत्तांचे दर गगनाला भिडले असल्याचे वास्तव आहे.

लातूर शहर व परिसरातील अन्य भागांपेक्षा नांदेड रोडला हे दर बऱ्यापैकी कमी आहेत. त्याचे एकच कारण आहे. हा परिसर वर्षानुवर्षे बकालवस्ती, अविकसित म्हणूनच ओळखला जातो. या भागात मुख्य रस्त्यालगत मोठमोठी धान्याची गोदामेही आहेत. त्यांना लाल गोदाम असे म्हटले जाते. या गोदामांच्या अगदी समोर मुख्य रस्त्यालगत घंटागाडीतून शहराच्या विविध भागातून संकलित करून आणलेला कचरा बिनधास्तपणे टाकला जातो. या वृत्तासोबतच्या छायाचित्रात घंटागाडीतून टाकला जात असलेला कचरा स्पष्टपणे पाहावला मिळतो. या लाल गोदाम परिसरात बाजूला मागास वस्ती आहे. त्या वस्तीतील रहिवासी मुख्य रस्त्यालगतच टायर जाळून त्यातील लोखंडी वायर भंगारात विकण्याचे काम करताना दिसतात.

या टायर जाळण्याच्या प्रक्रियेमुळे या भागातील हवा कायम प्रदूषित असल्याचे पाहायला मिळते. केवळ एवढेच नाही तर या भागातील रहिवाशांसाठी लाल गोदामालगत बांधण्यात आलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहांचीही अतिशय दयनिय अवस्था झाल्याचे पाहावयास मिळते. चांगल्या वस्तीतलाच नव्हे तर बकालवस्तीतील व्यक्तीही जाऊ शकणार नाही अशी या स्वच्छतागृहांची अवस्था झालेली आहे. त्याकडेही स्वच्छताविभागाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. बकाल परिसर म्हणून अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर मनपा प्रशासनाने कठोर कार्यवाहीचा बडगा उगारणे आवश्यक आहे. मनपाच्या स्वच्छता विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी रस्त्यालगत कचरा टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याच्या विषयाकडे गांभीर्याने पाहावे व या परिसराची बकाल वस्तीचा भाग अशी असणारी ओळख पुसून काढण्यासाठी सर्वतोपरी उपाय योजना करावी, अशीही मागणी सुजाण लातूरकरांतून केली जात आहे.



# वधू-वर परिचय पुस्तिकेचे शांतवीरलिंग शिवाचार्य महाराजांच्या हस्ते प्रकाशन

त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : लातूर येथे पार पडलेल्या १३ व्या राज्यस्तरीय सकल जंगम समाज वधू वर परिचय मेळाव्याच्या वधू वर नोंदणी परिचय पुस्तिकेचे प्रकाशन रविवारी हिरेमठ संस्थान औसा चे पिठाधिकारी शांतवीरलिंग शिवाचार्य महाराजांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मेळाव्याचे अध्यक्ष शिवशंकर प्रभुलिंग स्वामी, उपाध्यक्ष बसवेश्वर स्वामी, कोकलगे घरणीकर, सचिव त्र्यंबक गुरुनाथ स्वामी सह सचिव अनिल गंगाधर स्वामी हरंगुळकर, कोषाध्यक्ष ब्रम्हानंद स्वामी साकोळकर, लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा. सुदर्शन बिराजदार, स्वागताध्यक्ष सोमनाथ स्वामी डिगोळकर, व्यासपीठ प्रमुख शरणप्पा महादयप्पा दावणगिरे, निळकंठ स्वामी हरंगुळकर, बसलींग सिद्धेश्वर स्वामी, चंद्रकांत चनबस स्वामी, चंद्रकांत स्वामी पानचिंचोलीकर आदी समाज बांधव उपस्थित होते.

## वैष्णवी स्वामीला राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान

त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : लातूरची रहिवासी कु.वैष्णवी स्वामी हिला भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

नवी दिल्ली येथे सोमवारी (दि. १) झालेल्या फुटवेअर डिझाईन अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट च्या पदवीदान समारंभात राष्ट्रपतींनी वैष्णवीला सुवर्णपदक प्रदान केले. या समारंभास केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री पियुष गोयल, राज्यमंत्री जितीन प्रसाद हेही उपस्थित होते. लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार स्वामी यांची वैष्णवी ही कन्या आहे. एफडीडीआय द्वारा संचलित देशातील एकूण १२ कॅम्पस मधून अव्वल क्रमांक पटकावत कु. वैष्णवी स्वामी सुवर्णपदकाची मानकरी ठरली. केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालया



अंतर्गत शैक्षणिक केंद्र असलेल्या एफडीडीआय कॅम्पसमध्ये पादत्राणे डिझाईन, फॅशन डिझाईन आणि रिटेल मध्ये विविध कार्यक्रम राबवले जातात. त्यात वैष्णवी चा सहभाग आहे.

# १८ हजार विद्यार्थ्यांचे सामूहिक गीता पठण



त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : गीता जयंतीच्या निमित्ताने भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या लातूर, उदगीर, अंबाजोगाई, माजलगाव, बीड व पैठण येथील शैक्षणिक संकुलातील सुमारे १८ हजार विद्यार्थ्यांनी मार्गशीर्ष शुद्ध एकादशी म्हणजेच गीता जयंतीच्या दिवशी गीतेच्या १२ व्या व १५ व्या अध्यायाचे पठण केले. या सहाही संकुलातील विद्यार्थी थेट प्रक्षेपणाद्वारे आभासी पद्धतीने जोडले गेले व सकाळी आठ वाजता एकत्रितपणे गीतेच्या १२ व्या व १५ व्या अध्यायाचे पठण केले गेले.

यावेळी लातूर येथील श्री केशवराज शैक्षणिक संकुलातील रेनीसन्स सीबीएसई स्कूलमध्ये गीता जयंतीचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास आभासी पद्धतीने विशेष उपस्थित असलेले गीता धर्ममंडळाचे अध्यक्ष डॉ. मुकुंदजी दातार तसेच मंचावर उपस्थित शारदा पीठाधीशांच्या हस्ते सन्मानपत्र व रोख रक्कम २१००० या स्वरूपाचे पारितोषिक प्राप्त तथा गीतेचे १८ अध्याय मुखोद्गत असलेल्या विशेष अतिथी सौ. कांचन भावठाणकर व सौ. सुवर्णा देशमुख, गीता पठण संस्था समन्वयक प्रवीण सरदेशमुख, सहसमन्वयक संजय गुरव, महेश कस्तुरे, धनंजय तुंगीकर, शैलेश कुलकर्णी, गंगाधर खेडकर, रमनोज शिरूरे, बालासाहेब केंद्रे, शिवाजीराव हेंडगे, रेनीसन्स सीबीएसई स्कूलचे प्राचार्य महेश बांगर यांची मंचावर उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भगवान श्रीकृष्ण, श्रीमद्भगवद्गीता व भारत माता यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रवीण सरदेशमुख यांनी आपल्या जीवनातील गीतेचे महत्व सांगितले. गीतेमध्ये रथी व महारथीमध्ये दीर्घकालीन संवाद झाला. यात अर्जुनाची २७ नावे आलेली आहेत तर २३ वेळेस श्रीकृष्णांनी अर्जुनाला युद्धात तयार राहण्यासाठी आवाहन केले आहे. गीतेत अर्जुनाला संबोधल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी दीर्घकाळ कष्ट करावेत, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील विकल्प कमी करावे म्हणजेच संकल्प पूर्ण करता येईल असे सांगितले. याप्रसंगी त्यांनी थोर शास्त्रज्ञ, माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम व स्वामी शिवानंद यांची कथा सांगून भगवद्गीतेचे आपल्या जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.

सूत्रसंचालन स्मिता मेहकरकर व वैशाली फुलसे यांनी केले तर आभार केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे यांनी मानले. या कार्यक्रमाची सांगता संतोष बीडकर यांच्या संपूर्ण वंदे मातरम् ने झाली.

# चोरांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेकडून पर्दाफाश

त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : लातूर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने जिल्हाभरात मागच्या तीन महिन्यांपासून ज्वेलर्स दुकाने, बँक तसेच अनेक घरफोड्या करणाऱ्या सराईत आरोपींच्या टोळीचा पर्दाफाश केला असून या टोळीकडून १३ किलो ७०० ग्राम चांदीसह सोन्याचे दागिने असा एकूण तब्बल २४ लाख १७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीतील एका आरोपी पोलिसांच्या जाळ्यात सापडला असून टोळीतील आणखी चार आरोपी फरार आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी आपल्या पथकाकडून खात्रीशीर माहिती मिळवून लातूरच्या नवीन रेणापूर नाका परिसरात सापळा लावून रविवारी दुपारी दोनच्या सुमारास संशयास्पदरीत्या रोडवर उभा असलेल्या रोशनसिंग बबलुसिंग टाक (वय २० वर्षे), रा. संजयनगर, देऊळगावराजा, जि. बुलढाणा यास ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यातील पोत्यामध्ये मोठ्या प्रमाणात चांदीचे दागिने, चैन, करदोरे तसेच सोन्याचे दागिने आढळून आले. चौकशीदरम्यान रोशनसिंग टाक याने त्याच्यासोबतच्या आणखी चार फरार साथीदारांसह अहमदपूर सराफ लाईनमधील अमित ज्वेलर्स व विठ्ठल

**२४ लाख १७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त**

ज्वेलर्स,) काजळी हिप्परगा येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत, अहमदपूर मधील एका घरात तसेच निलंगा तालुक्यातील मदनसुरी येथील विश्वकर्मा ज्वेलर्स व परशुराम पार्क, लातूर येथील एका घरात असे एकूण पाच ठिकाणी चोऱ्या केल्याचे कबूल केले आहे. आरोपी रोशनसिंग बबलूसिंग टाक यास जप्त केलेल्या मुद्देमालासह पोलीस ठाणे अहमदपूर येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात पुढील तपास



कामी ताब्यात देण्यात आले आहे. इतर आरोपींचा शोध सुरू असून लवकरच त्यांनाही अटक करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि सदानंद, भुजबळ, अमितकुमार पुणेकर, पोउपनि राजाभाऊ घाडगे, प्रमोद देशमुख पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, तुराब पठाण, मोहन सुरवसे, राजेश कंचे, युवराज गिरी, गणेश साठे, शैलेश सुडे, श्रीनिवास जांभळे, सुहास जाधव, धनंजय गुट्टे, प्रज्वल कलमे, महिला पोलीस अंमलदार अंजली गायकवाड यांनी पार पाडली.

# लातूरमध्ये एड्स दिनानिमित्त सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्यावतीने ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून निघालेल्या या सायकल रॅलीला आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड व सहाय्यक संचालक संजय ढगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप एम. ढेले, जिल्हा परिषदेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अश-



ोक सारडा, वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद कलमे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी बिपीनचंद्र बोर्डे, विभागीय कार्यक्रम व्यवस्थापक पवन वाडकर तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य 'अडथळ्यांवर मात करून, एकजूटीने एचआयव्ही, एड्सला लढा देवू, नवं परिवर्तन घडू' चा नारा देवून जनजागरण सायकल रॅलीला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज शहीद भगतसिंग चौक येथून पुन्हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर सायकल रॅलीचा समारोप करण्यात आला. सायकल क्लबमधील अध्यक्ष, सचिव, सदस्य, विद्यार्थी, विविध संस्थातील अधिकारी, कर्मचारी या रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

आरोग्य उपसंचालक श्रीमती डॉ. गायकवाड यांनी रॅलीतील उपस्थितांना एचआयव्ही, एड्सचा प्रतिबंध व प्रतिकार करणे तसेच एचआयव्ही, एड्सचे समूळ उच्चाटनासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. सहाय्यक संचालक ढगे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप एम. ढेले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विलास दुरगकर यांनी केले.

रॅलीच्या समारोपप्रसंगी एचआयव्ही, एड्स विषयी रेड रिबन क्लब, दयानंद कला महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांच्या सहभागाने फ्लॅश मॉब उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. या सायकल रॅलीमध्ये लातूर येथील सायकलिस्ट क्लब, सायकल बडीज क्लब, मॉम्स विथ क्लब, कल्याणी महिला तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण मंडळ, टीआय प्रकल्प व प्राईड इंडिया विहान संस्था, तसेच विविध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

# मतदान अधिकारावर गदा आणणारी लोकशाहीविरोधी कृती : आ. देशमुख

त.भा. वृत्तसेवा, लातूर, १ डिसेंबर : लातूर जिल्ह्यातील निलंगा नगरपरिषद निवडणुकीला मतदानाला अवघे १२ ते १४ तास शिल्लक असताना स्थगिती देण्याचा निर्णय अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. निवडणूक आयोगाची ही कृती जनतेच्या मतदान अधिकारावर गदा आणणारी आणि लोकशाहीविरोधी आहे, अशी तीव्र शब्दात टीका माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी केली आहे.

आ. अमित देशमुख यांनी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवण्याच्या प्रवृत्तीवर कडक शब्दांत ताशेरे ओढले ते म्हणाले, निवडणुका लांबवण्याचे षडयंत्र असूनराज्यातील सत्ताधारी मंडळींना प्रशासनाच्या माध्यमातून एकाधिकारशाही गाजवता यावी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका या ना त्या कारणाने लांबवण्याचा प्रयत्न होत आहे. ही कृती म्हणजे पंचायतराज कायद्याचे उल्लंघन असून पंचायतराज कायद्यानुसार दर पाच वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे आवश्यक आहे, मात्र तांत्रिक कारणावरून या निवडणुका पुढे जातील याची व्यवस्था राज्यातील सत्ताधारी मंडळींकडूनच केली जात आहे असे त्यांनी म्हटले आहे. अंतिम क्षणी निवडणूकांना स्थगिती देणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका जाहीर झाल्यावरही त्या सुरळीत पार पडणार नाहीत याची सत्ताधारी मंडळीकडून व्यवस्थाच आयोगामार्फतच केली जात आहे, असे दिसुन येते.



लातूर जिल्ह्यातील रेणापूर नगरपंचायतसह राज्यातील २२ नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या निवडणुका प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना शेवटच्या दिवशी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला, यात निलंगा नगरपरिषद निवडणुकीची स्थगिती सर्वात भयानक आहे असे आमदार देशमुख म्हणाले.

जेथे सत्ताधारी मंडळींच्या विरोधात जनतेचा कौल दिसतो आहे, तेथील निवडणुका स्थगित करण्याचा सपाटा निवडणूक आयोगाने लावल्याचे दिसून येत आहे. निवडणूक प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात निवडणुका स्थगित करून आयोगाने आपण स्वायत्त नसून सत्ताधारी मंडळीच्या हातचे बाहुले असल्याचे सिद्ध केले आहे.

### सत्ताधारी मंडळीकडून दडपशाही

सत्ताधारी मंडळींनी साम, दाम, दंड या आयुधांचा सर्रास वापर केल्याचे सध्या राज्यभरातील वातावरणावरून दिसून येत आहे. ज्या ठिकाणी काहीही करून निवडणूक जिंकताच येत नाही असे लक्षात आले, तेथील निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत, असे त्यांनी नमूद केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/



# निलंगा नगरपरिषद निवडणूक स्थगित

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १ डिसेंबर :** निलंगा नगरपालिका निवडणूक २०२५ साठी नगराध्यक्ष व सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या दोन जणांनी न्यायालयात अपील दाखल केले होते. उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी आवश्यक ती मुदत न मिळाल्यामुळे निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबर २०२५ च्या आदेशानुसार संपूर्ण निलंगा न.प ची निवडणूक प्रक्रिया स्थगित करून पुढे ढकलण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की , निलंगा नगरपरिषद निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अजित बंडोपंत शाहीर यांनी नगराध्यक्ष पदासाठी तसेच एका प्रभागात सदस्य पदासाठी व सुजित बंडोपंत शाहीर यांनी एका प्रभागात सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. छाननीत दोघांच्याही अर्जात त्रुटी असल्याचे सांगून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अजीत शाहीर व सुजित शाहीर यांचे उमेदवारी अर्ज अवैध केले होते. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या या निर्णयाविरुद्ध अजित शाहीर व सुजित शाहीर यांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने अपिलावर दि २५ नोव्हेंबर निर्णय दिला. त्यामुळे अपिलार्थ्यांना आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आवश्यक ती मुदत न मिळाल्यामुळे निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबरच्या आदेशानुसार निलंगा नगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या २९ नोव्हेंबर च्या आदेशानुसार दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे. त्यानुसार १० डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येईल व दिनांक २० डिसेंबर रोजी मतदान २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन मतदानाचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

### निलंगा नगर परिषदेची निवडणूक

निलंगा नगर परिषदेची निवडणूक स्थगित करण्यात आल्याच्या निषेधार्थ काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निलंगा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रास्ता रोको आंदोलन करून निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात घोषणाबाजी करून निदर्शने केली.

# तुम्ही साथ द्या, औसाचा कायापालट करू : मुख्यमंत्री

## व्हिडिओ संदेशातून मुख्यमंत्र्यांनी साधला औसा शहरातील मतदारांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, १ डिसेंबर :** गेल्या २० वर्षापासून रखडलेल्या माकणी पाणी पुरवठा योजनेची मागणी तुम्ही माझ्याकडे केली होती. त्यावेळी आठ दिवसात मंजुरी देण्याचे आश्वासन दिले होते. आणि आठच दिवसात तुमची मागणी पुर्ण केली. त्याचप्रमाणे आजपर्यंत तुम्ही जे कांही मागितले. ते संपुर्ण दिले आहे. होवू घातलेल्या नगरपालिका निवडणुकीत तुम्ही दि. २ रोजी भाजपा-शिवसेना-रिपाईंच्या महायुतीला मतदारुपी साथ द्या.शहराचा सर्वांगिण विकासातून कायापालट करु असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशातून औसा शहरातील मतदारांशी थेट संवाद साधत दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, औसा शहराशी आपला जुना ऋणानुबंध आहे. असे सांगून त्यांनी गेल्या काही वर्षांत झालेल्या महत्त्वाच्या विकासकामांचा आढावा घेत मतदारांमध्ये यावेळी उत्साह निर्माण केला. औसा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारसा जपणारे शहर आहे. पंधरा-वीस दिवसांनी पाणी मिळणाऱ्या औशासाठी माकणी धरणाची योजना औसेकरांची २० वर्षांची लढाई होती. महा जनादेश यात्रेदरम्यान आमदार अभिमन्यू पवार यांनी समस्या



माझ्या निदर्शनास आणून दिली. त्याच सभेत मी आठ दिवसात योजनेला मंजुरी देण्याची घोषणा केली आणि आठ दिवसात ती प्रत्यक्षात दिली. २०२३-२४ मध्ये काम सुरू झाले आणि आज औशाला माकणी धरणाचे पाणी मिळू लागले आहे.याचसोबत अमृत योजनेतून औसा शहराच्या वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४३ कोटी रुपये दिल्याची माहिती त्यांनी दिली. या योजनेचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, औसा शहरातील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार २०२० पासून सातत्याने पाठपुरावा करत होते.

पण तेव्हा सत्तेत असलेल्या नगरपालिकेने काम रोखले होते असा खुलासा करुन मुख्यमंत्री पुढे म्हणाले, २०२२ मध्ये आमची सत्ता आल्यानंतर १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाला १०० कोटींची मंजूरी दिली. आणि तात्काळ निधी देऊन कामाला गती दिली. आज काम वेगाने सुरू आहे.

औशाच्या सर्वांगीण विकासासाठी ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी देऊन राज्य सरकारने मोठी कामगिरी केली आहे. शहरातील मुख्य रस्त्याच्या टप्पा ३ चे काम पूर्ण झाले असून ११ सार्वजनिक स्वच्छतागृहे, विश्रांतीगृहे, वरिष्ठ न्यायालयाची स्थापना तसेच दोन कोटी खर्चून आधुनिक बौद्ध विहाराची उभारणी झाली आहे. श्रीक्षेत्र गोपाळपूर देवस्थानातील भाविकांसाठी सुविधांसाठीही ५ कोटी रुपये दिले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

औसा शहराला ग्रामीण भागाशी आणि लातूर शहराशी जोडणाऱ्या सात रस्त्यांपैकी तीन रस्त्यांचे काम पूर्ण झालेआहे. उर्वरित चार रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. यासोबतच जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांच्या आमदारकीच्या काळात अनेक विकासकामे झाली.या कामाचे त्यांनी कौतुक केले.

नगराध्यक्षपदासाठी भाजपने डॉ. ज्योती महादेव बनसुडे यांच्यासारखा सक्षम, उच्च शिक्षित आणि सेवेतील सिद्ध पर्याय औसा शहराला दिल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, कोरोना काळात बनसोडे डॉक्टर दांपत्याने केलेली सेवा औसा विसरू शकत नाही. यापुढेही अशीच सेवा करण्यासाठी आता त्यांना संधी द्या. असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

# मुंबई महानगरपालिकेत आसिफ शेख यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**
**वलांडी, १ डिसेंबर :** मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये सुरु असलेल्या विकासकामांना गती मिळावी यासाठी नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमध्ये लातूर तालुक्यातील मुशिराबाद येथील रहिवासी तथा वलांडीतील यासीन शहा यांचे भाचे आसिफ महेबूब शेख यांची कार्यकारी सहायक या प्रतिष्ठित पदावर निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्यांदाच वलांडी भेटीवर आलेल्या आसिफ शेख यांचे गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात, यासीन शहा यांच्या फ्रूट दुकानाजवळ अतिशय उत्साहात आणि भव्य स्वागत करण्यात आले.



या स्वागत सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते अरुण पाटील, दत्ता बिरादार, वैजनाथ मुंजाळ, रामलिंग बिरादार, मजरू बौडीवाले, बाबूलाल पठाण, नियाज शहा, मुबारक कादरी, मुस्ताक कादरी, शफिक सौदागर, मस्जिद कुरेशी, नयुम तांबोळी, मैनु मुर्शेद, मुदसिर सय्यद, धनराज बनसोडे तसेच गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

विशेष म्हणजे, साधारण गरीब परिस्थितीत मुशिराबाद या गावातच टेलरिंगचा व्यवसाय करणाऱ्या आई-वडिलांनी आपल्या मुलाला दिलेले शिक्षण आज खऱ्या अर्थाने सार्थक झाले, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकतेच्या बळावर मिळवलेले हे यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

स्थानिक जनप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी आसिफ शेख यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.




# लाल बहादूर शास्त्री विद्यालयात संविधान दिन

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १ डिसेंबर :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात ७६ वा भारतीय संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा मारावार तर प्रमुख अतिथी राहूल नेटके तानाजी खोकले एकनाथ राऊत उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक किरण नेमट माधव मठवाले अभ्यासपूरक मंडळ सहप्रमुख निलेश मांडवकर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना राहूल नेटके यांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपली स्वतःची राज्यघटना निर्माण करण्याची गरज, ती राज्यघटना तयार करण्याची प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले. तर तानाजी खोकले यांनी वेगवेगळ्या उदाहरणाच्या साह्याने भारतीय संविधानाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाध्यक्ष कृष्णा मारावार म्हणाले, की भारतीय संविधानाचा सर्व अंगानी आपण अभ्यास केला पाहिजे. संविधानामुळेच आपली लोकशाही आजपर्यंत टिकून आहे म्हणून संविधानाचे महत्त्व आपण सर्वांनी लक्षात घ्यावे असे मत व्यक्त केले.

संविधान दिनाच्या निमित्ताने आज लालबहादूर शास्त्री विद्यालयातील राष्ट्रीय कॅडेट कोर एनसीसी विभागाच्या वतीने शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीसाठी एनसीसी विभाग प्रमुख विष्णू तेलंग रॅली प्रमुख लक्ष्मी चव्हाण यांनी परिश्रम घेतले. तसेच विद्यार्थ्यांच्या साह्याने गुरुदत्त महामुनी यांनी भारताच्या नकाशाची प्रतिकृती तयार केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सृष्टी कोसंबे प्रास्ताविक .ऋतुजा सुरवसे तेजस्विनी रायपल्ले तर आभार अपेक्षा केंद्रे पूजा पाटील यांनी मानले. संविधान गीत तेजस्विनी स्वामी वैष्णवी डोईजोडे यांनी सादर केले. संविधानाचे वाचन गायत्री तोगरगे या विद्यार्थिनीनी केले. तर शरयू पांचाळ या विद्यार्थिनीच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. ज्ञानोपासक मंडळाच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानोपासक मंडळ प्रमुख आशा गौतम, कार्यक्रम प्रमुख संतोष गजलवार सह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# भगवद्गीता जयंतीनिमित्त पंधरावा व बाराव्या अध्यायाचे सामूहिक पठण

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १ डिसेंबर :** लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात गीता जयंती निमित्त



बाराव्या व पंधराव्या अध्यायाचे पठण करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुने प्रमुख पाहुणे चिन्मय मिशन च्याअध्यक्षा मालतीताई कुलकर्णी, सचिव अर्चनाताई चिकटवार पोस्ते पोदार स्कूलचे सचिव सुरज पोस्ते, सतनप्पा हूरदळे, व्यंकटराव गुरमे, संतोषराव कुलकर्णी अंकुशराव मिरगुडे, शिवाजीराव बिराजदार, षण्मुखानंद मठपती, श्रीपाद सीमंतकर प्रकाश येरमे, वसंतराव कलकोटे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे, निलेश मांडवकर यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या बीड, लातूर, अंबाजोगाई, माजलगाव, पैठण आणि उदगीर येथील शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी मुखोद्गत गीतेच्या बारा व पंधराव्या अध्यायाचे पठण केले. या सहाही संकुलातील विद्यार्थी थेट प्रक्षेपणाद्वारे जोडले गेले. सकाळी आठ वाजता एकत्रितपणे पठण करण्यात आले. गीता जयंतीनिमित्त संतोष कुलकर्णी यांनी आपल्या वक्तव्यातून भगवद्गीतेतून आपल्याला त्याग, समर्पण, प्रेम, करूणा, दया या सर्व मूल्यांची ओळख होते .गीतेचे चिंतन करावे १२ व्या व १५व्या अध्यायाचे महत्त्व थोडक्यात सांगितले.

प्रास्ताविकेतून किरण नेमट यांनी भगवद्गीतेला जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवनाचे सार म्हणजे गीता असे विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया गोविंदवाड यांनी केले स्वागत व परिचय पारसेवार अंबिका व आभार पर्यवेक्षक कृष्णा मारावार यांनी व्यक्त केले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पती, सासू-सासऱ्यांना कठोर शिक्षा

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, १ डिसेंबर :** सासरच्यांकडून हुंड्यासाठी होणाऱ्या सततच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केलेल्या विवाहितेच्या पतीसह सासू - सासऱ्यांना उदगीरच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे.

उदगीर तालुक्यातील लोणी येथील मयत नीलम्मा स्वामी हिने हुंड्यासाठी होणाऱ्या छळाला कंटाळून आपल्या सात महिन्याच्या मुलीसह स्वतःला रॉकेल ओतून जाळून घेतले होते. याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात मयत विवाहितेचा पती, सासू, सासरा दीर व नणंद यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुद्ध उदगीरच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. न्यायालयाने पती ब्रम्हानंद स्वामी याला दहा वर्षांची शिक्षा सुनावली. तर सासरा गुरुनाथ स्वामी व सासू शांताबाई स्वामी यांना प्रत्येकी सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात सरकारी वकील म्हणून एड. शिवकुमार गिरवलकर यांनी काम पाहिले . गिरवलकर यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्या. वाय .बी. गमे यांनी आरोपींना ही शिक्षा ठोठावली.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण १० साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. कठोर शिक्षा झालेल्या आरोपींवर कारावासाच्या शिक्षेशिवाय विविध कलमान्वये २७ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

# एड्स दिनानिमित्त किनगावमध्ये व्याख्यान व विविध स्पर्धा

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, १ डिसेंबर :** अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयात १ डिसेंबर जागतिक एड्स दिन या दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, महात्मा फुले महाविद्यालय किनगाव संचलित रेड रिबन क्लब व आयसीटीसी ग्रामीण रुग्णालय अहमदपूरच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि १ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १० वा एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या जनजागरण रॅली ला हिरवा झेंडा महाविद्यालयाचे प्राचार्य कॅप्टन डॉ बबनराव बोडके आणि समुपदेशक गणेश स्वामी यांनी दाखविला.

यावेळी प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुर्यवंशी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भारत भदाडे आदी प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. ही रॅली महात्मा फुले महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून निघून किनगांव च्या प्रमुख रस्त्याने जनजागृती करत महाविद्यालयात आली. या रॅलीत २८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता



त्यानंतर प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांच्या मार्गदशाखाली विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण होते तर प्रमुख मार्गदर्शक गणेश स्वामी, गणेश सुर्यवंशी आदि होते.

यावेळी व्याख्यान कार्यक्रमात समुपदेशक गणेश स्वामी, प्रयोग शाळा तंज्ञ गणेश सुर्यवंशी यांनी मार्गदर्शक करताना विद्यार्थ्यांना एड्सबाबत जनजागृती, प्रतिबंधक उपाय करताना जीवनात तीन एबीसीचा अवलंब करावा अन्यथा मृत्यू अटळ असल्याचे सांगितले. त्याबरोबच रक्तदानाचे महत्त्व, आरोग्यदायी जीवनशैली याबाबत माहिती दिली आणि रेड रिबन क्लबमधील स्टार सदस्य तुकाराम पांचाळ, संगमेश्वर इरले, संदीप खलसे, किशोर रायभोळे, स्वप्निल मुळे अभिजीत कांबळे, प्रज्ञा मस्के, शितल बदने, महानंदा कराड, अंकिता भंडारे, साक्षी कांगणे, स्वाती तिगोटे, योगिता सूर्यवाड आदी विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला आणि उपप्राचार्य डॉ विठ्ठल चव्हाण यांनी सखोल माहिती देत अध्यक्षीय समारोप केला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन कु शिवराम फड यांनी केले तर शेवटी आभार प्रा. बालाजी आचार्य यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित प्रा लक्ष्मण क्षिरसागर प्रा. दयानंद सुर्यवंशी, प्रा. बालाजी आचार्य, प्रा. राजू गुट्टे, डॉ. विरनाथ हुमनाबादे, डॉ. अनंत सोमवंशी, प्रा. संजय जगताप, डॉ. बळीराम पवार, डॉ प्रभाकर स्वामी , डॉ. सदाशिव वरवटे, प्रा. राजुकुमार शिंदे, प्रा. पांडूरंग कांबळे, डॉ चेतन मुंढे, प्रा. कृष्णा केंद्रे, डॉ. दर्शना कानवटे, डॉ. अंकिता जाधव, डॉ. पदमजा हगदळे, डॉ. मिरा शिदे, प्रा. चंद्रमणी बनसोडे, प्रा. सुनिल शिंदे, प्रा. अभय गोरटे, प्रा. विक्रम गायकवाड, डॉ. सुमेध जोगदंड, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. विठ्ठल कबीर, कार्यालयीन अधिक्षक गोपाळ इंद्राळे, उद्धवराव जाधव, इद्रदेव पवार, अनिल भदाडे, कृष्णा धरणे, शिवाजी हुबांड आदिची होती राष्ट्रगीताने व्याख्यानाची सांगता झाली मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### सक्षम ताटे खून प्रकरण

# आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

सक्षम ताटे खुन प्रकरणातील आरोपीच्या पोलीस कोठडित तीन दिवसाची वाढ करण्यात आली आहे. महिला आरोपी तसेच अल्पवयीन आरोपीला वगळून न्यायालयाने अन्य चार जणांच्या पोलीस कोठडीत वाढ केली आहे.

दि. २७ नाव्हेंबर रोजी प्रेम प्रकरणातून सक्षम ताटे याचा गोळ्या झाडून व डोक्यात फरशी घालून खुन करण्यात आला होता. पोलीसांनी या प्रकरणात जयश्री मदनसिंह ठाकुर उर्फ मामीडवार, गजानन बालाजी मामीडवार, सुभाष लखे व वेदांत अशोक कुदळेकर यांना अटक केली होती. न्यायालयाने यापुर्वी त्यांना एकदिवसाठी पोलीस कोठडी सुनावली होती. आज वाढीव पोलीस कोठडी मागणीवर दुसरे अतिरिक्त सत्र न्यायाधिश एस.डी. तावशिकर यांनी महिला आरोपीस वगळुन इतर चार जणांच्या पोलीस कोठडीत वाढ केली आहे.

दरम्यान ही हत्या प्रेमप्रकरणातून झाली असून राज्यभर चर्चा होत आहे. आज या प्रकरणात पिडीत कुटूंबाची ॲड. गुणरत्न सदावर्ते व त्यांच्या पत्नीने भेट घेवून ताटे कुटूंबीयाचे सांत्वन केले. हा खटला फासट्रॅक कोर्टात चालवण्याबरोबरच खटला देखिल लढण्याची तयारी ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी दर्शवली.

# रब्बी हंगामासाठी अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिक स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिक स्पर्धा रब्बी हंगाम २०२५ साठी आयोजित करण्यात आल्या आहेत. रब्बी हंगाम सन २०२५ पिकस्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांना केले आहे.

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्याकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते, अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन विजेत्या शेतकऱ्यांचा गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढण्यास मदत होऊन अधिक उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल हा उद्देश ठेवून राज्यात कृषि विभागामार्फत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.

**पिक स्पर्धेतील पिके**

रब्बी पिकात ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांचा समावेश आहे.

**पात्रता निकष**

स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व जमीन तो स्वतः कसत असणे आवशक्य आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येल. पीकस्पर्धामध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

**कागदपत्रे**

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ). ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन. सातबारा, ८-अ उतारा. जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास. पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबधित सातबारा वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा. बँक खाते चेक, पासबुक पहिल्या पानाची छायांकित प्रत.

**अर्ज करण्याची मुदत**

खरीप हंगामामध्ये पिकस्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख पुढील प्रमाणे राहील. ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस . ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पिकासाठी ३१ डिसेंबर २०२५ राहील. अर्ज दाखल करण्याच्या तारखेच्या दिवशी शासकीय सुट्टी असल्यास त्यापुढील शासकीय सुट्टी नसलेली तारीख गृहीत धरण्यात यावी.

**स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क**

पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम तिनशे रुपये राहील व आदिवासी गटासाठी रक्कम एकशे पन्नास रुपये राहील. सहभागी शेतकऱ्यांनी प्रवेश शुल्क स्वतः ०४०१ पिक संवर्धन १०४ शेती क्षेत्रापासून प्राप्त जमा रक्कमा (००) (०२) पीक स्पर्धा योजनेखालील जमा रक्कमा ०४०१०४७३०१ या शिर्षामध्ये शासकीय कोषागारात विहीत मुदतीत जमा करावे.

**बक्षिसाचे स्वरूप**

पहिले, दुसरे, तिसरे यानुसार तालुका पातळीवर ५ हजार, ३ हजार, २ हजार त्याप्रमाणे जिल्हा पातळीवर १० हजार, ७ हजार, ५ हजार तर राज्य पातळीवर ५० हजार, ४० हजार, ३० हजार रुपये बक्षिस सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस स्वरुपात दिले जाईल.

या योजनेबाबत अधिक माहितीसाठी राज्य शासनाच्या कृषि विभागाचे् .ज्ञीळीहळ.ारहरीरोहीीर.सीं.ळप या संकेतस्थळावर किंवा संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन कृषि कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# निवडणुकीत 'बायोमेट्रिक व्होटिंग' प्रणाली लागू करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

लोकशाही प्रक्रिया अधिक मजबूत आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने, नांदेड येथील एका प्रमुख नागरिकाने निवडणुकीत आधार कार्ड आणि अन्य सरकारी डेटाबेसशी संलग्न असलेल्या बायोमेट्रिक सत्यापन प्रणाली (Biometric Verification Systeा) अनिवार्य करण्याची मागणी केली आहे. नांदेडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले (भा.प्र.से.) यांनी हे निवेदन पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी (उएज) यांच्याकडे सादर केले आहे.

स. रंजीत सिंघ अमरजीत सिंघ गिल, सदस्य, शिख समुदाय समन्वय समिती, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्य निवडणूक आयुक्त, भारत निवडणूक आयोग यांना उद्देशून हे निवेदन दिले होते. या निवेदनामध्ये, देशभर मतदानाच्या वेळी आधार कार्ड, राशन कार्ड किंवा अन्य सरकारी डेटाबेसशी जोडलेल्या बायोमेट्रिक सत्यापन प्रणालीला अनिवार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे बोगस मतदानाला आळा बसेल आणि लोकशाहीचा पाया अधिक मजबूत होईल, असे मत निवेदनात व्यक्त करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी संदर्भ निवेदनाची प्रत प्रधान सचिव तथा, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्राद्वारे पाठवली आहे.

सदर मागणीच्या अंमलबजावणीसाठी योग्य विचार आणि कार्यवाही करावी, अशी विनंती या शासकीय पत्रात करण्यात आली आहे. या मागणीमुळे भविष्यात मतदान प्रक्रियेत मोठे बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## श्री दत्त जयंती निमित्त सव्वाखंडी तांदुळाची महापूजा

**सोनखेड** -मडकी येथे श्री दत्त जयंती निमित्त मडकी येथे कलश स्थापना दि २९-११-२०२५ रोजी होणार असून त्या निमित्त अखंड दत्तनाम सप्ताह व सव्वा खंडी तांदूळाची महापुजेचे आयोजन करण्यात आले असून व दि ५-१२-२०२५ रोजी श्री रुद्रगिरी महाराज किवळेकर यांचे कीर्तन व साय गावातील मुख्य रस्त्याने पालखी मिरवणूक व महाप्रसाद साय ६ वाजता महापुजेस प्रारंभ होणार असून या महापुजेस संत खुशालगिरी महाराज मठ संस्थान शंखतीर्थ व संत निर्गुणपुरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असणार असून या कार्क्रमास सर्व भाविक भक्त व परिसरातील सर्व नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त मडकी येथील गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात आले.

## श्री गुरु चरीत्र पारायण व दत्त नाम सप्ताह प्रारंभ

**इस्लापूर** -किनवट तालुक्यातील इस्लापूर रेल्वे स्टेशन येथील श्री दत्त मंदिर येथे गावकर्यांच्या वतीने २७ नोव्हेंबरपासून ते दिनांक ४-१२-२०२५ पर्यंत श्री गुरु चरीत्र पारायण व दत्त नाम सप्ताह व शिवमहापुराण कथेला सुरुवात झाली आहे. कथेचे शिव कथाकार श्री भीमाशंकर महाराज यांच्या अमृतवाणीतून ऐकवयास मिळत आहे. सप्ताहातील



दैनदिन कार्यक्रमाची रूपरेषा: सकाळी ७ ते १० श्री गुरुचरित्र पारायण ११ ते १ श्री दत्त नाम स्मरण (पारा) दुपारी १ ते ५ शिव महापुराण सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ रात्री ८ ते १० भजन जागर या प्रमाणे राहणार आहे.व दिनांक ४-१२-२०२५ रोज गुरुवार दत्त पौर्णीमा निमित्य सकाळी होम हवन श्री दत्त महाराजांची मूती स्थापना व कलशारोहण होइल नंतर लगेच ह.भ.प.माऊली महाराज पुंगळकर धामणगाव (सेलु) यांचे काल्याचे किर्तन होईल परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन दत्त मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## बहुजन संघर्ष सेनेच्या २४ व्या वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**नांदेड**-बहुजन संघर्ष सेनेच्या २४ व्या वर्धापन दिना च्या निमित्ताने संघटनेच्या कार्यलयात संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांनी सर्व कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणात संघटनेचा लेखा जोखा मांडल्या गेल्या २४ वर्षा पासून संघटना कशा पद्धतीने समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाऱ्याचं विरोध लढत आलेली आहे. तसेच संघटनेने वेळो वेळी उभारलेल्या आंदोलन हे कशा पद्धतीने यशस्वी झाले आहेत. राजकीय दृष्ट्या वेळो वेळी संघटनेने घेतलेली भूमिका हि त्यांनी मंडली आणि येणाऱ्या काळात संघटना हि आजून जोमाने काम करेल अशी गव्हही सुखदेव चिखलीकर यांची दिली .तसेच वर्धापन दिनाच्या निमित्ताने भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर याच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले .या वेळेस बहुजन संघर्षे सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले ) चे मराठवाडा उपथ्यक्ष मा सुखदेव चिखलीकर, सुधाकर पांढरे मित्र मंडळाचे राहुल वाघमारे, राजेश चौदंते ,जयपाल चिखलीकर, अविनाश जोंधळे,मिलिंद जोंधळे,राहुल थोरात ,यश बहादुरे, नितीन देडे,किरण चित्ते,, शुभम जोंधळे,संतोष दुंडे,विशाल गायकवाड, रवी वाघमारे, वैभव चिखलीकर, लक्ष्मण ताटीपामुलवार, लक्की चिखलीकर, व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडणूक मतदार संघात मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी

**नांदेड** -राज्य शासनाने राज्यातील नगर परिषदा व नगर पंचायतीच्या निवडणुकांच्या अनुषंगाने मतदानाचा दिवस, मंगळवार, दि. २ डिसेंबर, २०२५ रोजी नांदेड जिल्ह्यातील नगर परिषद/नगर पंचायत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघात अधिसूनेद्वारे सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदार संघाच्या बाहेर असतील त्यांना देखील लागू राहील. तसेच नांदेड जिल्ह्यातील नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील केंद्र शासनाची शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका इत्यादींना लागू राहणार असल्याचे अधिसूचनेत नमूद केले आहे.

## धनेगाव येथे महिलांची आरोग्य तपासणी

**नांदेड** -बचत गटातील महिलांनी आर्थिक सक्षमीकरणा बरोबर स्वतःचे आरोग्याबाबत सक्षम असावे या करता माविम सावित्री लोकसंचालित साधन केंद्र नांदेड व प्राथमिक आरोग्य केंद्र नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने धनेगाव येथे बचत गटाच्या माध्यमातून १०३ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. हा आरोग्य तपासणी कार्यक्रम मुख्य समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अमितकुमार रोडे यांच्या प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन खाली पार पडला.

# धोबी समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा अधिवेशनात मांडणार : आ. कल्याणकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

धोबी समाजाला १९६० पूर्वी असलेले एससी आरक्षणाबाबत हिवाळी अधिवेशनात मांडण्यात येणार असे आश्वासन नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी नॅशनल धोबी महासंघाच्या शिष्टमंडळास दिले.

धोबी समाजाला १९६० पूर्वी एससीमध्ये आरक्षण होते. १९६० नंतर ओबीसी प्रवर्गात टाकण्यात आले. धोबी



समाज आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. अनेकदा आंदोलने, मोर्चे काढल्यावर राज्य सरकारने २००१ साली समिती स्थापन केली. डॉ. दशरथ भांडे समितीची नेमणूक करण्यात आली व त्या समितीने पूर्ण महाराष्ट्रातील समाजाच्या घरोघरी जाऊन तपास केला असता त्यांच्या तपासणी अंती असे निष्पन्न झाले की, धोबी समाज हा अस्पृश्यतेचे निकष पूर्ण करतो. त्यामुळे या समाजाला तात्काळ अनुसूचित जाती प्रवर्गाच्या तत्सम सवलती लागू करण्यात याव्यात, परंतु २५ वर्षे झाले तरी राजय सरकार धोबी समाजासोबत चालढकल करीत असल्यामुळे येत्या ८ डिसेंबर २०२५ पासून नागपूर हिवाळी अधिवेशनात नॅशनल धोबी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष संतोष औंढेकर हे यशवंत स्टेडियम, नागपूर येथे आमरण उपोषण करणार आहेत. तसेच धोबी समाजाचे असंख्य कार्यकर्ते साखळी उपोषण करणार आहेत. यासाठी आ. कल्याणकर यांची भेट घेतली असता त्यांनी वरील आश्वासन दिले.

यावेळी नॅशनल धोबी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष संतोष औंढेकर, प्रदेश उपाध्यक्ष वामनराव पेनूरकर, प्रदेश सहसचिव किशनराव राकुरे, मराठवाडा उपाध्यक्ष कोंडिबा मांजरमकर, मराठवाडा संघटक गोविंदराव कुंटूरकर, जिल्हाध्यक्ष बालाजी कापसे, कार्याध्यक्ष मार्तंड भंडारे, उपाध्यक्ष पंढरी येवले, महानगराध्यक्ष पिंटूभाऊ मारवाडीकर, महानगर सचिव प्रभाकर वाळकीकर, सल्लागार अशोक मुत्तेपवार, संघटक शिवाजी काकांडीकर, रावण हाळदेकर, बालाजी भंडारे, नागनाथ इबितदार, दत्ता तेलंगे, समाधान कांबळे, गुणाजी गोरठेकर आदींची उपस्थिती होती.

## गजानन कोटगीरे यांचे निधन



**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १ डिसेंबर-**

बाऱ्हाळी ता. मुखेड येथील रहिवासी गजानन सुभाषराव कोटगीरे ( वय ४२ ) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी ( दि. १) पहाटे ३:३० वा. दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी १२:३० वाजता मौजे बाऱ्हाळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, एक बहीण, एक मुलगा असा परिवार आहे. बाऱ्हाळी येथील व्यापारी तथा जेष्ठ पत्रकार साईनाथ कोटगीरे यांचे ते बंधू होत.

# वाढते हृदय रुग्णांचे प्रमाण ही धोक्याची घंटा : डॉ.अशोक कौरवार

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १ डिसेंबर-**

बहुतांश नागरिकांचे खाणीमान व राहणीमान बदलल्याने च मुखेड तालुक्यांसारख्या डोंगराळ भागातील मेहनती नागरिकांनाही हृदयविकारांचे आजार उद्भवत आहेत. छातीमध्ये दुखत असताना अनेक रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक तज्ञ डॉक्टरांकडे न जाता ग्रामीण भागात घरगुती उपाय करताना दिसून येत आहेत यामुळे त्यांच्या जीवनात धोका होत आहे . सामान्य लोकांनी हृदय रोगाची लक्षणे वेळीच ओळखणे,नातेवाईकांनी अशा व्यक्तीला त्वरित जवळच्या रुग्णालयात दाखल करणे गरजेचे आहे. CPR म्हणजे जीवन संजीवनी ह्या आपत्कालीन प्रथमोपचार ची माहिती सर्व जनतेस विशेषतः तरुण वर्गास असणे आवश्यक झाले आहे. असेही आवाहन मुखेड शहरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अशोक कौरवार यांनी नागरिकांना केले .त्यांनी त्यांच्या रुग्णालयात एकाच दिवशी चार हृदयरोगी रुग्णांना जीवदान दिले आहे यावेळी ते बोलत होते.

मुखेड तालुका डोंगराळ भागाने वेढलेले असल्यामुळे या भागातील बहुतांश ग्रामीण भागातील नागरिक मेहनती व कष्टाळू निरोगी म्हणून ओळखला जातो मात्र आता ही ओळख पुसल्या जात असून शहरी भागासह ग्रामीण भागातील नागरिकांचे आणि मान व राहणीमान यामुळे मोठ्या प्रमाणावर हृदयविकाराचा धोका वाढला असल्याचे सध्या पहावयास मिळत आहे. मुखेड शहरातील रुग्णालयात दररोज हृदयविकारांचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत आहेत .शहरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ, मुखेड चे हृदयराज,डॉक्टर अशोक कोरवार यांच्या रुग्णालयात एकाच दिवशी तब्बल चार रुग्ण हृदयविकाराच्या गंभीर आजाराने मृत्यूच्या दारात उभे असताना उपचारासाठी त्यांना दाखल करण्यात आले यावेळी चारही रुग्णावर योग्य उपचार डॉ. अशोक कौरवार यांनी केला व त्यांना पुढील अंजॉग्रफी साठी नांदेडला पाठविण्यात आले. योग्य वेळी योग्य उपचार मिळाल्याने या रुग्णांना जीवदान मिळाले. मात्र ग्रामीण भागात रुग्णाच्या छातीत दुखत असताना तो रुग्ण गावातीलच एखाद्या सलाईन इंजेक्शन देण्याची थोडी माहिती असलेल्या अशिक्षित व्यक्तीकडे जाऊन उपचार घेत आहेत यातून त्यांची प्रकृती गंभीर होत चालली असून शेवटच्या क्षणी ते मुखेड शहरातील रुग्णालय गाठत आहेत . डॉक्टर अशोक कौरवार यांनी सांगितले की नागरिकांनी योग्य आहार व दररोज शारीरिक व्यायाम केल्यास हृदयविकाराच्या धोका टाळता . पोटाच्या वरच्या भागात तुम्हाला सतत त्रास होत असल्यास किंवा अचानक दुखणे वाढले असल्यास तात्काळ तुम्ही तज्ञ डॉक्टरांकडे जाऊन उपचार घ्यावा कदाचित तो हृदयरोगाचा धक्का सुद्धा येण्या अगोदर संकेत असू शकतात. यासाठी नागरिकांनी सतर्क राहून वेळेत उपचार करून घ्यावेत तसेच नियमित आपली शारीरिक तपासणी करून घ्यावीत. आहारामध्ये सर्वात उत्तम आहार म्हणजे शाखा आहार, असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला. यावेळी हरी पाटील , शहाजी राकुरे व संजय रिंदकवाले हे प्रशिक्षित कर्मचारी उपस्थित होते

# एड्स दिनानिमित्त प्रभावी उपक्रम



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १ डिसेंबर-**

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधत समाजातील अंधश्रद्धा, गैरसमज आणि एड्सग्रस्तांविषयीचा भेदभाव दूर करण्याचा स्तुत्य उपक्रम नरसी येथील कै.गोपीनाथ राठोड नर्सिंग कॉलेज तर्फे राबविण्यात आला.

श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेत भव्य प्रांगणात उपस्थित विद्यार्थ्यांसमोर प्रभावी पथनाट्य सादर करून जन जागृतीचा ठसा उमटविला.

कॉलेजचे प्राचार्य अशोक राठोड यांच्या नेतृत्वाखाली सह शिक्षिका कुमारी मेघा सूर्यवंशी, शिक्षक आदित्य मधूकर राठोड, वैभव कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

नर्सिंग विद्यार्थ्यांमध्ये विक्रम आडे, मुजफ्फर शेख, रूपेश राठोड, प्रिया पांचाळ, कविता नारलानाड, ऐश्वर्या राठोड, अरुणा ढेपाळ, आरती चव्हाण, दिपिका चव्हाण, श्रावणी पांचाळ, मयुरी पवार, दिपाली पवार, क्रांती शिंगणे, प्रियांका हानवटे, नागेश वगवाड, पांडुरंग सुरेवाड, बाबुराव देवदे, शुभम गायकवाड, शैलेश घंटेवाड, शिवराज, आरती चव्हाण, दिपाली पवार आदी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या पथनाट्यातून एड्स ग्रस्त व्यक्तींवरील भेदभाव अयोग्य असून त्यांना समाजात समान स्थान देणे गरजेचे आहे, असा संवेदनशील संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडला. तसेच एड्सची प्रतिबंधक काळजी, योग्य माहिती आणि सुरक्षित वर्तनाबाबत मार्गदर्शनही करण्यात आले. यावेळी विद्यार्थीनी भरभरुन दाद दिली तर प्रेक्षकांनी या उपक्रमाचे भर भरून कौतुक केले.

कार्यक्रमाला माध्यमिक आश्रम शाळेचे प्राचार्य विजयकुमार देशमुख, सहशिक्षक सूर्यकांत जाधव, आनंदराव सूर्यवंशी, नागनाथ येलूरे, संभाजी मेहेत्रे, व्यंकट रेकूळवाड, सुरेश पवार, सुभाष राठोड महेंद्र सारवले,शिवराम राठोड,सुभाष कदम, एकनाथ मुनगीलवार,फेरोज शेख दिपक बि-हाडे,तसेच पोस्ट बेसिक ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक पांडुरंग येवले, उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेजचे प्रा.गणेश मारताळेकर,प्रदीप लापशेटवार, शिव शंकर कोरे, दिलीप माने,गजानन श्रीरामे सह, चतूर्थ कर्मचारी हाणमंत सिंगवाड, बालाजी राठोड सह,अनेक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या पथनाट्य कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शंकर राठोड यांनी केले

अशा प्रकारचे उपक्रम समाजातील गैरसमज दूर करून आरोग्य जागरूकतेची बीजं पेरतात, असा सार्वत्रिक निष्कर्ष उपस्थितांनी व्यक्त केला.

# स्क्रॅप मिळवुन देण्याच्या नावायाली कोट्यावधीची फसवणुक करणाऱ्या अरोपीचा जामीन नाकारला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ डिसेंबर-**

सिप्टा कंपनीच्या मशिनरी स्क्रॅप मिळवून देण्याच्या नावाखाली तब्बल १ कोटी १५ लाखांची फसवणूक केल्याचा एक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी राजवीर सिंह मल्होत्रा (रा. पुणे) याला अटक करून न्यायालयात हजर केले असून, न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळत त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान राजवीरसिंह मल्होत्रा याने जामीनासाठी अर्ज केला होता परंतू न्यायलयाने अर्ज फेटाळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड शहरातील चैत्यनगर येथील रहिवासी मोहम्मद ताहिर अली आणि त्यांचे सहकारी ख्वाजा मोईनुद्दीन यांच्याशी सिप्टा कंपनीच्या ५ हजार टन मशिनरी स्क्रॅप संदर्भात आरोपी राजवीर मल्होत्रा याने संपर्क साधला होता. या व्यवहाराबाबत १२ ऑगस्ट २०२४ रोजी साक्षीदारांच्या उपस्थितीत करार करण्यात आला. करारानुसार आरोपीने संबंधित स्क्रॅप तक्रारदारांना पुरवून देण्याचे आश्वासन दिले.



कराराप्रमाणे तक्रारदारांनी आरोपीसाठी १० लाख रोख, ५० लाख आरटीजीएस बँक ट्रान्सफर, ५ लाख शुऐब खानमार्फत ट्रान्सफर असे एकूण ६५ लाख रुपये अदा केले. त्यानंतर आरोपीवर विश्वास ठेवून तक्रारदारांनी आणखी ५० लाख दिले, अशा प्रकारे एकूण छ१ कोटी १५ लाख रुपये देण्यात आले.

मात्र एवढी मोठी रक्कम मिळूनही आरोपी स्क्रॅप देण्याबाबत सतत टाळाटाळ करत राहिला. तक्रारदारांनी कंपनीशी थेट संपर्क साधताच आरोपीने कंपनीकडे कोणतीही रक्कम जमा केली नसल्याचा धक्कादायक खुलासा झाला. पैसे मागणीवर आरोपीने ३० लाख आणि ३५ लाखांचे दोन धनादेश दिले, मात्र दोन्ही चेक बाऊन्स झाले.

यानंतर तक्रारदार मोहम्मद ताहिर अली यांनी १५ नोव्हेंबर २०२५ रोजी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक ओमकांत चंचोलकर यांनी विशेष पथकाची स्थापना केली. पथकाने पुण्यात सापळा रचून राजवीर मल्होत्रा याला अटक केली.

आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. कोठडी संपल्यानंतर आरोपीने जामीनासाठी अर्ज दाखल केला, मात्र सरकारी बाजूने तीव्र विरोध दर्शवल्यानंतर न्यायालयाने जामीन नाकारत आरोपीला न्यायालयीन कोठडीत पाठविले.

या प्रकरणात तक्रारदारांच्या वतीने सहायक सरकारी वकील म्हणून ॲड. हबीब काझी यांनी यशस्वीपणे बाजू मांडली, ज्यामुळे आरोपीचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला. या फसवणूक प्रकरणामुळे व्यापारी वर्गामध्ये मोठी खळबळ उडाली असून पुढील तपास नांदेड ग्रामीण पोलीस करत आहेत.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मतदान व मतमोजणीदरम्यान आठवडी बाजार बंद ठेवण्याचा आदेश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर केला असून जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, नळदुर्ग, उमरगा, मुरुम, कळंब, भूम व परंडा या नगरपरिषदांचा त्यात समावेश आहे.

मतदारांना निर्विघ्न आणि शांततेत मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच कोणत्याही प्रकारची गर्दी किंवा अडचण निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित नगरपरिषद क्षेत्रातील आठवडी बाजार २ डिसेंबर (मतदान दिवस) आणि ३ डिसेंबर (मतमोजणी दिवस) रोजी बंद ठेवणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. द मार्केट अँड फेअर ॲक्ट १८६२ च्या कलम ५ व ५(अ) नुसार आठवडी बाजार बंद किंवा पुढे ढकलण्यास उपसंचालक, पणन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी २८ नोव्हेंबर रोजी मान्यता दिली आहे.

यानंतर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी संबंधित अधिकारांचा वापर करून सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत.

 https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

#### येणेगुर शिवारात शेतशेड फोडून १९,५०० रुपयांचा माल चोरी

**मुरूम, दि.१ डिसेंबर -**



येणेगुर शिवारातील शेतात अज्ञात चोरट्यांनी शेड फोडून कृषी साहित्याची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. निजगुन गुरुलिंगया स्वामी (वय ५४, रा. येणेगुर, ता. उमरगा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे गट क्र. ३४० मधील पत्र्याच्या शेडचे पत्रे २९ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० दरम्यान अज्ञात व्यक्तीने उचकटून आत प्रवेश केला. शेडमधून बळीराम नांगर, लोखंडी पाईप, दोन कुळव, तसेच दोन ५ व्ह्ज क्षमतेच्या मोटारी असा एकूण अंदाजे १९,५०० रुपयांचा माल चोरून नेण्यात आला. घटनेबाबत दिलेल्या फिर्यादीवरून मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

#### रस्त्यावर धोकादायकरीत्या गाडा उभा; राजस्थानच्या युवकावर गुन्हा

**उमरगा, दि.१ डिसेंबर -**

राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ वर उमरगा पोलीस ठाण्यासमोर सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस धोका निर्माण होईल अशा पद्धतीने पाणीपुरी गाडा उभा केल्याप्रकरणी एका युवकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दिनेश उर्फ कैलास राजु रावत (वय २०, रा. लसाडिया, जि. सोलनवर, राज्य राजस्थान; ह.मु. साने गुरुजी नगर, उमरगा) यांनी दि.३० नोव्हेंबर रोजी सायं. ७.४५ वाजता आपल्या ताब्यातील पाणीपुरी गाडा हा एनएच-६५ वर पोलीस ठाण्यासमोर धोकादायकरीत्या उभा केला होता. सदर गाड्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याबाबत सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरून उमरगा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २८५ तसेच मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सुरू असून आरोपीवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

#### ढोकी नजीक भीषण अपघात; मोटरसायकलस्वाराचा मृत्यू

**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

लातूर-बार्शी मार्गावर घोगरेवाडी पाटी, हॉटेल अंजलीजवळ झालेल्या भीषण अपघातात संदीप पांडुरंग चौधरी (रा. पळसप, ता. धाराशिव) यांचा मृत्यू झाला. हा अपघात दि.१२ नोव्हेंबर रोजी दुपारी २.५५ वाजता घडला. संदीप चौधरी हे एमएच २५ बीबी १३६४ क्रमांकाच्या मोटरसायकलवरून जात असताना, ७९८४ क्रमांकाच्या बसचा चालक बस हायगतीने व निष्काळजीपणे चालवित होता. बसने मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने संदीप चौधरी गंभीर जखमी झाले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात पीडिताची पत्नी निता संदीप चौधरी (वय ३७) यांनी दि.३० नोव्हेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून, ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी बसचालकाविरुद्ध पुढील तपास सुरू केला आहे.

#### खेड येथे तिरट मटका जुगारावर छापा, सहा जण अटकेत

**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

जुगारविरोधी विशेष मोहिमेअंतर्गत ढोकी पोलिसांनी दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २.२७ वाजता कळंब पोलीस ठाणे हद्दीत खेड येथे छापा टाकून तिरट मटका जुगार खेळणाऱ्या सहा जणांना रंगेहात पकडले. ढोकी पोलिसांच्या पथकाने विक्रम महादेव गरड यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत संशयित हालचालीवरून कारवाई केली. छापा टाकल्यावर १६.५३ वाजता खालील आरोपी जुगार खेळताना आढळले. अंबादास श्रीपती शिंदे (वय ५२), आश्रुबा भाउसाहेब गरड (वय ३६), विष्णु दामोदर घुले (वय ५०), सागर महादेव गरड (वय ४५), विश्वास बब्रुवान दागड, मनोज शहाजी पेठे (वय ३५) सर्व रा. खेड, ता. धाराशिव पोलिसांनी त्यांच्याकडून तिरट मटका जुगार साहित्य तसेच ४,०१० रुपयांची रोकड जप्त केली. या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

#### शेगडीवर निष्काळजीपणे अग्नि प्रज्वलित केल्याप्रकरणी दोन गुन्हे दाखल

**परंडा, दि.१ डिसेंबर -**

सार्वजनिक रस्त्यालगत हातगाडीवरील शेगडीवर निष्काळजीपणे अग्नि प्रज्वलित करून पदार्थ तयार करण्याच्या दोन वेगवेगळ्या प्रकरणांत परंडा पोलिसांनी दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५ ते ६ या वेळेत कारवाई केली. वारदवाडी फाटा ते भुम जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या हॉटेल शंभुराजे आणि हॉटेल जयमल्हार परिसरात हातगाडीवरील शेगड्यांवर निष्काळजीपणे अग्नि प्रज्वलित केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या प्रकरणात खालील ग्रामस्थांवर कारवाई करण्यात आली. रावसाहेब गणपत देवकर (वय ५०, रा. वांगी बु., ता. भुम, जि. धाराशिव), रविंद्र गणेश पालके (वय ५०, रा. वांगी बु., ता. भुम, जि. धाराशिव) सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होईल अशा निष्काळजी कृत्याबाबत सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरीवरून परंडा पोलीस ठाण्यात स्वतंत्र दोन गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

## नळदुर्ग न.पा. निवडणूकीत विकासाभिमुख नेतृत्वाला संधी द्यावी

### मतदारांना जागृतीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उद्या दि.२ डिसेंबर रोजी मतदान होत असून या पार्श्वभूमीवर शहरातील सुजाण नागरिकांनी विकासाभिमुख, प्रामाणिक आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देऊ शकणाऱ्या प्रतिनिधींना निवडून देण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य नगराध्यक्ष आणि नगरसेवकांची निवड हे मतदारांसमोरील महत्त्वाचे आव्हान असल्याचे नमूद करण्यात येत आहे. पाच वर्षे रडणारा नगराध्यक्ष पाहिजे की खंबीरपणे काम करणारा नगराध्यक्ष? या प्रश्नाचा विचार या निवडणुकीत प्रत्येक मतदाराने करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त झाले आहे.

निवडून आल्यानंतर पदाचा गैरवापर करणारे, गुत्तेदारी करणारे, जातीपातीचे राजकारण करणारे, काम न करता कारणे सांगणारे, अशा उमेदवारांनी नगरपालिकेत स्थान मिळाल्यास शहराच्या विकासाला मोठा फटका बसू शकतो, यावर भर देण्यात आला आहे.

त्यामुळे शहरातील मतदारांनी अशा प्रवृत्तीपासून सावध राहून त्यांना मतांच्या माध्यमातून योग्य उत्तर द्यावे, असा संदेश देण्यात आला आहे. शहरातील विकासकामांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करणे आवश्यक असते. केंद्र आणि राज्यात जी सत्ता आहे, तिच्याच विचारसरणीचा नगराध्यक्ष व नगरसेवक असल्यास निधी मिळवणे सुलभ होते, असे वास्तव मतदारांसमोर ठेवण्यात आले आहे. विरोधी पक्षाची सत्ता आल्यास निधी मिळण्यात अडचणी येऊ शकतात, याचाही विचार करणे आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे.

मतदारांनी मतदान करताना शहरातील प्रश्न समजून घेणारा, त्यांचे निराकरण करण्याची क्षमता असलेला, विकासाभिमुख दृष्टिकोन ठेवणारा उमेदवार यालाच पसंती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अन्यथा पुढील पाच वर्षे पुन्हा नाराजी, तक्रारी आणि मागण्यांचाच काळ अनुभवावा लागू शकतो, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शहराच्या भविष्याचा निर्णय २ डिसेंबर रोजी मतदारांच्या हातात आहे.

### ७० वर्षांची नगरपालिका; तरीही विकास अपुरा...

नळदुर्ग नगरपालिका स्थापन होऊन ७० वर्षे पूर्ण झाली असूनही शहराचा अपेक्षित विकास झालेला नाही, याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. इतिहास, धार्मिक वारसा, पर्यटनस्थळे असूनही त्यांच्या विकासाचा उपयोग शहराला होऊ शकला नाही, ही बाबही प्रकर्षाने पुढे आली आहे. यात प्रमुख्याने ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला, श्रीक्षेत्र रामतीर्थ, श्रीक्षेत्र भीमाशंकर, श्री खंडोबा-बाणाईचे पवित्र स्थल, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक श्री नानीमाँ अशी अनेक ठिकाणे असूनही त्यांचा पर्यटनविकास साधता आला नाही, असे नमूद करण्यात आले आहे.

#### प्रतिबंधीत गुटखा साहित्यासह आरोपी अटक

**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

ढोकी पोलीस ठाण्याच्या पथकाने दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ७.२० वाजता भक्तावर शाबुदीन शेख, वय ४५ वर्षे, रा. तेर ता. जि. धाराशिव यांच्या ताब्यातील परवीन पान टपरी येथे तपासणी केली असता शासनाने प्रतिबंधित केलेले गुटखा व तत्सम पदार्थ जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मालामध्ये गुटखा, विमल पान मसाला, व्हि १ तंबाखू, बादशाहा गुटखा, राजनिवास पान मसाला यांचा समावेश असून, एकूण किंमत ४,६७२ रुपये होती. यावरून आरोपी विरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

## गाळपास आलेल्या ऊसाचे बिल १५ दिवसांत बँक खात्यात वर्ग करण्याची परंपरा कायम राहणार : चेअरमन नानासाहेब पाटील

### एनव्हीपी शुगरच्या द्वितीय हंगामात ३० नोव्हेंबरपर्यंत गाळपास आलेल्या ऊसाचे बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा.लि. या कारखान्याच्या द्वितीय गळीत हंगामात तिसऱ्या पंधरवाड्यामध्ये १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत गाळपास आलेल्या ऊसाचे २५०० रूपयेप्रमाणे ऊसबिल संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १ डिसेंबर रोजी जमा करण्यात आले असल्याची माहिती चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली आहे.

एनव्हीपी शुगरने चाचणी गळीत हंगामाच्यावेळी केलेल्या घोषणेप्रमाणे गाळपासाठी आलेल्या ऊसाचे बिल संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पंधरा दिवसांत जमा करण्यात येत आहे. ही परंपरा द्वितीय गळीत हंगामात देखील कारखान्याने जोपासली आहे. शेतकऱ्यांचे हित समोर ठेवून पंधरवाडा संपल्यावर संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर ऊस बील जमा करण्यात आले असून यापुढेही शेतकऱ्यांचे ऊस बिल प्रत्येक पंधरवाडा संपल्यावर जमा करण्याची परंपरा कायम ठेवणार असल्याचे सांगून तिसर्या पंधरवाड्यात गाळपासाठी आलेल्या ऊसाचे रूपये २५०० प्रमाणे बिल संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आलेले असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते



दिले आहे अशा शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आपले आपले बिल घ्यावे.

त्याचबरोबर ज्यांनी अद्याप खाते दिलेले नाही अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. धाराशिव बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे, असेही चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी कळविले आहे.

#### अवैध मद्य जप्त, २ जणांविरुद्ध गुन्हा

**मुरूम, दि.१ डिसेंबर -**

मुरुम - मुरुम पोलीस ठाण्याच्या कारवाईत दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी अवैध मद्य जप्त करण्यात आले.

नागनाथ गवळी यांच्याकडून ३२ लिटर गावठी दारु अंदाजे ३,२०० रुपये किंमतीची जवळ बाळगलेली आढळली आणि जप्त करण्यात आली. सतिश जाधव यांच्याकडून विठ्ठल साई साखर कारखान्याच्या समोरील २२ लिटर गावठी दारु अंदाजे २,२०० रुपये किंमतीची जप्त करण्यात आली.

यावरून अन्वये दोन स्वतंत्र गुन्हे नोंदविले आहेत.

## निवडणूक प्रक्रीयेसाठी कळंब प्रशासनाकडून सर्व तयारी पुर्ण

### पुरुष मतदार १०७१३ व महिला मतदार १०२४५ मतदानाचा हक्क आज बजावणार...




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ डिसेंबर -**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ पारदर्शक, सुरळीत आणि कायदेशीर तरतुदीनुसार पार पाडण्यासाठी सर्व प्रशासकीय तयारी पूर्ण करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी हेमंत ढोकले यांनी दिली. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व कामकाजाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

कळंब शहरातील एकूण मतदारसंख्या २०,९५८ असून यामध्ये पुरुष मतदार १०,७१३ तर महिला मतदार १०,२४५ आहेत. निवडणुकीसाठी शहरात २४ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून कोणतेही संवेदनशील केंद्र नाही. सर्व मतदान केंद्रांची पाहणी करून आवश्यक सुविधा आणि दुरुस्ती पूर्ण करण्यात आली आहे.



मतदानासाठी २४ कन्ट्रोल युनिट (बीयु), ४४ बॅलेट युनिट (बीयु) तसेच आणीबाणीकरिता १० अतिरिक्त मशीन उपलब्ध ठेवण्यात आली आहेत. मतदान केंद्रांवर ९६ अधिकारी, मतदार ओळखीसाठी १२ महिला कर्मचारी, तसेच २४ शिपाई, अशा एकूण १३२ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

याशिवाय मतदानानंतरची आकडेवारी व साहित्य जमा करण्यासाठी स्वतंत्र ४० कर्मचाऱ्यांची अतिरिक्त नेमणूक करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने १ उपविभागीय पोलीस अधिकारी, १ पोलीस निरीक्षक, २ सहाय्यक निरीक्षक, ६ पोलीस उपनिरीक्षक, ६८ पोलीस अंमलदार आणि ६५ होमगार्ड यांची नेमणूक करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी नियुक्त सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले असून आचारसंहिता व नियमांचे काटेकोर पालन केले जाणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी हेमंत ढोकले यांनी नागरिकांना शांततेत, सुव्यवस्थित वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच कळंब शहरातील सर्व मतदारांनी आपला अमूल्य मतदानाचा हक्क जरूर बजावावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## जवाहर विद्यालय, अणदूरची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१ डिसेंबर -**

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित जवाहर विद्यालय, अणदूर यांची शैक्षणिक सहल दि.२७ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत उत्साहात पार पडली.

या सहलीत विद्यार्थ्यांनी मोरगाव, जेजुरी, प्रतिबालाजी, पुरंदर किल्ला, वस्तू संग्रहालय, प्रतापगड, महाड येथील चवदार तळे, रायगड, पाचाड, हरिहरेश्वर, श्रीवर्धन, महाबळेश्वर, जंजिरा जलदुर्ग, दिवेआगार सुवर्ण गणपती आदी महत्त्वपूर्ण स्थळांना भेट दिली. या दौऱ्यातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचा आध्यात्मिक वारसा, भौगोलिक वैशिष्ट्ये, विविध गड-किल्ले, ऐतिहासिक मोहिमा, नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिजे, राजे-महाराजांचा इतिहास, राजकीय भूगोल, वैज्ञानिक विषय, अनेक बोलीभाषा, लोकांचे राहणीमान व पर्यटन स्थळे यांचा प्रत्यक्ष अभ्यास करता आला. सहल यशस्वी करण्यासाठी शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. लक्ष्मीकांत पाटील, प्राचार्य गोपाळ कुलकर्णी तसेच सहलप्रमुख मकरंद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या शैक्षणिक उपक्रमात रोहित मोरे, सिद्धेश्वर मसुते, श्रीशैल वाले, तानाजी कार्ले, अनंत माळवदकर, दीपक सिरसट, उमेश चंदनशिवे, महेश यादव, अमोल रोकडे, दादाराव चव्हाण, ईराप्पा व्हनाळे, सौदागर सुतार, प्रणील बनसोडे, अंकुश मोकाशे, वैशाली कर्पे, सारिका वरडे, ज्योती चौधरी, उज्ज्वला नारायणकर, प्रतिभा ऐकुंडे व अनुसया कुताडे यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

सहल सुरळीत पार पाडण्यासाठी तुळजापूर आगार व्यवस्थापक रामचंद्र शिंदे, तसेच चालक बाळासाहेब शिंदे, ज्योतिबा मस्तूद, बालाजी सोनटक्के, तुकाराम गायकवाड व गणेश गंधोरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

#### मूकबधिर विद्यार्थ्यांना भोजन, रुग्णांना फळवाटप

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ डिसेंबर -**

पर्याय सामाजिक संस्थेचे कार्यवाहक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ अण्णा तोडकर यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त कळंब येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय, कळंब येथे मूकबधिर विद्यार्थ्यांना स्वादिष्ट भोजन देण्यात आले. भोजनाचा आस्वाद घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला. या उपक्रमाचे आयोजन पर्याय संस्थेच्या कार्यकर्त्यांनी केले असून विलास गोडगे, भिकाजी जाधव, विकास कुदळे, बालाजी शेंडगे यांनी तोडकर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगावचे सचिव शहाजी चव्हाण, शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवर, विशेष शिक्षक अश्रुबा कोठावळे, विशेष शिक्षिका सुनिता गुंड, सुनंदा गायकवाड, तसेच शिक्षक गणेश फरताडे उपस्थित होते.

## जिल्ह्यात २ ते १४ डिसेंबरपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी लागू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ डिसेंबर -**

जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुका व संभाव्य आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर २ ते १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत जमावबंदी व शस्त्रबंदी लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी हा आदेश जारी केला आहे.

निवडणूक प्रचार, पक्षांतर, गटबाजी तसेच अतिवृष्टीतील नुकसानभरपाईसाठी होऊ शकणाऱ्या मोर्चे, धरणे, रास्तारोको इत्यादी आंदोलनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा अंदाज व्यक्त करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

## मंगरूळ झेडपी मतदारसंघातून मेनका डोंगरे यांच्या उमेदवारीची जोरदार चर्चा




**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१ डिसेंबर -**

जिल्हा परिषदेचे माजी सभापती मुकुंद डोंगरे यांच्या सूनबाई तसेच युवक काँग्रेसचे माजी तुळजापूर तालुकाध्यक्ष मकरंद डोंगरे यांच्या पत्नी मेनका मकरंद डोंगरे या आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरू शकतात, अशी चर्चा सोशल मीडियावर चांगलीच रंगली आहे.



तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ जिल्हा परिषद मतदारसंघ हा सर्वसाधारण महिला आरक्षणाखाली असून, या मतदारसंघात मंगरुळ व आरळी बु. पंचायत समिती गणाचा समावेश आहे. पंचायत समिती सदस्य पदांसाठी अनुक्रमे सर्वसाधारण महिला व ओबीसी पुरुष असे आरक्षण असून राजकीय गणिते अधिकच रोचक बनली आहेत.

मंगरुळ कडे तुळजापूर तालुक्याची राजकीय राजधानी म्हणून पाहिले जाते. तालुका आणि जिल्हा पातळीवर सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रातील नेतृत्वावर येथील नागरिकांची मजबूत पकड आहे. येथील अनेक राजकारण्यांनी जिल्ह्यातील महत्त्वाच्या पदांवर काम करून ठसा उमटवला आहे. त्यात मुकुंद दादा डोंगरे यांचे नाव विशेष उल्लेखनीय आहे. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत शेती, आरोग्य, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात त्यांच्या कार्याची व्यापक दखल घेतली गेली आहे.

वीजपुरवठा सुधारणा, रस्ते व गटार व्यवस्था, सांस्कृतिक सभागृह, शेतरस्ते व लघु पाटबंधारे, गोरगरिबांसाठी घरकुल योजना अशा अनेक विकासकामांसाठी त्यांनी भरघोस निधी मंगरुळ मतदारसंघात खेचून आणला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाबद्दल जुन्या जाणत्यांपासून ते तरुण मतदारांपर्यंत मोठा आदर व आकर्षण आहे. मुकुंद डोंगरेंची गावपातळीवरील मजबूत पकड, त्यांचे संघटन कौशल्य, शिस्तबद्धता, विकासाभिमुख दृष्टिकोन याचा थेट फायदा उच्चशिक्षित मेनका डोंगरे यांना होईल, असे सोशल मीडियावर लोकांचे मत आहे. याशिवाय मकरंद डोंगरे यांनी युवक काँग्रेसच्या माध्यमातून तालुकाभर युवकांना संघटित केले आहे.

अनेक तरुणांना समाजकारणात आणण्याचे आणि त्यांना मार्गदर्शन करण्याचे त्यांचे योगदान मोठे मानले जाते.

### उमेदवारी आणि पक्षाधार-ताणलेली उत्सुकता...

मेनका डोंगरे कोणत्या पक्षाकडून उमेदवारी करणार? तालुक्यात कोणत्या राजकीय घडामोडी घडतात? या सर्व बाबींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणुका जवळ आल्याने सोशल मीडियावर दावे-प्रतिदावे, विश्लेषण, चर्चा यांना वेग आला आहे. शेवटी मतदार राजा कोणाला कौल देणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### तूर्तास चर्चा, अपेक्षा आणि मतदार राजाची प्रतीक्षा...

सध्या सोशल मीडियावरील ही उमेदवारीची चर्चा मंगरूळ जिल्हा परिषद मतदार संघात अधिक जोर धरत असून, परंतु अंतिम निर्णय पूर्णपणे मतदार राजाच्या हातात आहे. पुढील काही दिवसांत राजकीय वातावरण अधिक गरम होवून तापण्याची शक्यता आहे. शेवटी पक्षश्रेष्ठी कोणाला कौल देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.